सालअखेर १८८
किरकोळ अंकास.....८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition pe line 3as

VOL XXIII | AKOLA MONDAY 2 SEPTEMBER 1889 | NO. 34

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २ माहे सप्टेंबर सन १८८९ इ० | अंक ३४

पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्या-च्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पिपळगांव राजा. ता. २९-८-८९

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

पिंपळगांवराजा येथें जो ज्ञानवर्धक सभा स्थापन झाली आहे, त्या सभेचे उत्पादक रा. रा. कृष्णाजी भास्कर हेडमास्तर व मे. कपरोद्दीन हिं. शा. चे हेडमास्तर हे आहेत. ह्या रविवारीं मराठी स्कुलांत सभा भरली होती. त्या वेळेस दोन्ही उत्पादक अजारी असल्यामुळें गैरहजर होते. ह्मणून सभेचे अध्यक्षस्थानीं मि. महादेव गोपाळ मेडिकल ऑफिसर यांनीं गुलाअहमदखा सवदागर यांस स्वीकारण्या विषयीं विनंती केली. त्याप्रमाणें त्याच्या विनंतीस जाया देऊन अध्यक्षस्थान स्वीकरिलें. सभेमध्यें मि. मेडिकल ऑफिसर यांनीं शारीर शास्त्रावर व्याख्यान करण्या विषयीं आरंभ केला. त्यांत पहिल्या प्रथम डोकें प्रत्यक्ष सभेपुढें आणून त्याचे रचनेविषयीं इतकी उत्तम प्रकारें माहिती करून दिली कीं, त्या मुळें सर्व सभाजनांचें अंतःकरण सुप्रसन्न होऊन सर्वांनीं त्यांचे फारच फार आभार मानिले.

सदरहू सभेचे उत्पादक हे अद्याप पावेतों गांवातील चांगल्या चांगल्या संभावित मनुष्यास सभेस बोलावण्या विषयीं कां हयगयी करितात हें समजत नाहीं. ज्या ज्या वेळेस सभा भरली जात त्या त्या वेळेस येथील कामदार रा. रा. देवराव रामराव देशमुख हे गांवचे मालक असून हे गृहस्थ मोठे हुशार व इजतदार व यांचे आंगीं काम करण्याची शैली जशी असावी तशी असून यांना बोलावण्याची भ्रांति कां पडते हें न कळे. करितां सभेचे उत्पादकांस हीच विनंती आहे कीं सभा भरविण्याचे आदले दिवशीं गांवांतील प्रत्येक संभावित मनुष्यास अमंत्रणपत्रक पाठवून त्यांस बोलावण्याची तसदी घेतील अशी उमेद आहे. असें केलें असतां मंडळी ही जास्त जमून सभेलाही शोभा विशेष येईल.

सभेचे उत्पादकांनीं ह्या सभेला जें नांव दिलें आहे. त्या प्रमाणें प्रथमतः कृती झाली शेवटीं मेडिकल ऑफिसर यांनीं एकमेकांस अनुलक्षुन विरोधपरभाषणें करून कुरापती निघतात हें त्यांचे नांवास केवळ बट्टा आहे.

आपला,
"एक ग्रामस्त"

मुक्काम वाशीम ता० २७-८-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष या आठवड्यांत पावसानें कहर उडवून दिला तारीख २५ रविवारीं इतक्या सपाट्यानें वृष्टि झाली कीं रानोमाळ रस्तोरस्ती पाणीच पाणी झालें श्रीबालासाहेबाचे मागील बाजुस एक लहानसा ओढा आहे. त्याला पूर येऊन त्या भागांत बकाली लोकांची झोपडी आहेत त्यांत पाणी शिरलें होतें. कित्येकांच्या भिंती पडल्या. धाबीं गळून घरांत बसण्यास कोरडी जागा ह्मणून फारच थोडक्यांचे घरांत राहिली. एकूण या पावसानें लोकांना बरेंच त्रस्त करून सोडलें. आतां आठ पंधरा दिवस मेघराज स्वतः विश्रांती घेऊन लोकांना ती घेण्यास फुरसत देतील तर बरें नाहींतर लोकांचा त्रास दुप्पट होईल. मेघराजा कर कृपा नी काय बवंतास!

महामारीचें बिराड उचललें. लोकांची चित्तवृत्ति शांत झाली. परंतु दुःख मानण्यासारखी गोष्ट ही आहे कीं लोकांच्या मागें कांहीं झेंगट लागलेलें असतेंच. आतां आमाशांची पोटांत मुरडा मारून वेग येऊन आवरक्त पडण्याची धाम आली आहे असें ह्मटलें तरी चालेल. या उपद्रवाबद्दल बहुत लोक गाऱ्हाणें करितात येथ गावठी वैद्य कोणी नाहीं. ह्या जिल्ह्याचे ठिकाणीं लोक संख्येच्या मानानें पाहिल्यास येथें एका चांगल्या वैद्याचा धंदा चालेल. किंवा नवीन इंग्रजी एखादे एल एम ॲंड एस असें कोणी येथें दवाखाना काढतील तर कदाचित् त्यांचेही येथें व सर्वजिल्हाभर चांगलें काम चालूं शकेल कारण चांगल्या आपल्या धंद्यांत परांगत झालेल्यांची सर्वांनांच सर्वकाळीं गरज असते. अशा मनुष्याचा धंदा येथें चालणार नाहीं असा कित्येक आक्षेप घेतात व एकंदर वस्तीचे स्वरूपाचा विचार केला तर हा आक्षेप खोटा आहे असेंही ह्मणतां येणार नाहीं तरी अनुभव एखाद्यानें घेऊन पाहिल्या शिवाय त्याबद्दल कांहींच ह्मणतां येणार नाहीं. आमचे गांवठी वैद्यशास्त्र दिवसानुदिवस ऱ्हास पावत चालले तरी डाक्टर भालचंद्र कृष्णभाटवडेकरांसारखे अभिमानी पुरुष या आर्यभूमीवर जोंपर्यंत अवतरण झाले आहेतोंपर्यंत आपल्या वैद्यशास्त्राची अगदीं निराशा झाली असें ह्मणतां येणार नाहीं. बापुसाहेब मेंदळ्यांचें कोणी चरित्र मनांत आणिलें तर आपलें वैद्यशास्त्र किती सज्ज आहे, औषधी किती गुणकारी आहेत. याचा त्याचे मनावर ठसा उमटेल तसा इंग्रजी औषधांचाही उमटणार नाहीं आपल्या पूर्वजांनीं जें करून ठेविलें आहे तें सर्व नीट आहे परंतु त्याची योग्यता समजण्यापुरतें गुण आमच्यामध्यें नाहींत त्याला आह्मी काय करावें. हल्लीं ह्या ठिकाणीं धंदा करणारा गांवठी वैद्य नाहीं तरी आमच्या वाशिमस्थांच्या सुदैवानें येथें एक वैद्य आहेत. ते कोणापासून पैसा घेत नाहीं नुस्ती आशाही करीत नाहात. ते घरचे सुखी असून परोपकारबुद्धी इतकी आहे कीं पदरचे पैसे खर्च करून लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना मोठ्या प्रेमभावानें बोलाविल्याबरोबर त्यांचे घरीं जाऊन औषध देतात. यांना नाडी ज्ञान फारच उत्तम असून सकाळपासून रात्रीचे अकरावाजेपर्यंत यांचेमागें रोग्यांचा तगादा असतोच. कितीही घरचें निकडीचें काम असलें तरी ते कोणाला नाहीं असें ह्मणत नाहीं. यांची औषधी ह्मणजे इतकी चांगली व गुणकारक आहे कीं त्या औषधाचीं व रोगाचा योग झाला असतां मग काय त्याचे भोग तुत्व सरलें असेंच ह्मटलें पाहिजे. असें आहे ह्मणून त्यांचे औषधीला अमृतसंजीवनीच तूर्तातूर्त ह्मटलें असतां बाध येईल असें नाहीं देवा आमच्या ह्या वैद्यराजांना व त्यांच्या घराण्याला सुखी राख व त्यांची भरभराट कर. व त्यांचे हातून असाच परोपकार घडो व लोकांचे कल्याण होवो.

येथील नायब तहसिलदार रा. रा. रामराव गोविंद इंगोलीकर यांची बदली झाल्या बद्दल आपल्या पत्रीं मागें आलेच होते ते आपल्या नवीन जागीं रुजु होण्या करितां सहकुंब रवाना झाले त्यांचे येथील जागीं मिस्तर महमद सा० दाखल झाले मिस्तर रामराव यांस भरपावसांत कां बदलले शिवाय सारख्याच पगारावर हे कांहींच समजत नाहीं. मागे एकवळ असें वर्तमान गांवांत पसरलें होतें कीं त्यांचे व त्यांचे अधिकाऱ्यांचें घोडें पाणी पीत नसे शिवाय मि. राम राम हें जितके लोक प्रीय झाले नाहींत असे लोक प्रीय झाले. पाणी जें होतें तितकें तें झालें नाहींत असे लोक ह्मणतात परंतु त्यांचे अकंदर वर्तणुकीवरून ते अप्रीय होण्यासारखें नव्हतें असें आमचें मत आहे. आतां नवीन जागीं ते सर्वांना प्रीय होवो. त अशी आमची मनःपूर्वक आशा आहे हे इलिचपूर जिल्ह्यांत होते. तेथें मि. नोलीस बहादुर रजेवरील डेप्युटी कमिशनर यांचे त्यांचेवर जडला व त्यांनीं त्यांना इकडे आणून नायब तहसिलदारी दिली असें ह्मणतात. ह्या दिवसांत कोणी तरी मनुष्याला हातांशीं धरण्यास वशिला मिळाल्या शिवाय कोणाची भरभराट होत नाहीं असें लोकांचे एकंदर मत आहे. कसें ही असो पाऊसकाळची त्यांची बदली होऊन अशा प्रतिकूळ ऋतूमध्यें त्यांना प्रवासाचा त्रास झाला त्याबद्दल फार नाईट वाटतें.

येथें मे. इन्स्पेक्टर जनरल पोलीस यांची स्वारी आली आहे. व त्यांच्या ताब्यांतील कामाची तपासणी चालली आहे. आणखी किती दिवस सा. ब. येथें रहाणार हें समजत नाहीं.

मिस्तर यशवंतराव दिगे इंग्रेजी वकील अकोल्यास शेसन करितां गेले होते ते परत आले. चार आठ दिवसां पासून नूतन स्कीम मध्यें मे. जुडिशियल कमिशनर सा० बाहादुर यांचे कडून परत आलेली अपिलें निकाल करण्याची सुरवात झाली असें ह्मणतात.

सालमजकुरीं मुंबईकडे भरणाऱ्या राष्ट्रिय सभेस फक्त तिनच महिने राहिले तरी अजून त्याबद्दल ह्या जिल्ह्यांत कोठें चळवळ नाहीं. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे आर्यमातेची सेवा करणारे प्रिय पुत्र ह्या जिल्ह्यांत नाहींत काय! किंवा त्यांच्यानें अशा कामी लक्ष देववत नाहीं ज्ञान विभूषित स्वातंत्र प्रियआर्यमातेच्या भक्तानों उठा व येणाऱ्या राष्ट्रिय सभेस या जिल्ह्याचे तर्फे मुकत्यार पाठविण्याची तयारी करा आपले स्वातांचें पोट भरणें ते लहानापासून मोठ्या पर्यंत लागलेचे आहे परंतु ते काम करून अशा सार्व जनिक कामाकडे कांहीं तरी लक्षद्या. कांहीं वर्गणी जमा करून आपल्या मुंबई कडील बंधुनी मदतीची हात लावा अशा महतामहत कामा पासून पराङ्मुख होऊं नका गेल्या सालीं ह्या कामीं जी लोकांची तयारी दिसत होती ती इतक्यांतच कां लांपण्याचे पथांस लागावी अशी सार्वजनिक कृत्या विषयीं उदास होऊ नका व निष्काळजीपणा दखवूं नका मुंबईकडील आपल्या बांधवाचे शताश मानानें तरी अनुकरण करा. हिंदुधर्मात्री यांनी शेट सावकार जमेदार राजेलोकही गाईच्या रक्षणाची तजविज करण्या करितां सभा भरवा रिसोड सारख्या लाहानशा खेड्यांत ह्या कामी लोकांनी दाखविलेली कळकळ पाहून तरी जागे व्हावें कळावें लोभाकिजे हे विनंती.

आपला
"Justice."

वऱ्हाडसमाचार.

मिती भाद्रपद शुद्ध ७ शके १८११

सर्व हिंदुस्थानांतील जलसंबंधी वार्षीक रिपोर्टावर हिंदुस्थान सरकारचे ठरावावरून असें दिसून येते कीं सर्व हिंदुस्थानांतील तुरुंगांत व्यवस्था सन १८८८ सालांत कशी होती हे पाहण्याकरितां डा० वालकर व डा. लेपब्रीज यांची कमेटी नेमिली होती. तिच्या बद्दल फार बारकाईनें चौकशी होऊन त्या संबंधी रिपोर्ट आला आहे. त्याची तपासणी झाली आहे व त्यावर हिंदुस्थान सरकारच्या ज्या सूचना झाल्या आहेत त्या देखील लवकरच प्रत्येक स्थानिक सरकाराच्या हातीं येतील. ह्मणून हिंदुस्थान सरकारास स्वतः त्या बद्दल फार बारकाईनें तपासणी करणें जरूर दिसत नाहीं.

अपर बरमा खेरीज करून बाकीच्या इंग्लिश अमला खालील हिंदुस्थानांत सातशें

सदतीस तुरुंग आहेत. या वर्षांत मोठें जेल (central jail) मध्यें एक जास्त वाढविला आहे व (District jail) मध्यें दोन कमी केले.

वर्षारंभी असलेले कैदी लोक.

सन १८८८	१८८७
७५९२२	७६७३८

पंजाब प्रांत खेरीज करून बाकीच्या सर्व प्रांतांतून ह्या वर्षी १२००० पुरुष कैदी जास्त आले.

वर्षांत आलेले कैदी.

सन	एकंदर आलेले	पैकीं बायका
१८८८	४५९९१३	२१६८९
१८८७	४४८७४१	२२०५५

या वर्षांत ३७७७१८ इतके कैदी सोडून दिले. तारीख ३१ दिसेंबर सन १८८८ रोजीं जेलमध्यें असलेले कैदी ८२२३५ पैकीं २६९२ बायका.

अपराधी ठरलेलीं मनुष्यें या वर्षारंभीं ६९४-१८ होतीं, तींच गतसालीं ७०५९४ होतीं

सन १८८८ सालामध्यें झालेले कैद्यांची व्यवस्था—

काळपापाण्यावर पाठविलेले पुरुष २८१७ बायका ६३. अपिलांत सुटलेले १०२०५ शिक्षेची मुदत संपल्यावर सुटलेले १२८१९८

शिक्षेची मुदत संपल्यावर सुटलेले सन १८८७ सालांत सुटलल्या कैद्यांपेक्षां २०-६०० अधीक आहेत. शिक्षा माफ झालेले कैदी ८२६९.

जुबिली वर्ष ह्मणून सरकारनीं सोडलेले २६००० सन १८८८ सालीं कायते ४२३ कैदी लोक माफीत सुटले व ६९ वेड्याच्या दवाखान्यांत पाठविले गेले.

सन	१८८८	१८८७
पळून गेले	१०९	७६
फांशी गेले	३९६	२९९
मरण पावले	२४४४	२३५३

या प्रमाणें ता० ३१ दिसेंबर सन १८८८ रोजीं सजा भोगणारे ७५७६५ कैदी होते. त्यांपैकीं २४४१ बायका. १८८७ सालांत ६९४६८ कैद्यांपैकीं २२६८ बायका होत्या.

तारीख ३१ दिसेंबर १८८७ रोजीं १५५६४३ शिक्षा पावलेल्या कैद्यांपैकीं १३३२७७ लोक एक वर्षाच्या आंतील शिक्षेचे होते. यावरून असें दिसून येतें कीं लहानसहान गुन्हे फार झाले मोठे गुन्हे कांहीं फार झाले नाहींत. हें भूषणीय आहे.

६९१५६ लोकांनां सक्तमजुरीची शिक्षा झाली त्या पैकीं:—

२८६१० ....कारखान्यांतील काम करीत
८५३२ ....कैदीखान्यांतील खाण्याचे पदार्थ तयार करीत.
११६६ ....म्यु. पा. कडे काम करीत.
४७५३ ....कैदीखाने बांधणें.
३२०८ ....जेलची दुरस्ती
६९२१ ....तुरुंगांतील शिपाईगिरीचें काम करीत.
३०८७ ...कैद्यावरील अधिकारी.
४३४६ ....बागेकडे काम करीत.
१७६६ ....पब्लीक वर्क्स डिपार्टमेंट काम करीत.
१७८६ ....दुसरें काम करीत.

गुन्ह्याची संख्या प्रत्येक प्रांतांतील.—

प्रांत.	गुन्ह्याची सं. १८८८	गुन्ह्याची सं. १८८७
बंगाल.	२९०१४	३५८२४
वा. प्रांत	२७०१	३५१९
लो. बरमा	१२९३८	८३३१
पंजाब	१६५११	१५२०९

बंगालच्या आंकड्यावरून असें दिसून येतें कीं मागील वर्षापेक्षां त्या प्रांतांत या सालीं गुन्हे कमी झाले आहेत. त्यावरून तेथें पोलिसांनीं चांगला मेहनत घेतली असावी असें दिसत. जेलकायदा मोडल्याबद्दल जी शिक्षण होते ती लिहावी किंवा न लिहावी हा जो पुष्कळ दिवसांचा प्रश्न होता त्याची सुद्धां कमिटींनें चौकशी करून त्या विषयीं लिहिलें आहे. त्या रीतीमध्यें पुष्कळ फरक दिसून आले आहेत.

ज्या कैद्यांना फटक्यांची शिक्षा झाली आहे त्यामध्यें बराच फरक दिसून आला आहे असा फरक पूर्वीं कधींही दिसला नव्हता. गतसालीं २४३० लोकांनाही शिक्षा झाली परंतु यंदा १८९१ लोकांनाच झाली यावरून असें दिसतें कीं या संबंधीं हिंदुस्थान सरकारचे हुकूम चांगले पाळले गेले आहेत. ९००० पेक्षां जास्ती "विद्यार्थी कैदी" सोडले गेले. त्यांपैकीं ७५३ लोकांना चांगलें वाचतां येत होतें.

नामदार सा. गव्हरनर जनरल ह्मणतात कीं यावरील आंकड्यावरून मोठी सुधारणा झाली आहे असें दिसत नाहीं. व चालू रीतीनुसून बराच फायदा आहे असें त्यांना वाटतें.

एकंदर खर्च १८८८	एकंदर खर्च १८८७
४९२३९९६.	४५८४७७८

त्यांपैकीं सरासरी मनुष्यास खर्च स. १८८८-६२-२-९- सन १८८७-६४-९-१० प्रत्येक प्रांतातील दरअसामी खर्च.

१८८८.—	१८८७
मद्रास ३०-२-९	३९-८-९
पंजाब २४-५-४	२५-५-८
लो. बरमा. ३३-१२-१	३८-२-१०
मुंबई. २७-११-५	२५-२-१
बंगाल ११-१०-११	२०-५-०
वा. प्रांत १८-७-७	१८-०-०

जास्त खर्च लागण्याचें कारण इतकेंच कीं त्या वर्षीं धान्य महाग होतें आरोग्य यंदां गतवर्षीं पेक्षां जरी चांगलें नव्हतें तरी मरणाचें प्रमाण बरेंच कमी आहे.

गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होणें परम्यावा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनी अवलेह घ्यावा. गोड व अनुपाविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, शोकला होतो, मळमागानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 2 1889.

DISCIPLINE AND MORAL TRAINING IN SCHOOLS AND COLLEGES. IN INDIA.

We publish the following very important resolution of the Government of India regarding school discipline for the benefit of our readers:—

In the letter addressed by the Home Department to local Governments and administrations on the 31st December, 1887, their attention was drawn to the growth of tendencies unfavourable to discipline, and favourable to irreverence, in the rising generation in India; and the Governor-General in Council formulated for the consideration of local Governments and Administrations certain suggestions with the object of counteracting these tendencies. The recommendations related both to schools and colleges. For the former it was suggested:—

(1) That gymnastics and field exercises should be recognized as part of a regular course of school training, and that a system of marks and prizes for efficiency in gymnastics should be introduced;

(2) that punishments for breaches of discipline should be arranged so as to fall on the offender, and that with this aim the imposition of tasks, deprivation of privileges, a judicious use of the rod in the case of young pupils, add finally expulsion in cases of aggravated and persistent misconduct, are more suitable forms of punishment than fines;

(3) that good conduct registers should be prescribed, extracts from which should be sent to the parents and guardians of the boy at stated intervals with the definite opinion of the headmaster on his character and behaviour, and that prizes for good conduct should be awarded at the end of each year;

(4) that hostels and boarding-houses should be established at the larger schools and colleges in large towns and cities for the accommodation of students whose families are not resident in the place where they are being educated.

(5) that selected boys from the higher classes of schools should be appointed monitors for the purpose of maintaing discipline during, and as far as possible out of school hours;

(6) that any boy, who through want of diligence and attention to study, fails to rise to a certain class by the time he has reached a certain age should be required to leave the school.

7 that inter school rules, defining the conditions under which pupils should be allowed to pass from one school to another, should be extended to all schools, aided or supported by public funds, as a condition of the continuance of such aid; and that the Senates of the Universities should be invited to use their influence to procure the adoption of this system in schools and colleges which do not receive aid from Government.

8 that the provision of efficient training schools and colleges for teachers should be made a first charge against the educational grant; that the employment of teachers in all schools should be gradually restricted to those who have given satisfaction during a course of training; and that trained headmasters should be introduced from England for definite periods of five or seven years for selected schools; and

9 that teaching having a direct bearing upon personal conduct should be more generally resorted to The Government of India, while admitting that this is provided for in some aided schools by religious instruction, and that even in some State schools religious instruction can under well-recognized restrictions be granted out of school hours, considered that this was not sufficient, and it, therefore in concurrence with the Secretary of State, desired that consideration should be given to the proposal of the Education Commission that an attempt should be made to prepare a moral text-book based on the fundamental principles of natural religion.

In regard to methods for encouraging respect for authority in colleges, it wsa pointed out by the Government of India that an improvement in this matter in schools would naturally reproduce itself in colleges, which students would enter with habits formed and characters developed by the wholesome discipline of the schools. The Governor-General in Council, however pressed that an effort should be made to impart moral instruction in colleges, and with a view to improving the supervision of Principals and Professors over students in colleges, suggested the adoption of the following regulations:-

a that weekly meeting should be held by the Principal and the Professors to consider questions of discipline.

b that the Principal should have the power of ordering the expulsion or rustication of a student, and of fining him for disorderly conduct; and

c that every Professor should have the power of suspending a student for a limited period of time, and of fining him without reference to the Principal.

2. The Government of India has now been placed in possession of the views of local Governments and Administrations on the foregoing suggestions. There is substantial agreement both among officials and the representatives of the native community as to the existence of the evils which have been indicated. The tendency towards irreverence and disregard of authority has no doubt gone further in some parts of India than it has in others. But most of the conditions which have favoured its growth in the parts of India where it is most prevalent are in a greater or less degree noticeable in other less forward portions of the country; and the Governor General in Council entertains no doubt that remedies are necessary in those places in which the work is at present one of prevention, as well as in those in which it is one of cure. His Excellency in Council thinks that no profit will result from any further discussion as to how far the present state of things is due to defects in the system of education, and how far to forces either independent of, or antagonistic to, that system. The evil is admitted on all hands: and the problem is to find means by which the method of public instruction may be strengthened and improved so as to combat and overcome it. Holding these views the Governor-General in Council considers it matter for congratulation that local Governments and administrations and the representatives of the different native communities in India have generally accepted his suggestions with cordiality, and shown, by the earnest attention which they have devoted to the subject, their determination to remove the defects which have been brought to notice.

3 In proposing remedies for the evils admitted to exist, many local Governments and Administrations have felt themselves fettered by want of funds, and their recommendations are consequently in some cases not so far reaching as they doubtless would have been if financial difficulties had not interfered. In the matter of expenditure on public instruction in India the Governor General in Council desires to reaffirm the policy laid down in paragraph 17 of the Home Department Resolution No. 199 of 18th June, 1888, reviewing Sir Alfred Croft's Report on Education in India, and in accordance with that policy to state that the recommendations which follow, so far as they involve expenditure, should be carried into effect without im

posing any additional burden on Provincial finances. Where the funds necessary for the improvements suggested cannot be provided from local sources or private benevolence, they should be obtained by an enhancement of fees or by curtailing and readjusting existing expenditure.

4 Proceeding to deal with the suggestions enumerated in paragraph 1, the Governor General in Council observes that in Madras much has been done under the auspices of the Physical Training Association, and measures are under consideration in that Presidency with a view to making it a condition of aid or recognition that the organization of a school satisfies certain prescribed requirements in regard to a gymnastic course, school drill, and the maintenance of play grounds. In Bombay a liberal grant in aid is to be given to the Bombay Gymnastic society, which will provide for high schools in that city, while the question of providing for high schools elsewhere in the Presidency is being considered. The Bengal Government engages to provide play grounds and gymnasia so far as funds admit; and the proposals of the Indian Association that Government should supply gymnastic apparatus to all Government schools, that teachers of athletic sports should be appointed, and that a general competition in athletic sports should be arranged every year in district head quarters, are receiving consideration at the hands of the educational authorities. In the North Western Provinces and Oudh the question of physical education has lately been considered by a conference of educational officers; and his honor the Lieutenant Governor and Chief Commissioner engages to consider with favour any practical suggestions that may be made. In the Punjab it is intended to prescribe gymnastic courses for primary, middle, and high schools, and to permit boys to present themselves annually for examination in gymnastics, and to receive certificates if successful. Cricket and athletic tournaments, open to Government and aided schools and unaided schools subject to Government inspection, are to be promoted. In the Central Provinces all secondary and many of the primary schools have gymnastic apparatus, and the boys are drilled at all secondary schools. In Burmah physical exercise is so congenial to the tastes of the people, that special encouragement is not necessary to stimulate the boys to take part in athletics. In Assam gymnastic apparatus has been provided at most of the high schools; and it is further intended, if funds will admit to appoint three teachers of gymnastic to visit the high schools in rotation and to give a capitation allowance for proficiency. In the Hyderabad Assigned Districts gymnasia and teachers of gymnastics have been provided in many schools. The information thus summarized gives satisfactory proof that the local Governments and administrations appreciate the value of physical exercises, and are ready and willing to encourage them; and and it is believed that much can e done in this direction without incurring any large expenditure As a corollary to the action already undertaken, or about to be undertaken to promote physical education, a system of marks and prizes, which no doubt will be largely supplied by private liberality for proficiency in gymnastics and athletic sports, should be everywhere introduced where gymnasia and play-grounds have been attached to the schools, and the Governor General in Council trusts that local Governments and Administrations will on suitable opportunities endeavour to make arrangements to carry this suggestion into effect.

5. Indicating its views on the punishment of breaches of school discipline in paragraph 14 of the letter of 31 st December, 1887, the Governor General in Council left this question to the judgment and discretion of local Governments and administrations. At the same time he drew prominent attention to the suitability of corporal punishment as a punishment for boys who have not reached an age when such punishment becomes inappropriate, and where local sentiment is not very pronounced against it. It appears from the replies now received that corporal punishment is generally recognized as suitable in cases of aggravated misconduct. The prevailing opinion also is strongly against the abolition of the system of fining, which is defended as being helpful towards securing punctual attendance. His excellency in Council accepts the general opinion on both points, and desires that effect should be given to it. Without desiring that a code of offences and punishments should be drawn up, to which every breach of discipline should be directly reducible His Excellency in Council considers that punishments in schools and colleges should take such forms as loss of position in the class, impositions, exclusion from lessons, suspension from attendance, money fines, corporal punishment, and as a final resource, expulsion. It will be for the various local Governments and administrations acting through their educational departments to lay down for the guidance of masters such rules as may be considered desirable to enforce a discreet use of the different forms of punishment.

6 The suggestion for the maintenance of good conduct registers has been generally well received. The Bengal, North Western Provinces and Oudh, and Central Provinces Governments agree to the introduction of such registers in the manner proposed in the Home Department circular letter. In Bombay the experiment is to be tried under selected headmasters. In Burmah registers are to be opened in all Government schools; in time they may be prescribed in aided schools, but in this province it seems premature to insist on this at present. In Assam a start has already been made in keeping good conduct registers, in giving prizes for good conduct, and in making every boy appear periodically before the headmaster and the system is to be further extended. In the Punjab the authorities are opposed to opening good conduct registers, and to giving prizes for good conduct; but they propose to attain the objects in view by directing that certificates ar to be given for good conduct, and that serious cases of bad conduct are to be reported to the parent or guardian of the offender. The Government of Madras is adverse to the system on the ground that the moral defects of students and of school boys are not such as can be marked by registers of conduct, and deprecates the suggestion that attention should be given to good conduct registers in selecting candidates for the public service on the ground that it would be cruel and unjust to place on permanent record the faults committed in early youth. While admitting that there is force in the last objection, the Governor-General in Council considers that it may be met by headmasters refusing extracts of the earlier entries in the registers which would produce an unfair impression of the pupil's real character, or adding such remarks as would prevent their having this effect. Generally speaking, extracts from these registers of conduct, although not conclusive as to a boy's conduct except during school hours, will obviously afford more useful information to employers to whom he offers his services than the certificates of character now generally given; and from this point of view they will probably not be without their use to Government officers in selecting candidates for the public service. His Excellency in Council, therefore, trusts that the Governments of Madras and the Punjab will follow the example of other provinces by introducing a system of good conduct registers.

7 The advantages of well conducted boarding houses attached to the higher schools and colleges for students who do not live with relations or friends, at which the example and personal influence of their teachers can be brought to bear upon the students out of school hours, are generally recognized. The obstacle which has generally prevented the extension of the system is the expense which it involves. The Madras Government would be glad to see the experiment tried by private agency, but considers its success too doubtful to justify the expenditure on it of public funds. In Bombay provision will be made at the few Government colleges that exist for the enforcement of stricter discipline and for the residence at or near the college of the Principal or a Professor. The further extension of the residential system will be left to private liberality. The establishment of hostels is an essential part of the educational policy of the Governments of Bengal and Assam, where funds are available, and the public has occasionally contributed towards such foundations. In the North Western Provinces and Oudh every district school and college has a boarding house attached to it and they are all full. Sir Auckland Colvin is not in favor of the extension of the system to schools at the head quarters of tahasils, because he is not satisfihd that they would be properly supervised. In the Punjab the boarding house system is very widely extended; and the Lieutenant Governor contemplates authorising local bodies to require that outstudents attending a school to which a boarding houses is attached should live in it provided there is accommodation, unless they are living with relatives or friends of their parents or guardians and are considered by the headmaster to be under healthy influences. In the Central Provinces local bodies will be requested to improve or enlarge existing boarding houses where the accommodation is bad or insufficient. In Berar several boarding houses with accommodation for resident masters have been established, and it is proposed to increase their number. The Governor General in Council recognizes the willingness of local Governments and Administrations to do what is required in the provision of boarding houses. The State already bears a disproportionate share of the expenditure on high education; and the obligation of providing boarding houses where they do not exist is one which local Governments and Administrations are naturally loth to accept. It is an appropriate object for private liberality which should be encouraged to regard it as worthy of its benefactions.

(To be continued)

वऱ्हाड.

रा.रा. बाळकृष्ण लक्ष्मण नापट डे० ए० इन्स्पेक्टर उमरावती यांनीं नऊ महिन्याच्या फर्लोचाबद्दल रा. रा. बळवंत नरसिंह मुंबाळकर डे० ए० इ० बुलढाणे यांनीं पावणे दोन महिन्याच्या हक्काच्या रजेचा अर्ज केला आहे.

रा. रा. नापट यांचे जागीं रा. निळकंठराव भट. त्यांचे जागीं रा. रा. जनार्दनपंत नातू, त्यांचे जागीं रा. रा. कृष्णाजी मल्हार यांस नेमलें.

अकोट म्युनिसपालिटीचे कारकून मि० आनंदराव बाळकृष्ण याजवर कमिटीचा पैसा (सुमारें हजार रुपये खाल्ल्याबद्दल आरोप असून खटल्याची चौकशी येथें मे० डेव्हिस साहेब स्पे० अ० कमि० यांजपुढें चालूं आहे आरोपी तर्फे वकील रा० गणपतराव खापरडे हे आहेत. गेल्या सोमवारीं व मंगळवारीं हा खटला चालला होता. व पुनः परवां सुरू होणार आहे.

मि. एटकीन येथील हायस्कूलचे हेडमास्तर यांनीं दोंड महिन्याचे हक्काचे रजेचा अर्ज केला असल्याचें समजतें.

परीक्षा— हायस्कूल क्लास परीक्षा ता० ९ अक्टोबर; हायस्कूल प्रवेश परीक्षा ता० ४ नोव्हेंबर. ट्रेनिंग कॉलेज वार्षिक व सर्टिफिकेट परीक्षा व प्युपिल टीचर परीक्षा ता० ९ अक्टोबर. ट्रेनिंग कॉलेजे प्रवेश परीक्षा, अंग्लो ऊर्दू स्कूल प्रवेश परीक्षा व मिडल क्लास स्कूल स्कॉलरशिप परीक्षा ता० ४ नोवेंबर, व्हर्न्याक्युलर स्कालरशिप परीक्षा ता० २ जानेवारी रोजीं सुरू होतील.

एज्युकेशनल कान्फरन्स उमरावती येथें तारीख ११ नोवेंबर रोजीं सुरू होईल.

मि० सुबराव तहशिलदार मोर्शी यांनीं ६० दिवसांची रजा घेतली व त्यांचे जागीं रा० रा० बाळकृष्ण बळवंत मुळें बी. ए. उमरावती स्मा. का. कों चे क्लार्क यांस नेमलें.

रा० रा० कृष्णाजी हरी तहशिलदार अकोलें यांच्या रजेत त्यांचे जागीं रा. रा. गोपाळ बळवंत ना० तहशिलदार केळापूर यांस नेमलें.

मि० सो० शामराव अब्याची यांची बाशिमास नेमणूक झाल्याप्रमाणें ते हैद्राबादहून येऊन आपलें कामावर रुजू झाले.

उमरावती येथील गोरक्षक सभेचे कामास आरंभ झाला गो शाळेसाठीं गंब्रापूरचे मारुतीचे देवळांतील पटांगण घेतलें आहे. गाई ठेवण्यासाठीं एक मोठें छपर तयार होत आहे. सभेच्या कचेरीसाठीं ही तेथें जागा तयार करण्याचें ठरलें आहे.

येथील नारायण लक्ष्मण कानींतील नोकर किसन गुरव याजपाशीं दुकानांतील कांहीं कापड चोरलेलें सांपडलें. त्यावरून त्यानवर गेल्या आठवड्यांत मुकदमा होऊन त्यास १०० रुपये दंड व २ वर्षे कैद अशी शिक्षा झाली.

वर्तमानसार.

ब्रह्मवर्तीहून आमचा एक मित्र कळवितो कीं, तेथून सुमारें ६ कोसांवर पार्धी लोकांनीं एक रानटी मूल पकडलें आहे. हें मूल तीन महिन्यांचें असतां एका लांडगीनें धरून नेलें आणि त्यास ठार न मारतां आपल्या पिलांबरोबर आपल्या आंगावर पाजून वाढविलें. तें नेहमीं लांडगीच्या बिळांत राही. पार्धी लोकांस एकवार या मुलाचा सुगावा लागल्या वरून त्यांनीं त्या लांडगीचें बीळच खणलें त्या वेळीं आंतून दोन लांडग्यांचीं पिलें व तिसरें हें मूल निघालें याचें वय सुमारें ६ वर्षांचें आहे. तें बिळाबाहेर आल्या बरोबर रानामाळ पळत सुटलें पण अखेर पकडलें गेलें. यांस बोलतां चालतां येत नसून त्याचे डोळे लाल आहेत. चार पायावर चालतें! कच्चे मांस मात्र खातें. बाकीचे पदार्थ हुंगून टाकतें. हें हल्लीं पिंजऱ्यांत ठेविलें आहे. तें इतकें बळकट आहे कीं, १६।१७ वर्षांच्या मुलाचा हात त्याच्या तावडींत सांपडला तो सोडविण्यास त्या मुलांस मोठी पंचाईत पडली!! अशीं उदाहरणें याच्या मागें ही बरींच घडून आलेलीं आहेत पण यावरून रानटी व हिंसक पशूंतही भूतदया असते असें अनुमान काढतां येतें. पु.

लंडनमधील गोदींतील मजूर लोकांचा कट अद्यापि जारी असून त्यांत तीस हजार लोक सामील झाले आहेत. अद्यापि दंगा किंवा दांडगाईचा प्रकार झाला नाहीं. काम बंद झाल्यामुळें व्यापाऱ्याची मोठी गैरसोय झाली आहे असें लंडनच्या ता० २१ च्या तारेवरून समजतें.

अमेरिकन लोकांनीं इंग्रज सरकारच्या दोन बोटी फिशरीस जाग्यामध्यें धरल्याबद्दल ब्रिटिश कोलंबियामध्यें लोकांत मोठी अव्यवस्था झाली आहे असें लंडनच्या ता० २१ च्या तारेवरून समजतें.

क्रीटच्या बेटांत लोकांच्या व लष्करी लोकांच्या जागोजाग मारहाणी व हल्ले व्हायांस लागले आहेत असें समजतें.

त्रावणकोरचे महाराज प्रिन्स अलबर्ट विक्टर यांच्या अदरातिथ्यापीत्यर्थ दोन लक्ष रु० खर्च करणार आहेत असें समजतें.

प्रिन्सबिस्मार्क व कौंट कालनाकी यांचा एकांत होऊन जर्मनी व आस्ट्रिया याजमधील तहनाम्यांच्या शर्तींत महत्वाचा फेरफार झाला.

मि. बेन्स यांणी सिमल्यास जाऊन आपल्या मनुष्य गणतीच्या कामाची सुरुवात केली असें समजतें.

काश्मीरच्या संबंधानें सपासरी अखेर निकालच झाला. महाराजांस राज्यकारभार चालवितां येत नाहीं सबब त्यांस पदच्युत करून चार वर्षांच्या करारानें कौन्सिल नेमिलें आहे. पुढें काय परिणाम होणार असेल तो खरा. श्री. मल्हाररावासारखाच व कांहीं अंशीं त्यांजपेक्षां ही वाईट प्रकार झाला. इंग्रज सरकारावर राजेरजवाडे व इतर प्रजा यांस भरंवसा ठेवणें फार कठीण पडेल. हें प्रकरण डफरिन साहेबांच्या कारकादींतच शिजून तयार होतें.

प्रिन्स आलबर्ट विक्टर यांची स्वारी नोवेंबरच्या आरंभीं येऊन लागलींच पुण्यास जाणार, तेथें कांहीं दिवस राहून हैदराबादेस जाणार, गायकवाड यांणी त्यांस बडोद्यास बोलाविलें आहे असें समजतें. मार्चमध्यें ते परत विलायतेस जातील.

इराणच्या दरबारांत इंग्रज व रशिया यांच्या खटपटी चालल्या आहेत. त्यांत अलीकडे इंग्लंडचें विशेष मित्रत्व व्हावें अशा करितां उद्योग चालला होता त्या संबंधानें नोवोव्रेम्या या रशियन पत्रांत असें उद्गार प्रसिद्ध झाले आहेत कीं शहांच्या प्रधानानीं प्रयत्नकेला; परंतु शहाच्या मनांत तसें करणें बरें नाहीं. असें वाटतें. शाहा हें समजत असून आमच्या प्रामाणिकपणाचा अनुभवही त्यांस आला आहे तेव्हां ते इराणच्या व रशियाच्या हिताकरितां हाल चाल करणार नाहींत असें वाटतें. असें ते पत्रकर्ते ह्मणतात. सु० प०

गरीब लोकांचे दारिद्र्यनिवारणार्थ एका अमेरिकन सावकारानें काढलेला उपाय.—प्रथमतः ३०,००० रुपये व्याजीं लावावे. दोन शेतकेंपर्यंत हें असेंच ठेविलें ह्मणजे ही रक्कम ५५२६२२०८०००० इतकी होईल. आणि पुन्हां ही रक्कम शेंकडा ४ या दराप्रमाणें व्याजीं लाविली ह्मणजे सालास २२०९४६७३२०० इतकें व्याज महाप्रलयापर्यंत मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं, व इतक्या व्याजांतून हजारों गरीब लोकांस मदत करितां येईल.

भोर येथील फडणवीसांच्या घरांत एकवीस बावीस वर्षांचा मुलगा आहे, त्याच्या नजरेस चिरकुटाची बाहुली पडली कीं, त्याची भीतीनें गाळण होऊन जाते. एखादे वेळेस ते माडीवर बसला तर माडीवरून उडी घेण्याच्या देखील तो धांवतो. दी० बं०

लंडन येथील बंदरावरील ३०,००० बिगारी काम सोडून बसले आहेत. कारण समजलें नाहीं.

मध्यप्रांताच्या सर्व खात्यांतील बरेच लोक लौकरच ब्रह्मदेशांत जाणार आहेत असें सांगतात. तिकडे सर्वेचें काम सुरूं करावयाचें असेल.

लंडन येथील बंदरावरील ३०,००० बिगाऱ्यांनीं आपलें काम सोडलें असून त्यांची संख्या वाढण्याच्या बेतांत आहे. अद्याप ते सर्व शांततेंत आहेत, पण त्यांच्या जागीं दुसऱ्या बिगाऱ्यांची नेमणूक करूं लागल्यास गडबड होण्याचा संभव आहे. या लोकांनीं काम सोडल्यामुळें पुष्कळ गलबतें रिकामीं करण्याचीं व भरण्याचीं खोळंबलीं आहेत.

शेतें खाणारे टोळ मध्यहिंदुस्थानांतून मुंबईकडे भराऱ्या मारूं लागले असून अजमीरचा एक गृहस्थ सांगतो कीं, तिकडे आगगाड्या चालविणारांसही या टोळांपासून इजा होऊं लागली आहे, इकडे न येवोत ह्मणजे झालें.

मुली कोणत्या वयापर्यंत संरक्षण केल्या पाहिजेत याविषयीं युनायटेट स्टेट प्रांतांत वेगळाले नियम आहेत. एका प्रांतांत ७ वर्षें वयाची मुलगी असून कांहींत दाहा, कांहींत १२ व कांहींत १४, १५ व १६ अशी आहे आणि कांहीं प्रांतांत मुळींच कांहीं नियम नाहीं, यावरून हिंदुस्थानांत अष्टवर्षा भवेत् कन्या असें जें ह्मटलें आहे त्यास बळकटी येत नाहीं काय!

विलक्षण गोष्ट—दक्षिण अमेरिकेंत जेम्स इव्हेरिल ह्मणून एक पोस्ट मास्तर व मा मार्क्सवेल ह्मणून एक खंबीरबाई अशी रहात होती. या दोघांनीं एका चोरांच्या टोळीचे मदतीनें शेजारच्या लोकांची गुरें चोरून आणण्याचा कारखाना चालविला होता. या धंद्यावर ते गब्बर झाल्यामुळें त्याच्या वाटेस पुष्कळ दिवस एकाएकीं लोकांच्यानें जावेना; परंतु त्यांचा हा क्रम जेव्हां फारच वाढला आणि लोकांचीं गुरें उरेनांशीं झालीं, तेव्हां त्यांणी आपली एक टोळी तयार केली आणि अकस्मित हल्ला करून त्या दोघांस ही पकडून एका जंगलांत नेलें, आणि तेथें त्याला झाडाच्या खांदीस गळफांस लावून फांशिची शिक्षा दिली. मरणापूर्वी त्या बाईनें अशी प्रार्थना केली कीं, मी मरतेंच, परंतु माझ्या आईला दुःख होईल ह्मणून कृपा करून झालेल्या गोष्टीची परिस्फुटता मात्र करूं नका!!

काबूलचा अमीर हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांचा फार तिरस्कार करितो. कोणत्याही देशाला संकटें उत्पन्न होतात तीं वर्तमानपत्रामुळें होतात, अशीं त्याची चमत्कारीक समजूत असून हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें नेटिव संस्थानाच्या अधःपातास मात्र कारणीभूत आहेत असें तो समजतो; आणि या करितांच काबुलांत जाणाऱ्या वर्तमानपत्राच्या प्रत्येक प्रतीवर त्यानें ५।५ रुपये कर बसविला आहे असें समजतें अमिराच्या शहाणपणाचा कळस आहे कीं नाहीं अमीर अब्दुल रहिमान याच्या ताब्यांत हिंदुस्थान नाहीं ह्मणून बरें आहे!!

नवीन शोध— अमेरिका खंडांत नवीन नवीन उपयुक्त व आश्चर्य कारक शोधांचे तुंबिपिकच आलें आहे. टेलिफोन यंत्र ह्मणजे ज्याणें फार दुरच्या अंतरावरील भाषण तारेंतून चांगल्या रीतीनें ऐकण्यास येतें, त्याचा अनुभव इकडच्या लोकांस थोडा बहुत आहेच. अशाच प्रकारचा दूरस्थ ठिकाणचा देखावा स्पष्ट रीतीनें तारेंतून दिसण्याची कल्पना एडिसन नामक अमेरिकन शोधकानें काढिली असून त्यालाही मागें टाकणारा एम केर्टनें नांवाचा एक फ्रेंच वस्ताद्जी भेटला आहे. त्याचें ह्मणणें तारेला दुसरी जरी किती ही कामें असलीं. तरी आपण काढिलेल्या युक्तीनें हजारों मैल अंतरावरील देखावा त्यांतून दुसरीकडे दाखवितां येईल. हे गृहस्थ चालू वर्षाच्या अखेरीसच आपली युक्ति प्रचारांत आणून दाखवणार आहेत असें समजतें. या प्रमाणेंच अमेरिकेंत विद्युत्साधनें अति त्वरेनें टपाल नेणारी एका रुळा वरून जाणारी गाडी तिकडच्या पोष्टानें काढिली आहे. या गाडीनें न्युयार्क येथील टपाल तेथून २३० मैल अंतरावरील बास्टन शहरीं एक तासांत नाऊं शकेल!! ही व्यवस्था प्रथम टपालचीं पत्रें नेण्या पुरतीच आहे, परंतु कांहीं काळानें या विद्युत्शकटांतून टपालाबरोबर मनुष्येही जाऊं शकतील, असें प्रोफेसर डोलवे अर यानीं थोडेच दिवसां पूर्वी बास्टन येथें खात्री पूर्वक सांगितलें. ह्या शोधकांची कल्पनाशक्ति पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं!

न्या० सिं०

गोगलगाईचें तारायंत्र.

हजारों कोसांवरचा मनुष्य या वेळीं काय करीत आहे, हें योग्याभ्यासानें सांगतां येतें. फलाण्या मनुष्यानें आतां माझ्या भेटीस यावें ह्मटलें कीं तो येतो. अमक्या मनुष्याचा रोग आतां बरा होईल ह्मटलें कीं बरा होतो. ह्मणजे एकंदरींत योग्याच्या तोंडांतून जीं जीं वाक्यें निघतात त्या त्या प्रमाणें सृष्टींत परिणाम घडून येतो.

जस्ताच्या, पितळेच्या किंवा लांकडाच्या २६ डब्या कराव्यात. आणि त्यांस चाळणी प्रमाणें सर्वत्र छिद्रें पाडावींत. नंतर प्रत्येक डबीवर ए. बी. सी. डी. या प्रमाणें इंग्रजी २६ अक्षरें ठळक अशीं घालून ठेवावींत. नंतर बावन्न जिवंत गोगलगाई धरून आणाव्यात. आणि प्रत्येक डबींत दोन दोन प्रमाणें घालून ठेवाव्यात. व आंत त्यांस खावयासाठीं कांहीं चिखल व शेवाळ ही घालून ठेवावींत. आणि मग सर्व डब्यावर झांकण घालून त्या डब्या आठ पंधरा दिवस तशाच झांकून ठेवाव्यात. आठ पंधरा दिवस गेले ह्मणजे त्याच मासल्याच्या आणखी सव्वीस डब्या तयार करवाव्यात. आणि त्यांतील प्रत्येकीवर पहिल्याप्रमाणेंच पुन्हा ए. बी. सी. डी. इत्यादि सव्वीस अक्षरें लिहावींत. तसेंच वरच्याप्रमाणें याही डब्यांस छिद्रें ठेवण्यास विसरूं नये. नंतर पहिल्या गोगलगाईनें भरलेल्या डब्या उघडाव्यात आणि ए डबींतील दोन गोगलगाईपैकीं एक गोगलगाय काढून नव्या डब्यांतील ए.मध्यें घालावी. तसेंच बी. डबींतील दोन गोगलगाईपैकीं एक गोगलगाय काढून नव्या बी. डबींत घालावी. याप्रमाणें प्रत्येक अक्षरांतील एक एक गोगलगाय काढून नव्या अक्षरांत घालावी मात्र अदलाबदल करतांना अक्षरें न चुकतील अशी दक्षता ठेवावी. या प्रमाणें कृत्य झालें, ह्मणजे अर्थातच ५२ डब्याचे दोन सेट तयार होतात. मग त्या सेटांतील एक सेट आपल्या मित्रापाशीं देऊन त्यास कोणत्याही दूर स्थळीं पाठवून द्यावें; व एक सेट आपल्यापाशीं ठेवून घ्यावा. व त्याच वेळीं अमक्या दिवशीं अमुक वेळीं प्रथम मी तुला बातमी पाठवीन, नंतर तूं मला पाठव. असा संकेतही करून ठेवावा. प्रत्येकानें आपल्यापाशीं मूठ बातलेली लोखंडाची तुळतुळीत दाभणासारखी एक एक सळई, एक पेन्सील व एक कागद ठेवावा. नंतर विवक्षित समई उभयतांनींही आपापल्या डब्या उघडून बसावें नंतर ज्यास बातमी घालावयाची असेल, त्यानें ती लोखंडाची सळई हातांत घेऊन जे अक्षर प्रथम घालावयाचें असेल, त्या अक्षराच्या डबींतील गोगलगाईस हलकेंच टोंचावें. ह्मणजे ती हालूं लागतें. व ती हालूं लागली कीं आपला मित्र ज्या गांवीं अगर स्थळीं त्या डब्या उघडून बसला असेल तेथें त्याच अक्षराच्या डबींतील गोगलगाय चलनवलन करूं लागेल. या प्रमाणें ज्या ज्या क्रमानें गोगलगाई हालतील, तीं तीं अक्षरें पेन्सलीनें कागदावर उतरावींत. ह्मणजे घातलेला सर्व मजकूर वाचावयास मिळतो. याच कृतीनें हवी तेवढीं बातमी हवी तेथें तारेनें वगैरे कोणताही संबंध जोडल्याशिवाय घेता येते. याचें कारण यवढेंच कीं त्या दोन्ही जीवांस तादात्म्य प्राप्त होतें!! सु० सिं०

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.....८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरे खेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 2R
per line over10... 4 as
Repetition pe line 3as

VOL XXIII | AKOLA MONDAY 9 SEPTEMBER 1889 | NO. 53

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ९ माहे सप्टेंबर सन १८८९ इ० | अंक ३५

पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते यासः—

वि. वि. आपल्या सुंदरपत्रांत खालील चार ओळीस जागा मिळेल अशी आशा आहे.

ह्या शहरांतील राहिवाशी जनांचे कमनशिबानें बाहेर गांवाहून येणारा किराणा जिन्नस उत्पन्न होणाऱ्या ठिकाणापासून ज्या स्थितींत निघतो त्याच स्थितींत गिऱ्हाईक लोकांचे हातीं क्वचितच पडतो. मूळ किंमतीपेक्षां दुप्पट अथवा कधीं कधीं चौपटही दाम घेऊन सुद्धां आमच्या व्यापारी लोकांचें समाधान न होतां आपली तुंबडी भरण्याच्या आशेनें शुद्ध मालांत वाईट साईट व नासधूस झालेल्या मालाची कमी अधिक प्रमाणानें भेसळ करितात असें बहुधा दिसून येतें. परंतु प्रामाणिकपणा अथवा ज्याला व्यापारांत सचोटी असें ह्मणतात त्या सचोटीस आमचे व्यापारीलोक काळीमा लावीत नाहींत काय? पुणें मुंबई इत्यादि ठिकाणच्या लोकांनीं येथें यावें आणि तिकडे हमेषा मिळणारा सुरेख माल इकडे कधींसुद्धां दृष्टीसही पडूं नये ह्मणून दिलगिरी दाखवावी ही आमच्या सभावीत ह्मणवून घेणाऱ्या व्यापाऱ्यांस मोठी लांछनास्पद गोष्ट आहे.

धान्य अथवा कडधान्य इत्यादि अप्रवाही पदार्थांत वाईट जिनसांची भेसळ झाली असतां गिऱ्हाइकांस त्याच्यांतून निवडानिवड करितां येते परंतु तुपा तेलासारख्या पातळ पदार्थांत जर भेसळ झाली असेल तर मात्र निरुपाय! परंतु अशा पदार्थांत सुद्धां आमचे व्यापारी आपली कारवाई करण्यास मागें पुढें पहात नाहींत असें दिसतें. शुद्ध खोबऱ्याचे तेल फारच थोड्या दुकानांतून मिळत असेल. ह्या तेलाची अशुद्धता आमचे मेंदु तरतरीत ठेवण्यास व रक्त शुद्ध ठेवण्यास बरेच अडथळे करीत असेल. ह्या तेला पेक्षां अधिक महत्वाचें गोडें तेल होय; परंतु परवां एके ठिकाणीं अशी गोष्ट घडून आली कीं, फोडणी करितां तापलेल्या भांड्यांत तेल टाकिलें असतां एकदम भडका होऊन त्याच्या धुरास रॉकेल तेलासारखा फपका मारीत होता. तें घर उंच असल्या कारणानें मोठा खैर झाली नाहींतर मोठा अनर्थ झाला असतां. ह्यावरून असें दिसतें कीं, आमचे उदीमदार लोक खाण्याचे तेलांतसुद्धां अकरातकर करण्यास भीत नाहींत. मनुष्याच्या प्राणास अपायकारक अशी सुद्धां गोष्ट स्वहिताकरितां करण्यास जर ते मागें पुढें पहात नाहींत तर त्यांच्या धैर्याची व आपमतलबीपणाची कमालच होय!

अशा प्रकारचे अन्याय व अविचारास अंजन देण्याचें काम आमच्या म्युनिसिपालिटीचें अथवा पोलिसचें आहे. परंतु आमच्या मु० आपल्या घरचेंच थोडें झालें असल्या कारणानें व्याह्यानें घाडलेल्या घोड्याची दाद कोठून लागणार? आमचे पोलिस तर आपल्याच आढ्यतेंत गुंग त्यांस तरी अशा गोष्टीकडे लक्ष पोहोंचवण्याचें कोठून सूचणार? तेव्हां आपण आपलीच कांहीं तरी व्यवस्था पाहिली पाहिजे. येथील तुरुंगांत निघणाऱ्या गोड्या व खोबरेल स्वच्छ तेलाचा उपयोग करण्याचा जर आमचे लोक निश्चय करितील तर त्यांना ह्या हमेष उपयोगांत येणाऱ्या वस्तूबद्दल काळजी करण्याचें कारण रहाणार नाहीं. व आमच्या व्यापारी लोकांसही जरा वचक राहील. त्या तेलाचा गोरगरीब लोकांस हा उपयोग करितां येईल अशी व्यवस्था आमचे सरकार करील तर बरें होईल. कारण वाईट तेलाचा खप गरीब लोकांत करण्याची व्यापारी लोकांस फार सवड असते.

आपला
"सूचक."

पाचवी राष्ट्रीय सभा.

(ता० २६ दिसेंबर १८८९ रोजीं मुंबईस होणारी.)

(ता०२६ च्या अंकावरून पुढें चालू)

परंतु हा उद्योग सफल होण्यास सर्व लोकांनीं एक दिलानें परिश्रम केले पाहिजेत. एका गांवांतील, शहरांतील, जिल्ह्यांतील किंवा प्रांतांतील लोक जरी एकत्र जमले तरी सर्व देशाच्या संबंधानें ज्या सार्वत्रिक गोष्टी असतील त्या बाबतींत त्यांच्या ह्मणण्याकडे आपले सार्वभौम राज्यकर्ते फारसें लक्ष देणार नाहींत. प्रांतांतील लोकांच्या तक्रारी ऐकण्यास प्रांतीय सरकार तयार होईल, व अशा प्रकारची खटपट आपण प्रांतीय सभेमार्फत करीत आहोंच. परंतु एकंदर देशांतील लोकांची दाद लावावयाची असेल तर देशांतील सर्व लोकांनीं एकत्र मिळूनच उद्योग केला पाहिजे. आतां वीस कोटी लोक एकत्र जमून आपलीं दुःखें सरकारास कळवूं शकतील असा मुळींच संभव नाहीं. यासाठीं ह्या लोकांतील ठिकठिकाणच्या प्रमुख मंडळीस तेथील लोकांनीं मुखत्यार नेमून पाठविलें आणि या मुखत्यारांची सभा भरून तिच्या द्वारें सरकारास आपलीं सुखदुःखें कळविलीं तरते सर्वत्र प्रजेचे विचार आहेत असें होऊन सरकार त्यांजविषयीं विचार करूं लागेल. शिवाय आपलीं दुःखें अशा व्यवस्थित रीतीनें सरकारापुढें आपण मांडलीं असतां आपल्या देशाच्या राज्यकारभारांत आपला प्रवेश होण्यास आपल्या अंगीं ज्या गुणांची अवश्यकता आहे ते गुणही आपल्या अंगीं आले आहेत असें सरकारास कळून येईल. मोठमोठ्या इंग्रजी मुत्सद्यांनींही अशा तऱ्हेच्या संस्था हिंदुस्थानांत निघाल्या शिवाय राज्यकर्त्यांचें व आपले एकदिल होऊन सरकारच्या राज्यास चिरस्थायीपणा येणार नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. तेव्हां आतां आपण स्वीकारलेला मार्ग कोणत्याही रीतीनें राज्यनीतीस विरुद्ध आहे अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

आज चार वर्षें झालीं. प्रतीवर्षीं वरील हेतु मनांत धरूनच राष्ट्रीय सभा भरविण्यांत येत आहे. ह्या सभेस हिमालयापासून तों रामेश्वरापर्यंत आणि इकडे सिंधु नदीपासून तों ब्रह्मदेशापर्यंत एकंदर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून विद्वान् पुढारी लोक आपल्या प्रांतांतील प्रजेचे मुखत्यार ह्मणून निवडले जाऊन जमत असतात. आजपर्यंत अशा सभा चार वेळ झाल्या. पंढा पांचवी मुंबई येथें व्हावयाची आहे. या सभांस जे लोक सभासद होऊन येतात त्यांत सर्व धर्मांचे सर्व जातींचे व सर्व दर्जांचे लोक असतात. मुसलमान, पारशी, यहुदी ख्रिश्चन, ब्राह्मण मराठे, लिंगाईत वगैरे निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे लोक, तसेच सरदार, कौन्सलचे मेम्बर, वकील, ब्यारिस्टर, सावकार, जमीनदार, व्यापारी, शेतकरी वगैरे निरनिराळ्या धंद्यांतील हुशार व कळकळ बाळगणारे विद्वान् लोक या चारही सभांस आले होते, आणि त्या ठिकाणीं पुष्कळ वादविवाद होऊन सर्वांच्या विचारे प्रजेचें हित ज्या ज्या व्यवस्थेनें होईल असें ठरलें तीच व्यवस्था योजण्याविषयीं सरकारास शिफारस करण्यांत आली आहे. यावरून या सभेचें केव्हढें महत्व आहे व तिजपासून केव्हढा उपयोग आहे हे सर्वांच्या लक्षांत येईल. या आपल्या हिंदुस्थान देशांतलि निरनिराळ्या प्रांतांत विद्वत्तेबद्दल व लोकहितार्थ श्रम करण्याबद्दल ज्यांची ख्याति आहे असे सर्व लोक या सभेस येतात. सुरेन्द्रनाथ बॉनरजी, कालीचरण बॉनरजी, डब्ल्यु. सी. बॉनरजी. शशी कुमार घोस, बिपिन बिहारी लाल, राजेन्द्रलाल मित्र, नरेंद्रनाथ सेन, पंडित अयोध्यानाथ, राजा रामपाळसिंग, दादाभाई नवरोजी, फेरोजशाह मेरवान्जी मेथा, काशीनाथ त्रिंबक तेलंग, बद्रुद्दिन तयबजी, वीर राघवाचार्य, सुब्रह्मण्य अय्यर, राजा सर टी माधवराव, सरदार दयालसिंग, एडवर्ड नार्टन, जान आडम वगैरे सारखे थोरथोर गृहस्थ या सभेचे आधारस्तंभ असून, हिंदुस्थानास आपली जन्मभूमि मानून तिच्या हिताकरितां तन, मन व धन खर्च करण्यास तयार असलेले हिंदुस्थान सरकारचे माजी होम सेक्रेटरी मि. ए. ओ. ह्यूम ह्या सभेचे मुख्य चिटनिस आहेत. तेव्हां त्या सभेच्या योग्यतेविषयीं खात्री करण्यासाठीं वेगळीं प्रमाणें देण्याची अवश्यकता नाहीं. इंग्लंडांतील कित्येक निःपक्षपाती मुत्सद्यांनीं तिची थोरवी वर्णन केली आहे; आणि तिचें काम कसें काय चालतें हें पाहण्यासाठीं मुद्दाम हिंदुस्थानांत आलेले पार्लमेन्टचे बडे सभासद केनसाहेब व स्मिथसाहेब तिची व्यवस्था पाहून संतुष्ट होऊन गेले आहेत. अशली सभा उगीच कांहीं तरी सोंग असेल अशी कल्पनाहीं मनांत आणूं नये.

असें जरी आहे तरी ही सभा एकाच जातीच्या लोकांनीं काढली आहे आणि हिजपासून तेवढ्याच लोकांचें हित साधणार आहे अशी शंका कमसमजुतीनें व आग्रहानें कित्येक मुसलमान व इंग्रज लोक घेत असतात. परंतु हें त्यांचें ह्मणणें अगदीं निराधार आहे असें ह्या सभांस येणाऱ्या लोकांच्या नांवांच्या यादी वाचल्या असतां तेव्हांच कळून येणार आहे. ज्या सभांत सर्व जातींचे, निरनिराळ्या दर्जाचे, आणि सर्व-धर्मांचे, पुढारी लोक मित्रभावानें जमतात आणि एकमेकांचे विचार घेऊन ठराव पसंत करतात, जी उभारण्याच्या कामीं मिस्तर ह्यूम, मिस्तर बद्रुद्दीन तयबजी, मिस्तर दादाभाई नवरोजी मि. मेथा, मि. तेलंग, मि. डब्ल्यू सी. बानरजी, बाबू सुरेंद्रनाथ बानरजी वगैरे, सारख्या विद्वानांची बुद्धि खर्च झाली आहे, ती एकाच जातींतील अगर एका प्रकारच्या अथवा दर्जाच्या लोकांनीं काढिली हें ह्मणणें केवळ वेडेपणाचें नव्हेकाय? ज्या सभेत इन्कम ह्याक्सची आकारणी हजार रुपयांच्या आंतील उत्पन्नांच्या लोकांवर होऊं नये, मिठावरील कर हलका व्हावा, जमिनीवर माफक सारे बसवून त्यांच्या आकारणींत पुनः बदल होऊं नये, वगैरे आशयाचे ठराव होतात ती सभा फक्त एका जातीच्या लोकांचे हित साधण्यासाठी स्थापन झाली आहे हें ह्मणणें शोभते काय ? जमिनीवरचे सारे माफक झाले तर हित कोणाचें होईल? इन्कमह्याक्सच्या आकारणींतून हलक्या उत्पन्नाचे लोक सुटले तर तो फायदा फक्त एका जातींतील अगर वरिष्ठ दर्जाच्या किंवा केवळ विद्वान् लोकांसच होणार आहे काय? मिठावरील कर हलका झाला तर सर्व जातींच्या आणि धर्मांच्या लोकांस तें सारख्या, स्वस्त दरानें मिळणार नाहीं काय? तेव्हां ही सभा एका जातींच्या लोकांचें हित साधण्यासाठीं त्या जातींतीलच लोकांनीं काढिलेली आहे हें ह्मणणें शुद्ध खोटें ठरतें असें कोणाच्याही लक्षांत येईल.

दुसऱ्या कित्येक लोकांस ही सभा सरकाराविरुद्ध आहे असें वाटतें. ह्या सभेसें मिळालें असतां सरकारास प्रतिकूल वाटेल असा त्यांच्या मनाचा ग्रह झालेला असून ते लोकांसही तसाच उपदेश करीत असतात. परंतु ते थोडा विचार करतील तर त्यांची ही शंका अगदीं निराधार आहे असें त्यांच्याच नजरेस येईल. हिंदुस्थानावर आज इंग्लिश सरकार जें राज्य करितें तें हिंदुस्थानांतील लोकांस अनेक अडचणी असाव्या, नाना प्रकारच्या संकटांनीं ते गांजलेले असावेत, आणि त्यांस हल्लीं पेक्षां चांगले दिवस कधींही येऊं नयेत ह्मणून करीत नाहींत.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती भाद्रपद शुद्ध १५ शके १८११

क्राफर्ड प्रकर्णाचा निकाल कमिशनें केला व तो कसा झाला हे सर्वांस माहितच आहे. व त्याच्या बऱ्यावाईटा बद्दल बरीच भवती न भवती ही झाली आहे. असलें प्रकर्ण जरी अशा तऱ्हेनें शेवटासगेलें तरी त्या मधुन लहान साहान बरीच प्रकर्णें उपस्थीत झाली आहेत. क्राफर्ड कमिशन पुढें ज्या मामलेदार लोकांनीं लांच दिली म्हणून कबुल केले आहे त्यांचा विचार अद्याप स्टेट सेक्रेटरी करितच आहे तसेच इकडे दुसरे ऑमने वि. पार्शी मंडळी हाहीं खटला अद्याप मिटला नाहीं. सदर्हू खटला ह्या प्रकर्णांतून उपस्थित होण्याचें कारण ह्मणून इतकेंच कीं क्राफर्ड प्रकरणाचा निकाल लागला त्यावेळेस लंडन टाइम्सच्या कलकत्ता येथील बातमीदारांनीं भलभलत्या तारा करून इंग्लंडच्या पार्लमेंटांतील सभासदांचीं मनें अगदीं कलुषीत केलीं व लार्ड रीनीं हें प्रकर्ण अगदीं कांहीं एक आधार नसतां उगीच अविचारानें उपस्थीत केलें आहे असें भासविलें. त्यामुळें लार्ड रीला सर्व कागद पार्लमेंटकडे पाठविणें भाग पडेल. त्या कागदांत सदर्हु प्रकरणाची चौकशी सुरु होण्या पुर्वी ऑमने साहेब इनस्पक्टर जनरल आफ पोलिस यानीं जो तपास केला व त्या तपासांत त्यांनां एकंदर जी म्हणून माहिती मिळाली होती त्याबद्दलच्या त्यांच्या नोटस् (डायरी) हीं पाठीवण्यांत आल्या व त्या नोटस् पार्लमेंटमध्यें इतर कागद्या बरोबर वाचल्या गेल्या. त्यावरून लार्डरीनीं केलेलें कृत्य अविचाराचें नव्हतें अशी सर्वांची खात्री झाली. परंतु त्या नोटस मध्यें ऑमनें साहेबानीं एकेठिकणीं असें लिहिले आहे कीं मी ह्या क्राफर्ड प्रकणाचा तपास करित असतां पार्शी जातींतील सर्व लोकानीं मला अडथळा केला व ते सर्व लोक या तपासाला अगदीं विरूद्ध होते हा लेख इंग्लिश पार्लमेंट मध्यें वाचलागेला तेव्हां पार्शीं लोकांच्या आंगाची अगदी आग होऊन गेली व आपल्या सर्व जातीवर मोठा दोष आला असें त्यांना वाटेल. असें वाटणें त्यांनां साहजीकच आहे. कोणी हा असा वृथा आरोप सहन करणार नाही. ह्या वरून कांहीं मंडळींनीं जमून लार्ड री साहेबांना सदरहू अपमानाबद्दल एक पत्र पाठविलें होतें. त्याचें उत्तर त्यांनीं डेमी आफिशियल आनरेबल दिनसाजी माणिकपेटीट यांच्या नांवें पाठविलें होतें व त्यांत फार दुःख प्रदर्शित करून पार्शी लोकांबद्दल माझ्या मनांत यत्कींचितही कमीपणा आला नाहीं व ऑमनें साहेबाचें लिहिणें समत नाहीं असें दर्शविलें होते. परंतु इतक्यावरून पार्शी लोकांची झालेल्या अपमानाबद्दल शांतता न होऊन त्यांनीं ता० २९ रोजीं सदर्हू दोषारोपाचा विचार करण्या करितां मुंबई येथें आलबेस बागांत एक मोठी टोलेजंग सभा भरविली. सभेला चार हजारावर लोक जमले होते. सभेचें अध्यक्षस्थान सरजेमशेटजी यांनीं स्विकारलें होतें. सभेनें एकंदर चार ठराव मंजूर केले. पहिला ठराव असा झाला कीं लॉर्ड री साहेबांनीं अनरेबल दिनशा माणिकजी यांच्या पत्रांत पार्शी लोकांवर सरकारचा भरंवसा आहे वगैरे मजकूर लिहिला आहे त्या वरून सरकारचें मत आमचे विषयीं चांगलें आहे याबद्दल कांहीं संशय नाहीं. परंतु लार्ड री साहेबांनीं सदर्हू ऑमने साहेबांच्या नोट्स त्याच्या पुढें आल्या त्यावळेस किंवा त्यांनीं त्या पार्लमेंट सभेकडे पाठविल्या त्यावेळेसच जर आपले सरकारी नात्यानें त्या बद्दल प्रतिकूल मत दर्शविलें असते तर पार्शी लोकांना आज त्या बद्दल विचार करण्यास कराण राहिलें नसते. व लार्ड री साहेबांच्या डेमी आफिशीयल पत्रावरून खात्री झाली असतो. दुसरा ठराव असा झाला कीं, पार्शी लोकांचे क्राफर्ड प्रकर्णाच्या चौकशींत कांहीं एक आंग नसून पब्लिक सर्व्हिसवर येणारा अनितीचा डाग काढून टाकण्या करितां मुंबई सरकारनीं चौकशी करण्या बद्दलची प्रदर्शीत केलेली इच्छा पार्शी लोकांस फार अभिनंदनीय वाटली. तिसरा ठराव ऑमनें साहेबांनीं केलेला दोषारोप अगदीं खोटा व निराधार आहे. व ऑमनें साहेबासारख्या मोठ्या अधिकाऱ्या कडून सरकारी कागदांत अविचारानें असा प्रकार होणें हे पाहून फार वाईट वाटतें. चवथा ठराव असा झाला कीं हें सर्व ठराव मुंबई सरकाराकडे व त्यांच्या कडून स्टेट सेक्रेटरीकडे पाठविलें जावेत व हें ठराव क्राफर्ड प्रकर्णी लगत जोडलें जावेत व ऑमनें साहेबाच्या नॉट्स जितक्या ह्मणून प्रासिद्ध करण्यांत आल्या तितक्याच रीतीनें हेही ठराव प्रसिद्ध केले जावेत अशा बद्दल एक विनंती पत्र पाठवावें. येणें प्रमाणें ठराव होऊन सभा विसर्जन झाली. व खटला ही निकालास लागेल असें आह्मी समजतो.

वरील मजकूर तयार झाल्यावर मुंबई टाईम्सपत्रांतील तारेवरून समजतें कीं मामलेदार प्रकर्णी लार्ड क्रास साहेबांनीं निकालास लावलें. तारेंतील मजकूर पुढें लिहिल्याप्रमाणें आहे लार्ड क्रास यानीं लार्ड लोकांच्या सभेंत असें बोलून दाखविलें आहे कीं क्राफर्ड प्रकरणात साक्षी देण्याबद्दल सरकारी नोकरांना लार्ड री साहेबांनें अभयवचन दिल्याबद्दल जरी मला वाईट वाटत आहे, तरी मुंबई इलाख्यांतील सिव्हील सरव्हंट लोकांत चालूं असलेला लुचपतीचा प्रकार बंद करण्याबद्दल जी त्यांनीं खटपट केली ती तारीफ करण्यासारखी आहे ज्या लोकांनीं आपणाला प्रमोशन किंवा इतर तऱ्हेची मेहेरबानगी मिळविण्याकरितां लचपत दिली त्यांना कांहीं तरी (काम्पेनसेशन) मोबदला देऊन नोकरींतून अगदींच काढून टाकावें परंतु ज्या लोकाना लुचपत अगदीं जुलमानें देणें भाग पडले त्यांची नोकरी कायम ठेवावी व त्याजवर खटले ही करू नयेत या शिवाय लार्डक्रास साहेब असें ही म्हणतात कीं लॉर्डरी साहेबांच्या कारकीर्दी बद्दल अगदीं पूर्ण भरंवसा आहे.

वरील तारेंतील मजकुरावरून लार्ड क्रास साहेबाच्या ह्मणण्यांत किती विरोध आहे हें सहजच समजून येईल.

लार्डरी साहेबांवर जर पूर्ण भरंवसा आहे व त्यांचे करणें जर हिंदुस्थान सरकारास प्रशंसनीय वाटतें तर मग त्यांनीं दिलेल्या लेखास हरताळ लावण्याबद्दलचा आग्रह लॉर्ड क्रास साहेब अद्याप कां बरें सोडत नाहींत:--

लॉर्डरी साहेबांनीं ह्या प्रकर्णाची चौकशी चालू असतां आमने साहेबाजवळ जो आपल्या सेक्रेटरीच्या सहीचा दस्तऐवज दिला आहे त्याला आतां क्रास साहेबानीं विलायतेंत बसून क्राफर्डच्या पक्षाकडील किंवा इतर ऑग्लो इंडियन लोकांनीं एकपक्षीय सांगितलेल्या हकिकतीवरून हरताळ लावण्यास सांगणें हें मुंबई सरकारास अपमान दायक नाहीं काय? आपण एक वर्षापूर्वीं दिलेल्या सहीचा हुकूम तोही या तऱ्हेचा पुन्हा आज तोडणें ह्मणजे केवढी कठीण गोष्ट आहे. गव्हरनर साहेबा सारख्याचा जर हुकुम परत घेतला जातो तर मग इंग्रजी अंमलदार लोकांवर किंवा त्यानीं दिलेल्या हुकमावर हिंदुस्थानच्या लोकांनीं भरवसा ठेवावा किंवा नाहीं याजबद्दल एक मोठाच प्रश्न उभा राहील. मुंबई सरकारनीं आमचे साहेबांस जो आपला दस्तऐवज दिला आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं ह्या लेखावरून आमने साहेबांना जो कोणी ह्या प्रकर्णाबद्दल पुरावा देत असेल त्याला गुन्हा माफ आहे असें सांगण्यास पूर्ण अधिकार आहे आणि त्याचप्रमाणें बढती मिळण्या करितां किंवा बदली व्हावी किंवा होऊं नये ह्मणून ज्यांनीं ह्मणून पैसा दिला असेल त्यां नाहीं ते जर सर्व खराखरा मजकूर कळवितील तर कोणत्याहा तऱ्हेनें त्यांचें नुकसान किंवा शिक्षा व्हावयाची नाहीं अशाबद्दल हमी द्यावी आतां ह्यावरील मजकुराचा दस्तऐवज मुंबई सरकारनें दिला असतां मामलेदार लोकांना बडतर्फ करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें खलिता पाठविणें ह्मणजे अगदीं रास्त आहे काय? खलिता पाठविण्याच्यापूर्वी निदान मामलेदार लोकांचें ह्मणणें काय आहे इकडची स्थिति कशी आहे एवढें तर त्यांनीं ऐकून घ्यावयाचें होतें. इंग्रज सरकारच्या न्यायी अमलाखालीं असा गोंधळ व तोही अगदीं मुख्य ठिकाणीं ह्मणजे मोठें नवलच आहे.

सदर्हू झालेला ठराव रास्त नाहीं व याबदल लोकांचे विचार काय आहेत हें हिंदुस्थान सरकारास कळावें ह्मणून ता० १ माहे सप्टेंबर रोजी पुण्यास एक मोठी सभा भरली होती. सभेला हजारपंधराशें लोक आले होते व अखेरीस सभेनें तीन ठराव पास केलें.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 9 1889.

The Poona meeting in regard to Crawford case represented the opinion of the disinterested and enlightened public of India. The Secretary of State may find it inconvenient to endorse the views expressed in the several resolutions of that meeting but that will be simply owing to his partial advisers in the matter. The large influx of European officers in India as members of different services uncontrolled and unchecked as regards their moral character is a great danger to the interests of the governed and also to the interests of the governors now well secured by their good repute and honesty of purpose. Corruption is very ripe amongst European officers in this country. Contemporaneous with the Crawford case the trials of two European army officers for corruption show that in these days of British supremacy the European official is more corrupt than the Native. And in cases of corruption of Native officials, is more or less with the consent expressed or implied of their European superiors. Rumours of extensive corruption against Crawford have been afloat for the last 20 or 25 years. And he has managed to escape detection during this period.

Such being the state of things it would be but impolitic not to say immoral to punish the unfortunate Dekkan Mamlat Dars for having told the whole truth both against themselves and against Crawford.

High officials possessing the ability and general affability of Crawford, will always escape criminal prosecution and if prosecuted at all will be without doubt pronounced not guilty by a majority of European jurors.

Under these very unfavourable circumstances to justice being done, it is a thing greatly to be regretted that the Times of India, the London Times, and most of the official organs here in India have taken lead to defend Crawford though his acts of corruption are so very flagrant. In the acquital of Crawford and all his accomplices many amongst Natives would no doubt find it a very easy matter to go on uninterruptedly in the course of making corrupt gains but this section of the public cannot be taken into account when justice pure and simple is to be secured. The independent and unbiased opinion which the Poona meeting has fearlessly expressed is such as should be taken into consideration by the Government and its responsible officers who are well inclined to secure the permanent interests of the British Empire.

PLEADER'S EXAMINATION 1889
THE LAW OF CONTRACTS AND TORTS.

Time allowed 2 hours.

1 Define *proposal, promise, consideration* and agreement. How is the communication of an acceptance made and when is it complete?

A on the 6th of May from Amraoti orders a Bombay firm to send him a carpet bag as soon as possible. The firm receives the letter on the 8th May and on that same day reply that having no carpet bag in stock they have sent out to procure one and will dispatch it without delay. A receives this letter on the 10th May. The firm purchase the bag on the 9th May and dispatch it to A on the 10th May but it is delayed reaching A owing to a mistake of the Railway Company. A waits till the 20th May and not receiving the bag writes to the firm that he does not want it. The firm answer stating the facts as to purchase and dispatch and regret that they cannot take it back but will only charge A the actual cost price Rs 10. A refuses to pay and the firm sue him.

Is the firm entitled to a decree? Support your decision by arguments—attention to be paid only to the provisions of the law in regard to the *making acceptance* and *revocation* of proposals. Marks 10

II Define *undue influence* and *misrepresentation.*

A writes to B in Bombay asking advice as to purchase of cotton. B is a personal friend of A and is also agent for a firm in England which deals in cotton. B replies that he thinks money can be made by purchasing cotton and advises A to purchase cotton if he can get it at any price under 100 Rs a boja. A then enquires of B whether his firm will take any cotton he may purchase at that price off his hands at an increase of 5 percent on delivery in Bombay. B replies that the firm will take any cotton so purchased provided it is

मुक्काम वाशीम ता. २।९।८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस:—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. पाऊस चांगला पडत आहे. पिकें चांगलीं आहेत. परंतु लोकांचा पिच्छा बया अजून सोडीत नाहीं. पुन्हां माहामारीचा उपद्रव थोडासा पोळ्याचे करी पासून सुरू झाल्याची वार्ता ऐकून बहुतांना भीति उत्पन्न झाली आहे. बया पुन्हां आपली गाश्या लवकर उठवील तर बरें.

इमामजयंतीचा सण हल्लीं सुरू आहे. या सणांमध्यें पुष्कळ हिंदु लोक ही मिसळतात. फकीराचीं सोंगें घेतात, वाघ होतात, नानाप्रकारच्या तऱ्हा करितात. कित्येक ठिकाणीं हिंदु डोलही करितात. हिंदुना या महमदजयंतीमध्यें लक्ष्य घालण्यास काय कारणें झालें असतील तीं असोत. परंतु इतके खास आहे कीं, आमच्या हिंदुनां अभिमान ह्मणून कांहीं नाहीं. गरीब बिचारे!! मुसलमानांच्या धर्मांत जाण्यास तयार. ख्रिश्चीयन होण्यास तयार कोणकडे ही त्यांना लोटून द्याना बिचाऱ्यांची तयारी !! हिंदुंचा सिपरयाचा सण असतो परंतु त्यांत एक तरी मुसलमान दृष्टीस पडतो काय? किती तो धर्माभिमान. नाहींतर आमचे हिंदु चालले पाहिजे तिकडे! मुसलमानांची हल्लीं जागा तयार करण्याची. ताबुत तयार करण्याचे, ताबुतांच्या ठिकाणीं आराश करण्याची मोठ्या सपाट्यानें तयारी चालूं आहे. कित्येक बिचारे खाण्यास ही मोताद तरी डोल नर पाहिला तर कोणी असें ह्मणेल कीं हा केवळ एखादा बडा माणूस आहे. तात्पर्य असें आहे कीं घरांत कांहीं असो वा नको डोलांत कमी पडल्यावर मग तें काय राहिलें! असो कांहीं झालें तरी चार दिवस सणाचे साजरे करण्याकरितां बिचारें एकोप्यानें वागतात. सालमजकुरीं पर्जन्यकाळ असल्या मुळें चांगला जलशा होण्यांत जरी व्यत्यय येण्याचा संभव आहे तरी नेहमींप्रमाणें त्यांची तयारी चालूं आहे. आतां रात्रंदिवस तासे, वाजंत्रें, ढोल, डफडी चौघडा वाजण्याची सुरुवात होत आहे कोणीकडे जा. कोठेंही पहा. रस्त्यांनी दुला दुला शब्दाचा गजर इमामजयंती उत्साह सूचक कानीं पडत आहे. तेली लोकांना तेल महाग करण्यास, कपडेवाल्या चाऱ्यांना कपडा महाग विकण्यास ही संधी बरी आहे. येथें इमामाची वस्ती बरीच असल्यामुळें हा सण बऱ्याच प्रकारें होतो. आतां दहा बारा वर्षें हा उत्साह पावसाळ्यांतच येणार. कसाकाय सणाचा परिणाम होईल तो मागाहून कळवूं.

मि० रामराव वकील हे या गांवीं धर्मात्मे आहेत. यांना कर्ण हें नांव शोभतें. ते नेहमीं शाळेंतील कित्येक मुलांना जेऊं घालतात. परंतु एक गोष्ट त्यांनीं केली पाहिजे. ज्या मुलांना ते जेऊं घालतात तीं रोज शाळेंत जातात किंवा पत्ते खेळतात याबद्दल त्यांना चौकशी केली पाहिजे. नाहीं तर फुकटचे जेवावयास मिळतें तेव्हां अन्नाची किंमत काय हें मुलांना कळणार नाहीं व उलटा असा परिणाम होईल कीं मुलांना आळशीपणाच्या सवई लागतील. तरी या परिणामाला टाळण्याकरितां मि० रामरावबाबा साहेबांनीं असें केलें पाहिजे कीं ज्या शाळेंत मुलगा जात असेल त्या शाळेंतील मुख्याचा मुलाच्या नित्य येण्याबद्दल व चांगल्या चालचलणुकीबद्दल महिन्याचे महिन्यास दाखला मागवावा. ह्मणजे मुलांच्या वर्तणूकीवर एकप्रकारचा दाब राहील व मि० रामरावबाबा साहेब यांच्या दातृत्वाची उत्तम प्रकारची चीज होईल. या सगळ्या वाशमांत यांची बरोबरी या धर्माच्या कामीं करणारा असा दुसरा कोणी आढळतच नाहीं. यांचे येथें नेहमीं कांहींना कांहीं धर्म होतच असतो इश्वरा यांचा कित्ता घेण्याची इतरांना बुद्धी दे. नुकेंच कोणी संतरपण केलें. बायका, मुलें, पुरुष सर्व मिळून हजार बारशें पात्रांचा समाज भोजन करून गेला. बेत उत्तम होता. यांच्या पैशाची उत्तमप्रकारची चीज होते यांत संशय नाहीं. अशीच धर्मकृत्यें यांच्या हातून घडत जावोत. व यांची सुकीर्ति प्रसृत होवो. धर्मकृत्याप्रमाणें इतर सार्वजनिक कामाकडे सांप्रतकाळीं लक्ष्य दिल्यानें कीर्ति विशेष होते. यांचे वर्गांतील इतर बांधव यांचें अनुकरण करोत.

मेहेरबान तहशिलदार साहेब यांची स्वारी कांहीं काम करितां रजेवर गेली आहे असें ह्मणतात. मि० महमद साहेब नायब तहशिलदार हे फार चांगले आहेत. सभ्य आहेत यांचेमध्यें माणुसकी उत्तमप्रकारची आहे असें दिसतें. हे आपले कामांतही हुशार आहेत असें दिसतें. तीन चारदां बदली कामें करीत आहेत असें ह्मणतात. अजून यांना कायमची जागा कां मिळत नाहीं कोण जाणें. शाळाखात्यांतून हे गृहस्थ सिव्हील खात्यांत आपला शिरकाव करीत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. शाळाखात्यांतील लोकांना मुलकी खात्यांतील कामें करावयास येत नाहींत असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु आजकाल या प्रांतांत नांवाजलेले जे कांहीं कामगार आहेत ते पूर्वी शाळाखात्यांतच होते व तेथून त्यांनीं आपल्या बुद्धीमत्तेच्या योगानें आपला रिघाव सिव्हीलखात्यांत करून घेतला व ते हल्लीं आपलें तेज या सिव्हील खात्यांत पाडीत आहेत याचा जर विचार केला तर शाळा खात्यांतील मंडळीला ह्या सिव्हील खात्यांत काम करितां येत नाहीं असें ह्मणणाऱ्या हेकेखोर मंडळीनें खालींच पाहिलें पाहिजे. उलट इतकें मात्र ह्मणतां येईल कीं सिव्हील खात्यांतील मंडळीला जर कां शाळाखात्यांत काम करण्याची पाळी आली तर मात्र त्यांपकीच कपाळी यावयाची यांत संशय नाहीं. असें मागें एक उदाहरण घडलें आहे त्यावरून ह्मणतां येईल. मागें एकेवेळीं सिव्हील खात्यांतील एक गृहस्थ अकोल्यास ट्रेनिंग कॉलेजचे प्रिंसिपाल नेमिलें होते. परंतु तें काम त्यांना करितां न येऊन त्यांची उचलबांगडी होण्याचीच वेळ आली होती इतक्यांतच बिचाऱ्यांचा अंत झाला. तात्पर्य काय कीं आपल्या पायाखालीं काय आहे हें न पहातां दुसऱ्याचें गुणागुण पहाण्याकडे लक्ष्य देणें ह्मणजे मनाचा हलकेपणा लगाला दाखविणें आहे. सर्व खातीं सरकारचीं आहेत. पाहिजे त्या खात्यांतून पाहिजे त्या खात्यांत मनुष्य बदलण्याची सोय झाली पाहिजे. अंगावर येऊन पडल्यावर मनुष्य आपलें काम करितोच आहे. तेव्हां एकाद्या मनुष्याला अमक्या खात्यांतलें काम येतें अमक्या खात्याला येत नाहीं असें ह्मणणें व्यर्थ आहे. त्याच प्रमाणें मि० महमद साहेब यांस या सिव्हील खात्यांतील काम उत्तमप्रकारें येईल यांत संशय नाहीं. त्यांना लवकर कायमची जागा मिळो अशी आमची इच्छा आहे. तसेंच दरवर्षी कांहीं शाळाखात्यांतील मंडळी सिव्हील खात्यांत घेण्याची तजवीज मेहेरबान कमिशनर साहिब बहादूर करतील अशी आशा आहे. निदान हायर अगर लोअर परीक्षा पास होतील त्यांना तरी त्या खात्यांत घेत जावें ह्मणजे शाळाखात्यांतील मंडळीस कांहीं तरी उत्तेजन येईल. कळावें हे विनंती.

आपला

"स"

पिंपळगावराजा तारीख ४।९।८९

विनंती विशेष वऱ्हाडसमाचाराचे ३०—३१ या दोन अंकी दिलेल्या बातमीचे विरुद्ध तारिख १९।८।८९ चे प्रमोदसिंधु तील एक फिरस्ता म्हणून कांहीं मजकूर प्रदर्शित केला आहे. त्यावरुन त्या फिरस्ते महाराजांनीं किती प्रामाणिकपणानें मजकूर लिहिला आहे कीं, सदरहू गावीं हवेचे उपद्रवानें ३३ इसम अजारी नाले व त्यापैकी १३ इसम मरण पावले. हे येथील पाटील पटवारी यांचें जन्ममृत्युचे रजिष्टरांत प्रत्यक्ष दाखल असून, फिरस्तेराव ह्मणतात कीं १८ इसम आजारी होऊन ७ इसम मयत जालें असें स्पष्ट लिहितात. इतक्या क्षुल्लक गोष्टीवरून वाचकांचे मनांत, एका ग्रामस्थाने लीहिलेला मजकूर खराआहे किंवा एका फिरस्त्यानें दिलेला मजकूर खरा आहे हें सहज ध्यानांत येईल. अशा फिरस्ते माहाराजास सदरहू गावची इतकी क्षुल्लक गोष्ट जर खरी माहीत जाहाली नाहीं. तर माझा मानस असा होतोकीं सदरहू फिरस्ता गांवांत भ्रमण करित असतां त्यानी मदतखात्यांत चालू असलेल्या भरारीच्या गोष्टी ऐकुन त्या खऱ्या आहेत असें समजून मोठ्या उल्हासानें वऱ्हाड समाचारांतील ग्रामस्थाच्या विरुद्ध कांहीं तारी लिहून त्याची नाचक्की करण्याकरितां मोठ्या-

[illegible] पणानें, व धुर्ततेनें मजकूर लिहिला आहे. यावरून फिरस्ते महाराजाचे मोठें औदार्य दृष्टीस पडतें. ही इतकी क्षुलक गोष्ट जेव्हां त्याचे कडून खरी लिहिवली नाहीं तेव्हां आणखी त्याचे अवतर लिहिलेल्या गोष्टीवर टिका करावी असें मजला वाटत नाहीं.

एका गृहस्थानीं वर्तमान पत्रांत मागिल अंकी येथील एकाक्षीविषयीं खरी हकीकत लिहिली होती कीं त्या पासून त्यांचे वर्तनांत कांही फरक पडेल. परंतु आज, काल, त्याचे वर्तणुकींत इतका फेर होत चालला आहे कीं, आमचे येथें ब्रह्मवृंदाचे आळींत एक गृहस्थ राहत आहे तो इतका प्रामाणिक व नितीवंत आहेकीं, त्याची कीर्ती गांवांतील सर्व अबालवृद्धास विदित आहे. त्या ठिकाणीं सदरहु गृहस्थाचे वास्तव्य होत आहे त्यानें सदरहु गृहस्थावर असें मोहोनास्त्र घातलें आहे कीं, त्यावांचून एक क्षणभरही काळक्रमणा होतनाहीं. असें मोहनास्त्र कोणते असावें नकळे.

येथें श्री गजाननाचे देवालयांत, गणेश चतुर्थीचा उत्सव मोठ्या समारंभानें झाला, श्री गजानना प्रित्यर्थ पांचदिवस एकसारखें सतपर्ण जाहाले. ब्रह्मवृंदाचा चांगला जमाव जाहाला होता. या कृत्यांत येथील म. स्कु. हे. मा. यांनीं चांगली मदत केली या बद्दल आम्ही गावकरीलोक त्यांचे फारच फार आभारी आहों. श्री गजाननाची पालखी ता. ४ रोजीं निघाली होती. ती हिंदु व मुसलमान यांची मनें साफ असल्यामुळें निर्विघ्न पणानें फिरवली गेली. परंतु लिहिण्याचें मोठे वाईट वाटतें कीं येथील गुरवलोक हरहमेशा वाजविण्याचे ठिकाणीं संबळ न आणितां नुस्ती सैनी व पोंगा घेऊन येतात याचे कारण समजत नाहीं. माणसाची उणिव म्हणावी तर एकंदर पाच इसम आहेत. त्याजकडे गावांतील संभावित लोक व गावचे अधिकारीही लक्ष ठेवित नाहींत करितां आगचे गांवांतिल संभावित लोकांस व गांवचे अधिकारी यांस हीच विनंती आहे. कीं या पुढें असें न व्हावें.

आपला एक
"क्ष."

मुकाम सस्ती तारिख ५।९।८९ इ०

रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस. विनंती विशेष आपल्या भेटीचा लाभ मिळावा म्हणून भेटीस आलों. एडिटर साहेब भेट द्याल अशी फारचफार उमेद धरून आलों आहे. तुमचा आमचा नविनच परिचय होणार तरी कृपालोभ ठेवित जावा व असाच भेटीचा लाभ होत जाऊन लेकराचा संभाळ करित जाळ हा भरंसा धरून व आपली कीर्ति ऐकून आलों आहे तरी खालील मजकूर छापण्याची मेहेरबानगी करावी नाहींतर. बास्केट्ची हवा दाखवावी. सूज्ञास ज्यास्त लिहिणें नकों, असो. मग्र, नेहमीं देश पर्यंत टण करण्याचो संवय असल्या वरून मी फिरत फिरत ह्या गांवीं आलों. तों, गांव रमणिय दिसलें. यावरून कांहीं दिवस मुकाम केला. नंतर पुढें चालता झालों. ह्या गांवीं मुशाफर लोकांस उतरण्या करितां एक मारुतिचे देवालया नजीक धर्मशाळा आहे. तींत उतरलों. ही धर्मशाळा बराच खर्च करून बांधलेली असावी असा अंदाजा दिसला. धर्मशाळेच्या मागें एक लहान बगीचा आहे व त्यांत एक मोठी विहीर आहे परंतु त्यांची जशा व्यवस्था असली पाहिजे त्याचे उलट नजरेस आली. पुढें मारुतीचे देवालय आहे त्यांत देवदर्शन करण्यास गेलों तों मारुती उघडा असून त्याचे अजूबाजूस दक्षिण उत्तर मात्र लधाव्याचे मकान आहे. त्यांचें पूर्वेस बरेंच मोठेघाबे दिसल्या वरून तें पाहण्या करितां गेलों तों तें सर्व खराब झालें असून लवकरच पडण्या सारखें झालें आहे आंत एक लहान विहीर आहे ही घाव्याची जागा व धर्मशाळा वगैरे अशा वाईट स्थितीत दिसल्या वरून वरील इमारतीस कोणी मालक नाहीं असें दिसलें. पण जरी मालक नसला तरी गांवचे मुख्यांनीं असल्या सत्कृत्याकडे लक्ष पोंचाविल्यास नीट सुरक्षीत राहतील. अशा प्रकारच्या इमारती उत्तम स्थितींत असल्यानें गांवास ही बरीच शोभा दिसतें व अधिकारी लोकांस ही उतरण्याचे कामीं पडतात. मग असे अनेक फायदे होतात तर त्याकडें गांवचे मुख्यांनीं जरूर अगत्य लक्ष पोंचाविलें पाहिजे. जवळच पाटील चावडी आहे. त्या मागें लगत कोंडवाडा ही आहे. नजीकच सरकारी शाळा गृह आहे. एकंदरीत रचना उत्तम दिसली नंतर. बिऱ्हाडावर येऊन स्वस्थ बसलों तितक्यांत जवळच शाळा होती म्हणून मागें सांगितलेंच आहे. त्यांतील कंपाउडांत. कांहीं मुलें परोचा म्हणतात कांहीं खो, खो, आट्यापाट्याचा खेळ खेळतात. कांहीं मलखांब वगैरे कसरत करीत आहेत. असा अपूर्व चमत्कार दिसल्या वरून मी, तो चमत्कार पाहण्यास तेथें गेलों. नंतर लवकरच सर्व आटोपल्यावर शिक्षक व मुलें आपापले घरीं गेलीं नंतर दुसरें दिवशीं प्राथःकालींच शाळेंत गेलों. तों तीन शिक्षक आपापलें कामांत निमग्न दिसले.

नंतर हेडमास्तर साहेबांशीं थोडे पण सुरस संभाषण झालें. व असें दिसून आलें कीं ह्या शाळेंत पांचवी ईयत्ता शिकविली जात आहे हे ऐकल्या पासून फार फार नवल व आनंद झाला. येथें पूर्वीं दोन मास्तर होतें. ते आतां तीन झालें पूर्वीं पेक्षां मुलें ही शाळेंत बरींच वाढलीं असें कळलें वरून येथील हेडमास्तर रा० व्यंकटराव यांचे अंगीं. लोक प्रियता दीर्घ उद्योग. व क्षमाशील पणा हे गुण अवष्य असलेच पाहिजेत व आहेत असें मीं थोड्या वेळांत समजलों. हें व त्यांचे दोन आसिष्टंट मास्तर यांचा एक चित्तपणा पाहून तर फारचफार आनंद वाटला व म्हणूनच अशा सुधारणा होत चालल्या आहेत. मास्तर साहेबांनीं. शाळेंत मोठा समारंभ करून. व मंडळी बोलावून. तारिख २६।६।८९ इ० रोजीं बालसभा स्थापन केली. व त्या बालसभेचेंनांव—सूप्रसिद्ध होऊन चिरायू राहावें एवढ्या करितां मुंबईहून बालबोध मासिकपत्रक सुरू केलें आहे व आणखी ह्या सभेच्या नांवावरच एक उत्तम मनोरंजक वर्तमानपत्र सुरू करण्याची खटपट चालविली आहे त्यास कांहीं वर्गणी जमली व कांहीं जमणें आहे. लवकरच आणखी सभेचा थाट होणार आहे. अशा सत्कृत्याकडे मास्तर साहेब नेहमीं वेळ घालवितात. हें पाहून आम्हीं त्यांची जितकी शिफारस केली तितकी थोडीच आहे. अशा मेहनती मास्तरास वारंवार बहडती मिळून त्यास व त्यांचे बालवर्गास परमेश्वर चिरकाल यश देवो हें मागणें आहे.

एक फिरस्ता
"क्ष"

गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

delivered within two months. A has already purchased some cotton for Rs 95 a boja. He sells this to his son for Rs. 98 a boja repurchases it at Rs 100 a boja sends it to Bombay delivers it to B's firm and asks for payment at the rate of Rs 105 per boja; after taking delivery B learns from a friend what A has done and claims to retain the cotton on the payment of Rs 100 per boja and pays at that rate. A brings a suit for the difference. Should A succeed? Marks 15

III What agreements are void? Which of the following agreements if any is void.

(1) A tells B that he is owed money by C a great friend of B. B says I like C. I'll pay for him. Next day A sends a note to B asking him to pay. B and C having quarrelled during the night B refuses to pay. A sues B for the money.

(2) A keeps a tailor's shop in Amraoti and wants an assistant. He agrees with B in Bombay to take him as his assistant paying B's fare from Bombay. *B* on reaching amraoti deserts *A* for a better offer made by a rival tailor C. *A* sues for an injunction to prevent *B* working for C and for damages. 15

IV Quote the sections of the contract act which relate to relations resembling those created by Contract. Marks 10

V Define *goods* and *sale*. How is sale effected? When does the property in goods sold pass? What is meant by a *sellers lien*? Decide the following cases.

A sells 100 maunds of linseed to *B*. It is agreed that *A* shall send the linseed after it has been weighed in amraoti in the presence of *B*'s agent to *Bombay* by train. *A* is to retain the railway receipt and B has to give a bill of exchange at 12 days sight on his firm in Bombay. The bill of exchange is given and *A* puts the goods in the train and receives a railway receipt. B represents that the goods will be detained in the Bombay railway station— the consignment having been made out in his name unless he (*B*) produces the railway receipt. *A* gives him the railway receipt and B sends it to his agent in Bombay. The agent goes to a bank of Bombay and representing that the goods are on the way and showing the railway receipt gets a loan from the bank. The bank takes the railway receipt as security. The agent runs away with the money and *B* becomes insolvent. The goods had arrived in Bombay before the agent ran away and before B became insolvent. A and the bank both say they have a lien on the goods which has a prior title. Marks 15

VI What is *bailment* and what is a *pledge*. A lent B a cart and bullocks to take him to Akola, B went to Akola and on from there to Khamgaon. In Khamgaon one of the bullocks was stolen. A asked B Rs 50 as the value of the bullock. B refused to pay as he said he had got the thief arrested and convicted. A sued B for the Rs 50. Is A entitled to recover the Rs. 50.

(2) A pawned a clock worth Rs. 150 with B for Rs 100. The clock was stolen from B's safe by a gang of dacoits. A sued B for the price of the clock less the amount of his debt. Should he obtain a decree?

(3) Under the same circumstances B sued A to recover his debt of Rs 100 and interest. A refused to pay unless his clock was returned. Is B entitled to obtain a decree? Marks 15

VII What are the duties of an agent to his principal and of the principal to his agent.

What is a partnership and when may a court dissolve a partnership on the suit of one of the partners. What are the provisions of section 265 of the Contract Act as it now stands. Mraks 10

VIII Define the negligence which will ground an action in Tort.

A employs B, a competent contractor to do certain work for him, in doing which one of B's workmen C, acts so negligently that D is thereby injured. Against whom can D bring an action?

A negligently leaves his horse unguarded in the public streets. It takes fright and runs against B's horse and cart which B has in like manner left in the public streets unguarded. B's horse thereupon takes fright, runs away, and breaks in C's shop front. Discuss the liability for the damage caused.

A man keeps as pets a bear and a dog. They both get loose and bite various people. Is there any and what difference in the evidence necessary to be adduced to secure damages in the two cases? Marks 10

PLEADERS' EXAMINATION 1889
HINDU AND MAHAMMADAN LAW. TIME ALLOWED 3 HOURS

1 A and B are brothers of an undivided Hindu family owning a horse worth Rs 1000 A has a wife C; B a wife D.— A dies leaving a creditor P holding a decree against him for Rs 100 on a simple bond.— Then B dies and B's widow D is sued by a creditor Q who obtains a decree on a simple bond for Rs. 100. Eventually D dies and there after the creditors P and Q attach the house in execution of their respective decrees. C claims the house in her own right and objects to either decree being satisfied by the sale of the house. Should the house be sold or not in execution of either or both decrees? Give your reasons in full for your decision. Marks 8

II Explain the following terms—

Apratibanda:— Anvadheya:—Aurasa sulka:— Arsha:— Anitya:— Ayautak:-- Dyamushayana:- Lepa and Saudika and show the importance of each in Hindu law. Marks 4

III A is a mahratta Brahmin living at Amraoti. with two wives B and C and jointly with a nephaw D a deceased brother's son. A has also a brother E separated from him.

A dies— leaving certain ancestral *moveable* property in which nephew D was joint with him and also some *self acquired immoveable* property. The widows of A, B and C both adopt. B adopts E's (the divided brother's) eldest son alleging her husband's written authority.

C to frustrate B hastily adopts the only son of the nephew D. B brings a suit to establish the validity of the adoption made by her and the invalidity of that made by C.

Now assuming every point to be contested 1st say what issues of law will arise. and 2nd briefly state the arguments on each that you would advance if you were B's pleader. and 3rdly how you would decide on each if you were the judge. Marks 14

IV Contrast the position of a Mahomedan woman with that of a Hindu woman in regard to the following points.

1 the possibility of being divorced against her will.

2 the possibility of at will, obtaining a divorce.

3 her power over her private property during husband's life time

4 her power over property inherited on husband's death-

5 her right to maintenance during husband's life time.

6 her right to maintenance by husband's relations after his death. Marks 10

V State all you know in regard to the Mahomedan law of pre-emption. What in mahomedan law are the essential conditions of a marriage: a sale: a gift. Who in Mahomedan law are the natural guardians of a boy minor and a girl minor and what are their powers in dealing with the property of their wards. Marks 8

VI In Mahomedan law who can make a will? to what extent and in whose favour? Explain the terms "vested inheritance" and "increase."

A dies leaving a widow B his mother C. and sister D and an estate worth Rs 156000 what share is each entitled to and what will each get? Marks 8

VII State clearly the points in regard to adoption and inheritance discussed by Mayne in the following cases.

1 Bhoobun Moyie v. Ramkeshore (Chandra ballee's case.)

2 Collector of Madura v. Mootoo Ramlinga (Ramnadd case)

3 Gunga Mya v. Kishen Kishore (Gunga Mya's case)

4 Gungapersad v. Bujessma (Gungapersad's case.)

5 Mosun More v. Bejoy (Mosun More's case)

VIII State what you know about partition under Hindu law. Discuss especially the following points.

1 What property is subject to partition? what is the general rule and what are the exceptions?

2 Who can demand it under Mitakshera and who can demand it under Bengal law.

3 who obtains shares and what difference is there in this respect in Bengal, Bombay and southern India.

IX Trace the inheritance in the following cases under the Hindu Law ordinarily applied in the Province.

(1) A dies having a son who is blind an undivided brother; a widow; and a sister. The brother dies next, followed by the son; when the widow and sister each claim all the estate which is wholly ancestral—which of them is entitled to it.

(2) A divided Hindu family consists of the following.

A his son B and grand son C by another son D a nephew (brother's son) of A and E a grand nephew. the grand son of another brother of A's.— A dies then his son B followed by his grandson C whereupon D his nephew and E grand nephew claim A's estate—who is entitled?

(3) The three brothers A, B and C are a *divided* Hindu family— A has a wife D. B has two sons E and F and a grandson E's son G. C has a son H.

A dies first, two years after A, B dies: three years after A, C dies; four years after A, E dies, five years after A, D A's widow, dies: the survivors F, G and H claim the estate left by A to what share is each entitled? Marks 13

(4) What difference would it make in the last case if D had died before C. and the dispute had arisen on the death of E.

X What is the nature of a woman's estate in property inherited from males and in property not inherited from males

In what cases is a woman absolute owner of property inherited from males and what difference is there in this respect between Bombay and Bengal law?

What does Mayne say in regard to accumulations made after the death of a widow's husband and before delivery of the estate to the widow; and about accumulations made by the widow herself? What are the limits of a widow's power of disposition in regard to property inherited from her husband and has she a larger power in regard to his self acquired property than she has in regard to his ancestral property? What does Mayne say about Jains?

वऱ्हाड.

हवामान बरें आहे. पाऊस आज पर्यंत जो पडला त्या मानानें जर सध्या आठच्यार दिवस जा थोडाशा पावसानें उघाडी दिली आहे व उन्हानी ही आमली कृपा दृष्टी केली आहे असें जर दहा पंधरा दिवस दोघे ही आपली कामें बजावतील तर पिकें सर्वोत्कृष्ट येतील. कांहीं ठिकाणीं मात्र अतिशय पाऊस पडला त्या मुळें पिकें पिंवळी पडली आहेत.

यंदाची वकिलीची परीक्षा गेल्या आठवड्यांत संपली. परिक्षेस ३७ उमेदवार आले होते. पैकीं रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई, रा. रा. श्रीकृष्ण चिमणाजी देशपांडे, रा. रा. सखाराम चिमणाजी गोळे उर्फ दादासाहेब व आणखी एक गृहस्थ असें ४ इसम पास झाले असें आह्मास कळतें.

रा. रा. कृष्णाजी मल्हार पैठणकर असिस्टंट मास्तर हायस्कूल आकोळे यांस तेथील इं. म. शाळेचे हेडमास्तर नेमल्या मुळें त्यांचे जागीं रा. रा. जनार्दन केशव नगरकर यांस नेमिले असें कळतें.

मोहरमच्या संबंधानें येथें बंदोबस्त फारच गला केला आहे तो असा कीं डोले रात्री अमुकच वेळच्या आंत बुडविले पाहिजेत व नंतर गणपती मिरविण्यास काढावेत असा बंदोबस्त केल्यामुळें हिंदु व मुसलमान यांचा तंटा होण्याचा संभव राहिला नाहीं.

AKOLA MEDICAL & SUCICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल.

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परिक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल.एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक. दंत शाण. हीं औषधें मिळतील.

वर्तमानसार.

पाटकीन साहेबांचा हिंदुस्थानांत येण्याचा रेलवेचा मार्ग—लंडनहून जिब्राल्टर तेथून आगगाडी मोठ्या आगबोटींत घालून टांजीर शहरापर्यंत आणावयाची, व टांजीर शहरापासून आफ्रीकेच्या उत्तर किनाऱ्यानें पार्शियन गल्फ व तेथून थेट कराची !!

देशी संस्थानिकांनीं दर एक महिन्यांत सरकारच्या परवानगीवांचून कोणती ही गोष्ट करूं नये असा सरकारानें ठराव केला आहे

ठराव— हिंदुस्थानचे गव्हरनर जनरलांनीं सिमला येथें पांच महिने रहावें व मद्रासचे गव्हरनर साहेबांनीं उटकमांड येथें चार महिने रहावें असें स्टेट सेक्रटरी साहेबांनीं ठरविले आहे असें समजतें.

नोंवेंबर महिन्यांत लाहोर येथें हल्लीचे व्हाइसराय साहेब मोठा दरबार भरविणार असें समजते.

नानटी येथें हवेच्या दाबानें ट्रामवे चालविण्याची युक्ती निघाली आहे.

मध्य प्रांतांत स्टांपाचें उत्पन्न गेले सालीं दहा लाख रु० झालें व यापैकीं दोन त्रितीयांश कोर्टफीचें होतें.

बंगाल्यांत कोठें फार पाऊस व कोठें मुळींच नाहीं असें झाले आहे. यंदा बहुतेक ठिकाणीं पावसाची हाकाहाकच दिसतें.

क्षय रोगांवर क्लोरोफार्म नेहमीं देत गेल्यास रोग बरा होतो असा नवीन शोध लागला आहे. न्या०सिं०

मुंबईची गव्हनरी अर्लआफ काव्हेटी यांस देऊं केली असल्याचे प्रसिद्ध झालें आहे.

हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य कामगारांचे पगार खाली लिहिल्या प्रमाणें:—

हुद्दा	वार्षिक पगार
गव्हरनरजनरल	२५०८००
मुंबईचे गव्हरनर	१२००००
हिंदुस्थानचे मुख्य सेनापती	१०००००
हिंदुस्थान सर०चे कौन्सिलर प्रत्येकी	७६०००
चीफजास्टिस मुंबई, मद्रास, वायव्य प्रांत प्रत्येकी	६००००
मुंबई कौन्सिलचे मेंबर प्रत्येकी	६१४४०
हिंदुस्थान सरकारचे रेव्हिन्यू, फिन्यान्शियल, फारिन, व होम खात्याचे सेक्रेटरी प्रत्येकी	४८०००
हायकोर्टाचे जुसाइन जज्ज प्र०	४५०००
बंगाल बोर्ड आफ रेव्हिन्यूचे मेंबर प्रत्येकी	४८०००
रसिडेंट हैद्राबाद	५८०८०
चीफ कमिशनर	५००००
मद्रास गव्हरनर	१२००००
लफ्टनंट गव्हरनर प्रत्येकी	१०००००
चीफकमिशनर ब्रह्मदेश	८००००
चीफ जास्टिस बंगाल	७२०००
मद्रास कौन्सिलचे मेंबर प्रत्येकी	६१४००
मुंबई, मद्रासचे सेनापती	६६०००
हिंदुस्थान सरकारचे लष्करी व पब्लिक वर्क्स खात्याचे सेक्रटरी प्रत्येकी	४२०००
म्हैसूरचे रेसिडेन्ट	४८०००
पंजाब चीफकोर्टाचे जज्ज प्र०	४२०००
वायव्य प्रांताचे बोर्ड आफ रेव्हिन्यूचे मेंबर प्रत्येकी	४२०००
सिंधचे कमिशनर	५००००

लोखंडी नळ्यांस आंतून बाहेरून डांबर लावावें नंतर लांकडाच्या भुशांत घालून त्या जाळाव्या म्हणजे त्या नळ्यांस जंग कधीं ही चढत नाहीं. सू० शू०

मिठावरील जकात कमी होण्याची आशा नाहीं. सरजान गार्स्ट यांणी स्पष्टच बोलून दाखविलें कीं, समजून उमजूनच हा नवीनच मार्ग उत्पन्न करितां शोधून काढला आहे व खपांत कांहीं कमी ज्यास्त झालें नाहीं.

हिंदुस्थानचा खर्च ही कमी होण्याची आशा परवांच्या वादविवादावरून राहिली नाहीं. लोक वस्ती वाढत चालली आहे तेव्हां अर्थातच राज्य कारभाराचा खर्च वाढत जावयाचा असें अंडर सेक्रेटरी यांणी सांगितलें.

दुष्काळा करितां म्हणून फंड जमविला होता त्याचा खर्च आगगाडीचे रस्ते करण्यांत पाट बंधारे बांधण्यांत व कर्जाची रकम कमी करण्यांत केला व माल नेण्या आणण्याची सोय झाल्यानें दुष्काळाची भीति कमी झाली असें सरजान गार्स्ट यांणी प्रतीपादन केलें.

सर हद्दीवर रेलवे करण्या करितां साडेसात लक्ष रु० व बंदोबस्ता करितां किल्लेकोट बांधण्या साठीं पंचवीस लक्ष रुपये या नवीन अजमासांत पाहिजे आहेत असें दर्शविलें.

ब्राडला साहेबांनीं फामिन इन्शुरन्स फंडाच्या अव्यवस्थीत खर्चाबद्दल सरकारास मोठा दोष दिला. त्या प्रमाणेंच सिमला येथें इमारती बांधण्यास पैसा खर्च केल्या बद्दल टपका दिला.

टर्कीच्या संबंधानें आस्ट्रिया, जर्मनी व इटाली या तीन देशांचे ऐक्य झालें.

लार्ड क्रास यांनीं हौस आफ लार्डमध्यें असें सांगितलें कीं क्राफर्ड प्रकरणांत ज्या मामलेदारावर वाईट हेतूची शाबिदी झाली त्यांस मुंबई सरकार चाकरी वरून बडतर्फ करणार, द्रव्य द्वारें त्यांचें नुकसान मात्र भरून देतील, व ज्यांजवर जुलूमानें सक्ती झाली त्यांस सरकार चाकरीवर ठेऊन त्यांस दोषमुक्त करतील.

इंग्लंडनें काश्मीर सरासरी खालसा केलें तेव्हां आफगाणिस्थानच्या व तिबेटच्या सरहद्दीवर रशियन सरकारास विशेष बंदोबस्त करणें भाग पडत आहे यावरून इंग्लंड व रशिया यांच्या झगड्याचा प्रसंग लवकरच येणार असें दिसतें.

जर्मनी, आस्ट्रिया, व इटली या त्रिकुटांत टर्कीनें सामील व्हावें असा उद्योग चालला आहे रशिया तसा प्रकार होऊं नये म्हणून झटत आहे.

डेलिन्यूज हें वर्तमानपत्र आपल्या राज्यांत येऊं देऊं नये असा टर्कीच्या सुलतानानीं हुकूम फरमाविल्याचें समजतें.

रशियाच्या काकेसस मधील फौजेंत आणखी चाळीस हजार लोक वाढविणार असें समजतें.

बलगेरियामध्यें फौजेची मोठी तयारी चालली आहे. पन्नास हजार बंदुका व एक कोटी काडतुसें तयार करण्याचा हुकूम झाला.

सर्वत्र लोकांस कळविण्या साठीं नोटीस देण्यांत येतें कीं बग्या वल्लद भामा महार रहाणार अकोलें हा नादार आहे असा जाहीर तारीख २४ माहे आगष्ट सन १८८९ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८८९ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्या करितां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टाप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस जगण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे गोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टाप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टापावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरा पुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून नोटीस पाठवावी ह्मणजे ते रजिष्टरीं दाखल होतील.

तारीख ३ माहे सप्टेंबर सन १८८९

R. MacGill.
नादारी कोर्टाचे क्लार्क जिल्हे अकोलें.

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.....८४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ८१

बेहाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 1R
per line over10... 4 a.
Repetition pe lin 3 ass

VOL XXIII | AKOLA MONDAY 23 SEPTEMBER 1889 | NO. 37

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २३ माहे सप्टेंबर सन १८८९ इ० | अंक ३७

AKOLA MEDICAL & SUCICAL HALL.

Hari Vaman Phat.
L. M. & S.

अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथे पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल.एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कल्प आणि दांतास मजबुती व मुख सुंगंधी कारक. दंतशाण. हीं औषधें मिळतील.

गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मूत्र समई पतन होते. परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

पांचवी राष्ट्रीय सभा

(ता०२६ डिसेंबर १८८९ रोजीं मुंबईस होणारी)

(३९ अंकावरून पुढें चालूं)

या देशाचें कल्याण करण्या करितांच आपण राज्य करीत आहों असा आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते अभिमान बाळगितात व तो यथार्थही आहे. अशा राज्यकर्त्यांस त्यांचा तो हेतु अमुक उपायांनीं पूर्ण होईल असें सुचविण्या साठीं एखादी सभा निघाली तर ती त्यांच्या हेतूस अडथळे आणणारी आहे, असें ह्मणतां येईल काय? 'रयतेचें सुख तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तोंच आमची मजबूती, व त्यांची कृतज्ञता तेंच आह्मांस उत्तम फळ' असें महाराणी सरकारचें आश्वासन आहे. तेव्हां या महाराणी सरकारच्या राज्याची आबादानी व मजबुती कशानें होईल हें सांगितल्यानेंच राजनिष्ठेचें कर्तव्य आपण उत्तम रीतीनें केल्याप्रमाणें होईल. सारांश राजनिष्ठेच्या संबंधानें पाहिलें तर खरी राजनिष्ठा ह्या सभेच्या अनुयायी लोकांत जशी नांदत आहे तशी दुसऱ्या लोकांत नाहीं. राज्यकर्त्यांचें हित संपादन करणें हें जें खऱ्या राजनिष्ठ प्रजेचें मुख्य लक्षण तें या सभेच्याच हातांतून होत आहे. आणि इंग्लिश सरकारचें राज्य ह्या देशांत चिरस्थायी होण्यास ह्या सभेचा उद्योग जसा कारणीभूत होईल तसा कांहीं लोकांचा स्वस्थ बसण्याबद्दल केलेला उपदेश होणार नाहीं असें ह्मणण्यास कोणतीही हरकत नाहीं.

तिसऱ्या प्रकारचे कांहीं लोक आहेत त्यांस अशी सभा असूं नये असें वाटत नाहीं, परंतु अशा सभांपासून ताबडतोब फलप्राप्ति दिसत नाहीं ह्मणून ते ह्या सभेपासून दूर राहतात. परंतु नित्य येणारे अनुभव मनांत घेऊन ते जर विचार करतील तर त्यांची ही उदासीनता तेव्हांच नाहींशी होईल. इंग्लिश सरकार पुराणांत वर्णिलेली कामधेनु किंवा कल्पवृक्ष नाहीं, व हल्लींचा काळही पुराणांतला नाहीं. आपण मृत्युलोकीं वसत आहों आणि ह्या लोकीं राहणाऱ्यांना आपल्या ह्मणण्यापमाणें घडवून आणण्याचें असेल तर दीर्घ उद्योग आरंभिला पाहिजे. त्यांतून मोठमोठ्या राजकारस्थानाच्या गोष्टींची सिद्धी मनांत आणल्याबरोबर किंवा अल्पायासानें होत नसते, व झाल्यास चिरस्थायी नसते. हीं तत्वें ही आपण लक्षांत बाळगिलीं तर ह्या शंकेचें निराकरण तेव्हांच होणार आहे. खेरीज गेल्या चार वर्षांत चालल्या उद्योगाचें फळ मुळींच कांहीं जाहलें नाहीं असेंही ह्मणण्यास जागा नाहीं. खर्चांत काटकसर करावी ह्मणून लोकांचें ह्मणणें आहे त्याप्रमाणें चौकशी करून थोडा बहुत तजवीज येथें व विलायतेस चालूं आहे. वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या नेटिव लोकांस द्याव्यात याबद्दलही चौकशी होऊन विचार चालूं आहे. कायदे कौंसिलांत सुधारणा होऊन प्रजापक्षास अधिक हक्क मिळावेत याविषयींही विचार पार्लमेंटपुढें आला आहे. अबकारी खात्याच्या संबंधानें लोकमतास अनुकूळ अशी व्यवस्था व्हावी ह्मणून पार्लमेंटांत ठराव जाहला आहे. हत्याराच्या कायद्याच्या नियमांतील सक्ती कमी करण्याविषयीं सरकारचें लक्ष्य बऱ्याच अंशानें लागलें आहे. व्हालंटियर लष्करांत नेटिव लोकांचा थोडासा प्रवेश होण्यास सुरूवात झाली आहे. पार्लमेंट सभेचें लक्ष्य हिंदुस्थानचे कारभाराकडे अलीकडे विशेष रीतीनें व जागृतपणानें लागलें आहे. ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या असतां असल्या उद्योगापासून तादृश फळ दिसत नाहीं हें ह्मणणें यथार्थ नाहीं. अशा गोष्टी एकदम होण्यासारख्या नसतात संसारांत आपण नेहमीं पहातों कीं, बापाचा प्रत्यक्ष मुलगा असतो व तो त्याजपाशीं कांहीं जरूरीची वस्तु मागत असतो. तरी त्याच्या पहिल्या मागणी बरोबर तो वस्तु मिळत नाहीं. त्याला त्या वस्तूची किती जरूरी आहे व ती त्यास दिली असतां तिचा तो सदुपयोग करील ह्याची बापास परीक्षा करावयाची असते. एकदां नाहीं ह्मणून मागलें तर बरेंच जाहलें असें समजून तो पहिल्यानें नाहींच ह्मणतो. परंतु मुलानें पुनः आपला नाद ठेविला तर तो विचार करूं लागतो, आणि आपली सोय व मुलाची योग्यता पाहून त्यास ती वस्तु देतो. आपल्या राजकर्त्यांचा प्रकार तरी थोडाबहुत ह्याच सारखा आहे. प्रजेचा आग्रह किती आहे हें त्यांस पहावें लागते, आणि तिचा आग्रह न्याय्य आहे अशी त्यांची खात्री झाली कीं प्रजेचें ह्मणणें कबूल करण्यास ते सिद्ध होतात. तेव्हां राष्ट्रीय सभेनें ठराव केल्याबरोबर, सरकाराकडून त्यास रुकार मिळत नाहीं ह्मणून त्या सभेत कांहीं अर्थ नाहीं हा शंका अगदींच निराधार ठरतें. सभेचें महत्व वाढावें आणि तिच्या ह्मणण्याप्रमाणें वागणें जरूर आहे असें सरकारास वाटूं लागावें अशी जर ह्या लोकांची खरोखर इच्छा असेल तर ह्या सभेस सर्व लोकांची अनुकूलता होईल असें त्यांनीं केलें पाहिजे. जोंपर्यंत वेगवेगळे पक्ष राहून वेगळे उद्गार निघतील तों पर्यंत कोणत्याच पक्षाचे सरकारावर वजन पडणार नाहीं. परंतु सर्व प्रजेचें अथवा प्रजेंतील विशेष मोठ्या भागाचें एकचित्त होऊन सर्व प्रजा हक्क मागेल तर तें मागणें कबूल केल्या शिवाय रहाणार नाहीं. करितां आपल्या इच्छा लवकर पूर्ण व्हाव्या असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं सभेपासून दूर न रहातां तीस मिळालें पाहिजे; आणि तिच्या अभिमान्यांचा जमाव फार मोठा आहे व ती सर्वांचा जीव व सर्वांच मुख आहे अशी सरकारची खात्री केली पाहिजे. सभेपासून दूर रहाणें ह्मणजे आपल्याच हातांनीं आपल्या पायावर धोंडा मारून घेणें होय. ज्यांच्यांत ह्मणून विचाराचा लेश आहे ते हा वेडेपणाचा मार्ग कधींही स्वीकरणार नाहींत, आणि सर्व लोक ह्या सभेस येऊन मिळतील अशी उमेद आहे.

सारांश, ह्या सभेच्या संबंधानें नीट विचार केला आणि आपल्या लोकांची व राज्यकर्त्यांची एकंदर स्थिती लक्ष्यांत आणिली तर आमच्यांतील शहाण्या लोकांनीं हा जो नवीन उपक्रम सुरू केला आहे, ही जी आमच्या कल्याणाची नवी वाट काढली आहे, ती राज्यकर्ते आणि प्रजा ह्या दोघांसही अत्यंत हितकारक आहे असेंच आढळून येईल. नाना प्रकारच्या विकारांस वश होऊन अविचारी लोक ह्या नवीन सभेस नांवें ठेवितील तर ठेवोत; परंतु ज्यांच्यांत ह्मणून विचाराचा लेश आहे, ज्यांची नजर तूर्तच्या लाभा पलीकडे पोंचतें, ते सर्व ही सभा स्थापन करणाऱ्या सत्पुरुषांचे खास उपकार मानतील. ह्या सभेचें महत्व उत्तरोत्तर जास्त वाढत गेलें, पाहिजे. तसें जर होईल तरच हा खटाटोप केल्याचें चीज होईल. पण तसें चीज करून घेणें एकंदर प्रजेच्या हातीं आहे. सभेचें खरें महत्व ओळखून सर्व ठिकाणचे लोक आपल्या कर्तव्यास जागतील तर ह्या सभेचें सरकाराजवळ फारच वजन वाढेल. लोकांची ह्या सभेच्या संबंधानें कर्तव्यें फार थोडीं आहेत. तिच्या उद्देशाची सर्वांनीं माहिती मिळवून घेऊन आपआपल्या वतीनें हुषार, वजनदार, व खऱ्या कळकळीचे मुखत्यार सभेस पाठविण्याची प्रतिवर्षीं व्यवस्था ठेवीत जावी. इतकें त्यांजकडून झालें आणि सभेंत जमलेले मुखत्यार परत आल्या नंतर सभेंत काय निकाल झाले ह्याची माहिती मिळवून त्या निकालाविषयीं लोकांनीं आपली अनुकूलता दर्शविली ह्मणजे लोकांचें कर्तव्य बरेंच आटोपेल व सभेसही चांगलें रूप येईल.

परंतु ज्या प्रांतांत ही सभा भरावयाची असेल त्या प्रांतांतील लोकांवर जास्त जबाबदारी आहे, त्यांचा प्रांत ह्मणजे त्यांचें घर असेंच त्यांनीं समजलें पाहिजे, आणि राष्ट्रीय सभेस येणारे हजार पंधराशें मुखत्यार आपले पाहुणे आहेत असें मानून त्यांच्या आदरातिथ्याचें व सभेच्या त्या वर्षीच्या व्यवस्थेचें ओझें त्यांनीं आनंदानें पत्करलें पाहिजे. सर्वांनीं ह्या ओझ्यास यथाशक्ति हात लावण्याचें मनांत आणिलें असतां तें इतकें हलकें होणार आहे कीं, त्याचा भार आपणास तिळमात्रही वाटणार नाहीं. ज्या व्यवस्थेच्या योगानें आपल्या पोरांगळाचें, आणि देश बंधूचें निरंतरचें कल्याण होणार आहे. तिला जर मदत करावयाची नाहीं तर ती करावयाची तरी कशास? ज्या सभेच्या योगानें वीस कोटी प्रजेचें नेहमींचें हित होणार त्याच साठीं कलेल्या मदतीच्या योगानें जसा महोपकार घडेल, आणि जसें पुण्य लागेल तसा महोपकार इतर कशानेंही घडणार नाहीं; आणि तसें पुण्यही इतर कशानेंही लागणार नाहीं. आपण धर्मकृत्य करितों त्यांत तरी कांहीं स्वार्थ-

बुद्धी असते. परंतु हा धर्म असा कांहीं आहे कीं ह्याजमुळें विशेषसा स्वार्थ साधनाचा दोष न लागतां खऱ्या देशहिताचें व परोपकाराचें पुण्य जडणार आहे. ह्यासाठीं ह्या सभेची अवश्यकता, उपयुक्तता आणि महत्व ह्यांजकडे दृष्टी देऊन प्रत्येकानें तिच्या उत्कर्षार्थ मनोभावें यथाशक्ति झटण्याचा निश्चय करून तो निश्चय ताबडतोब अमलांत आणावा अशी विनंती आहे.

वऱ्हाडसमाचार.

मिती भाद्रपद वद्य १३ शके १८११

इंग्रजी अम्मल आल्यापासून हिंदुस्थानवाशीं सर्व जनाला त्यांत मुख्यत्वें करून गरीब लोकांना हरएक प्रकारें सुख झालें आहे यांत कांहीं संशय नाहीं. मुख्यत्वेंकरून गरिबांना म्हटलें याचें कारण इतकेंच कीं पूर्वीं "बळी तो कान पिळी" असा न्याय असल्या मुळें बऱ्या लोकांच्या सुखाकरितां हवेतें होत असें बऱ्यांत गरीब लोकांचा अगदीं चुराडा होत असे, परंतु हल्लीं ती स्थिति नाऊन सर्वांना सारखेंच सुख प्राप्त होत आहे हें फार आनंदनीय आहे. जी सर्व स्थिति सर्व हिंदुस्थानभर आहे तोच आमच्या वऱ्हाडांत इंग्रज सरकारच्या अमलाखालीं प्राप्त झाली आहे. व त्या प्रमाणें सर्व लोक आपल्या जिंदगीचा उपभोग निरधास्तपणें घेत आहेत, अशी सर्व ठिकाणीं स्थिति असतां जळगांव तालुक्यांतील कांहीं गांवच्या लोकांनां मोंगलाईचें पुन्हां स्मरण होणें हें फार शोचनीय होय.

सदरील तालुक्यांत वसाळी, आरोडी, निमखेड, चीचारी, सायखेड वगैरे गांवें सातपुड्याच्या पायथ्याशीं आहेत. व त्या गांवांत बहुतेक सर्व वस्ती गोंड व भिल्ल लोकांचीच आहे. हे लोक पाहडांतील लांकडें वगैरे आणून ती बाजारांत विकून आपली उपजीविका करीत असतात परंतु आज दोन तीन वर्षां पासून सदर्हू लोकांनीं असा क्रम आरंभिलेला आहे कीं हंगामाच्या दिवसांत पाहडपट्टी कडील त्यांच्या गांवाच्या आसपास जी शेतें आहेत त्यांतील पिकें कापून नेऊन कोठें तरी पहाडांत दडपून ठेवितात व नंतर कांहीं दिवसांनीं तो माल आपल्या सावकार लोकांच्या घरीं पावता करितात किंवा हे सावकार लोक आपल्या गाड्या वगैरे पाठवून हमाल आणवून घेतात असा त्या बाजूला प्रकार चालूं असल्या मुळें लोकांना शेतसारा सुद्धां आपल्या पदरूनच द्यावा लागतो व आणखी कांहीं दिवस जर अशीच स्थिति कायम राहिलीतर बहुतेक लोक त्या बाजूची आपली जमीन अगदींच सोडून देतील.

गुदस्त साली सदर्हु प्रकाच्या लुटीचा सरकारनीं कांहीं बंदोबस्त करावा म्हणून तहशीलदार साहेब तालुक्यांत आले असतां शेपन्नास लोकांनीं तोंडी अर्ज केला होता व त्या प्रमाणें पोलिस सुपरिंटेंड अकोलें यांकडे तहशीलदार साहेबानीं लिहून ही पाठविले होते. परंतु त्याचा अम्मल मात्र कांहीं झाला नाहीं उलट अर्जदार लोकांना इतका मात्र फायदा झाला कीं पूर्वी जे थोडे बहुत पीक चोरीस जात असें तें गुदस्तसालीं अमुक अमुक लोकांनीं अर्ज केला आहे अशी नांवें त्या भिल्ललोकांनां समजल्यामुळें त्यांनीं त्या लोकांची खोड मोडण्या करितां अगदीं त्यांचीं शेतेंचीं शेतें कापून नेलीं.

हे चोरी करणारे लोक एकदोन नव्हे सुमारें शेंदोनशें आहेत व सर्वच एका धंद्याचें व एका मताचे असल्या मुळें कोणाची कोणाला भिति असण्याचें कांहीं कारण नाहीं. व ज्या वेळेस हे लोकचोरी करण्यास जातात ते जमावानें जात असल्यामुळें शेतावरील रखवालदार किंवा इतर लोकांचें त्यांच्या पुढें कांहीं चालत नाहीं.

अलीकडे हा धंदा प्रारंभ होण्याचें असें एक कारण समजतें कीं त्या बाजू कडील कांहीं सावकार लोकांनीं त्यांनां आश्रय दिला आहे. तो असा कीं बरसातीच्या दिवसांत जेव्हां त्यांचा लांकडांचा व्यापार फारसा चालत नाहीं व त्यांना खाण्याची तंगी असते त्या वेळेस हे सावकार लोक त्यांनां खाण्याचा पुरवठा करितात व त्या लोकांपासून वाटेल त्या भावावर कापसाची व जवारीची लावणी करून घेतात व त्या प्रमाणें त्यांचा जवळून दिलेले सर्व कर्ज दुपट चौपट व्याजा सुद्धां वसूल करितात व त्यांचा चोरीचा माल विकत घेतात.

असा प्रकार तिकडे चालूं असल्यामुळें गरीब लोकांना आपल्या मेहनतीचें फळ मिळत नाहीं तर पोलिस अम्मलदार व मे. डेप्युटी कमिशनर साहेब या कामाकडे दुर्लक्ष्य न करितां हंगाम सुरू होण्या पूर्वी योग्य बंदोबस्त करतील अशी उमेद आहे. कांहीं दिवस पर्यंत सरकारनीं स्पेशल पोलिस नेमून त्या लोकांनां जरी दाबांत ठेविले व रात्रीं त्याच्यावर जत्पी ठेविली म्हणजे सर्व बंदोबस्त होईल व शेतकरी लोकांनां आपल्या श्रमाचें फळ मिळेल. स्पेशल पोलिस नेमण्या बद्दल जो खर्च सरकारास लागेल तो जरी कदाचित् सर्वच त्या लोकांच्यांनीं देवविणार नाहीं तरी आपल्या शक्तिनुसार मदत करण्यास ते लोक तयार आहेत तर मे. डेप्युटी कमिशनर साहेबानीं या बद्दल सर्व तपास करून लवकर व्यवस्था करावी अशी आमची त्या गरीब लोकां प्रत्यर्थ सूचना आहे.

रक्तपितीचा पसार सर्व हिंदुस्थानभर दिवसेंदिवस जास्त वाढत चालल्यामुळें सरकारला त्या संबंधीं कायदा करणें भाग पडलें व त्या प्रमाणें हल्लीं एक बील तयार होऊन सर्व प्रांतिक सरकाराकडे व त्यांच्याकडून सर्व अधिकाऱ्यांकडे व इतर लोकांकडे पाठविण्यांत आलें आहे. सदरहू बिलांचा उद्देश असा आहे कीं ह्या रोगाचा पसार होऊं देऊं नये व ह्या महारोगानें ग्रस्त झालेल्यांची स्थिती होतां होईल तोंपर्यंत सुधरावी. इतर ठिकाणाप्रमाणें आमच्याही प्रांतिक सरकाराकडून तें बील अभिप्राय करितां सर्व डेपुटी कमिशनर साहेबाकडे व त्याच प्रमाणें मुनिसिपाल कमेट्याकडे पाठविण्यांत आलें आहे. त्या बिलांतलीं कलमें आहेत त्यांत दोन तीन कलमें मुख्य असून बाकीची कलमें कामाची व्यवस्था वगैरे करण्याच्या संबंधाची आहेत. सदरहू कलमांत असें सांगितलें आहे कीं सरकारानीं किंवा मुनासिपालिट्यांनीं किंवा इतर मंडळीनीं (रिट्रीट्स) वेगळी गृहें बांधून त्यांत या महारोगानें पिडित जे लोक भिक्षा मागित फिरत असतील किंवा ज्या लोकांनीं आपली उपजिविका करण्यास योग्य साधन नाहीं अशा लोकांस ठेवून त्यांचा रोग बरा करण्याबद्दल व्यवस्था करावी व ते बरे झाले ह्मणजे त्यांना सर्टिफिकिटें देवून सोडून द्यावे. या शिवाय जे लोक आपखुषीनें सरकारला आपण होऊन अर्ज करतील त्यांनाही त्या गृहांत ठेवण्यांत येईल व त्यांची ही वरील प्रमाणें व्यवस्था होईल. इतकेंच काय ते या कायद्यांत सांगितलें आहे. बाकी जे लोक मोठे असून आपणहोऊन अर्ज करणार नाहींत त्यांचा रोग कसा जावा हें या कायद्यांत अगदीं सांगितलें नाहीं खरोखरच जर रोगाचा पसार बंद करावयाचा तर लहान मोठ्यांचा सर्वांचा काढून टाकिला पाहिजे. केवळ गरीब लोकांचा काढला व मोठ्याचा तसाच ठेविला ह्मणजे पसार बंद होणार नाहीं तर ह्या लोकांना जरी जुलमानें त्या गृहांत आणण्याची खटपट करितां येणार नाहीं तरी त्यांना सदरहू रोग बरा करून घेण्या विषयीं भाग पाडणें अयोग्य होणार नाहीं. तर ऐवढ्या करितां ह्या कायद्यांत असें एक कलम घालावें कीं जे लोक वरील गृहांत येत नाहींत त्यांनीं आपल्या घरींच राहून आपआपल्या पदरचे पैसे खर्च करून हा रोग दूर करण्या विषयीं खटपट करावी व अशा करितां त्यांना कांहीं एक मुदत नेमून द्यावी. त्या मुदतीच्या आंत जर त्या लोकांनीं आपणाला बरें करून घेतलें नाहीं किंवा करण्याबद्दल योग्य तजवीज चालूं केली नाहीं तर त्यांना ह्या गृहांत येण्याविषयीं भाग पाडावें. अशा प्रकारची व्यवस्था तर कायद्यांत केली नाहीं. तर रोगाचा पसार कमी व्हावयाचा नाहीं. व हेही लोक आपला रोग दूर करण्याबद्दल खटपट करणार नाहींत.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 23 1889.

We learn that the Judicial Commissioner H. A. D. has seriously taken up the matter of reform of the Berar Pleader's examination rules. Certainly it is a matter worth such a handling now. In making the reform it is proposed as we hear, that some more qualifications as to the eligibility of candidates for the examination are to be added. The qualifications are to be first that he should have passed his matriculation examination of some university, and that this condition is intended to operate retrospectively. With the advanced state of education of this province, the condition must be imposed. The other condition proposed is that the candidate should be a resident of Berar. The latter condition appears to be illiberal at the first thought, yet the prejudical feeling against it will, no doubt, be melted away on consideration of the fact that if local interests are not thus protected, the province might soon be swamped by outsiders. It has also a precedent in the adjoining Central Provinces. Though that province is thrice as large this province, this condition does very well there and is generally approved of. If that principle is intended to apply here at all, it has still stronger grounds to justify that condition here. But the worst of all would be to give either of these conditions a retrospective effect. The most essential principle of all Legislative Bodies as far as we know, is against giving such an effect to any act, regulation or enactment passed by them. It matters very little whether the act &c. embodies substantive or adjective law. This fact is evident from reading attentively all the speeches made by framers or amenders of any law in the Indian Legislative Councils. Almost all the High Courts also join in holding the principle strongly.

Secondly, looking to the source from which the rules, as at present stand, are taken, the idea of giving such an effect to them ought to be entirely abandoned. The Bombay High Court, amended its rules under the legal Practitioner's Act twice. In the begining the examination was held in the Marathi language. At the first amendment English was substituted for Marathi. It still allowed all the candidates, who had appeared *before* to enjoy the right of appearing for the examination if they could only answer the questions in the English. Such candidates are still enjoying this right without the least restriction. Secondly the rules were amended to admit matriculated candidates only. In this case too, the rights of those who appeared before this second amendment, have been still sacredly kept untouched. The same principle is also strictly adhered to in case of all university examinations by university syndicates.

On the whole it appears that every reform or amendment of any act or rules should be only preventive of future evil and not destructive of vested rights. These facts and precedents, however, do not absolutely bar any proposal of any reasonable amendments. If the Judicial Commissioner is fully satisfied that very raw students had appeared before, it is only right to prohibit them for some years to come, but not to bar them entirely. He has also full discretion to compel the newcomers strictly to fulfil the two conditions.

The third point of reform is, as we hear, the taking away the maximum limit of age of a candidate. At present it is fixed at 35. It would be wise to remove this restriction. Those, who have energy, may be allowed to appear if otherwise qualified.

PLEADERS EXAMINATION 1889 CRIMINAL LAW AND POLICE

Time allowed two hours.

I You are consulted as to the legality of the following sentences; what advice will you give.

[1] The accused is convicted of murder section 302 Indian Penal Code and the sentence of court is that the accused be sentenced to transportation for life and that all his property be forfeited to Government.

(2) The accused is convicted of culpable homicide not amounting to murder section 304 I. P. C. and is sentenced to transportation for 20 years and his moveable property is forfeited to Government.

(3) The accused is convicted of rob-

bery (section 392 I.P.C.) and the sentence of the court is that he be kept in rigorous imprisonment for 5 years and that the rents and profits of his moveable property accruing during that term be forfeited to Government.

(4) The accused is convicted of theft section 379 I.P.C. he having before been convicted of theft under the same section and being liable to enhanced punishment under section 75 I.P.C. order of the court is that he be sentenced to ten years rigorous imprisonment and thirty stripes to be inflicted twenty days after desposal of the appeal.

(5) The accused is convicted of house breaking by night, section 457 I. P. C. and the sentence of the court is that he be kept in simple imprisonment till the rising of the court and pay a fine a Rs. 20 in default of payment he will be kept in simple imprisonment for 10 days the whole of which time will be passed in solitary confinement.

(6) The accused is convicted of assault, section 352 I P. C. and sentence of the court is that he pay a fine of Rs 10 and in default be sentenced to simple imprisonment for one month.

(7) The accused is a European British subject, he is convicted of an offence under the Police Act section 34, and the sentence of the court is that he pay a fine of Rs 10 or in default be kept in simple imprisonment for 1 month.

(8) The accused is not a European British subject, he is convicted under the same section and sentenced to rigorous imprisonment for one day and a fine of 3 Rs. As he confesses his inability to pay the fine he is sentenced to one months simple imprisonment in default of payment of the fine. Marks 10

II what are the limits of the right of private defence. Give the whole law on the subject. Marks 10

III Define mischief and enumerate the aggravated forms of mischief for which a special punishment is provided. Marks 10

IV Distinguish between theft, extortion, robbery, and cheating, criminal misappropriation of property and criminal breach of trust.

A Police man is accused of being absent on his post. He sends his superior officer a paper which purports to be a copy (made by himself) of a receipt given to him by the Patel of a village dated the day on which he is said to have been absent. It is proved that the Patel never gave a receipt. What offence has been committed.

V What are the special rules of evidence in criminal cases laid down in the Code of Criminal Procedure. Marks 10

VI Describe and contrast the difference in procedure in the trial of summons, warrant and sessions cases respectively; also contrast the difference in the way the evidence is recorded by a Magistrate according as he is trying a summons or a warrant case or he is holding an enquiry in a case that has to be committed for trial. How will his powers affect the mode of recording evidence in each of the three kinds of cases. Marks 10

VII What are the ordinary powers of a Magistrate of the 1 st class in regard to nuisance, maintenance, taking security to prevent a breach of peace, taking security for good behaviour and the prevention of breaches of the peace. What powers does the sessions Judge exercise in regard to each of these matters. What are the powers of a magistrate in dealing with property produced before him in a case, and what powers does the sessions Judge excercise in regard to such property produced before a District Magistrate in a case decided by a District Magistrate. Marks 15

VIII What appellate and revisional powers are vested in the District magistrate. What appellate and revisional powers are vested in the sessions Judge; and what appellate and revisional powers are vested in the High Court. In what cases of conviction is no appeal allowed and in what cases in which appeal is allowed is the right of appeal limited. Can a District Magistrate ever revise his own order. Marks 15

PLEADERS EXAMINATION
1889 SPECIFIC RELIEF
TRANSFER OF REAL
PROPERTY MORTGAGE
AND TRUST.
Time Allowed 2 hours.

I What are the rights, duties and liabilities of a mortgagee in possession.

II Decide the following cases

(1) A agreed to purchase a field from B B agreed to execute a conveyance. A pays B Rs 100 on account of the sale. B after receiving the money, but before executing the conveyance sells the property to C who knows nothing of the agreement between A and B or of the payment to B A sues C for possession of the field which has been given over to C and in the alternative for a declaration of his lien on the field to the extent of Rs 100

(2) A was a widow and guardian of a minor B. she sold a field belonging to him to c. C knew that A wanted the money for her private use. C sold the field for Rs100 to D. D did not know how the money paid by C to A had been applied. He knew it had been sold by A as guardiun of B to C as C made over the deed to him. He made no enquiry as to how the money had been applied. When B came of age he found D in possession and he sued for possession.

(3) A was a Hindu widow in possession of property which had belonged to her husband. B purchased the property from her for Rs 1000. He knew nothing of why she had sold it and did not enquire. After holding for 10 years he sold the property to *C* for Rs 1200. C held 5 years and was then sued by D the reversioner on the death of A who claimed possession alleging that the widow had no right to sell the property. Nothing was known as to the purpose for which the property had been sold.

(4) A possesses a house. He mrotgaged it first to B and then to C the property was then attached by D a criditor and the equity of redemption was sold to D. After the sale C paid B the sum due to B. D then tendered the sum due on C's mortgage to C and on C's refusing to accept it and claiming payment of the sum due on B's mortgage in addition brought a suit for redemption against C payiug into court the sum due on its mortgage alone.

(5) A the owner of certain lands mortgaged them to B C D and E in that order D wanted to get the debtor entirely into his own hands and he therefore offered to pay off all the other mortgagees C with the same object claimed to pay off the rest B and E did not care and were willing to accept payment from either C sued D to establish his right to pay D. Marks 10

III What are the duties of a trustee. In what cases is a trustee liable to pay interest under the provisions of the Indian Trust Act and at what rates may he be charged.

At what rates should he be charged when the trustee disregards a direction in the trust deed directing him to invest trust money in securities of the Government of India and to accumulate the dividends thereon. Marks 10

IV What are the rights and liabilities of a lessor.

What would you decide in the following cases, give reasons (1) A owns a garden. It is leased to B. The lease is not for a fixed time but is to be determined when the lessor dies. The lessor dies. Who is entitled to the crop then growing?

(2) A owns a field he lets it to B for cultivation for ten years. B builds a house on it the year after the lease. A objects and sues to leave the building removed.

(3) A gave B a lease for a year from the 4th september 1886. on the 4 September 1887 A walked into the house and asked B to turn out. B refused, and pushed A out of the house and shut the door on him. A sued B for assault, and claimed damages which were admitted to be reasonable if B had not a right to turn him out. Had B the right?

(4) A let a house to B. There was no servant latrine in the compound, B did not notice this when he went in; afterwards he found the inconvenience and as the Municipal Committee were bent on having a latrine constucted in every compound, B expended a reasonable sum in constructing a latrine. He did not consult the landlord, but he deducted the sum spent from the rent. The landlord sued him for the some with-held. Is the landlord entitled to succeed. Marks 20

V What contracts cannot be specifically enforced, and for whom may contracts be specifically enforced. When may perpetual injunctions be granted. Can a Tahsildar's court in Berar grant a perpetual injunction and if not why not? Marks 15

VI Give your opinion in the following cases.

(1) A sues B for the specific performance of a contract to deliver to him ten bojas of cotton. The court dismisses the suit on the ground that the performance of the contract cannot be specifically enforced. A files another suit against B for damages; the court dismisses the suit, on the ground that the matter is resjudicata; what should A do?

(2) A covenants that if he should at any time be entitled to property exceeding 1000 Rs he will settle it on B's children. Before he gets 1000 Rs and before *B* has any children he institutes a suit against *B* to obtain a declaration that the covenant is void. Can the court make the declaration.

(3) A brings a suit against B for a declaration that he is the adopted son of her husband C deceased and obtains a decree declaring him to be the adopted son. Five years after *B* dies. *C*'s devided brother D then claims the estate, and brings a suit against A. A pleads that the case is resjudicata. Should D's suit be dismissed?

(4) A contracts to sell land to *B* for 5000 Rs. B takes possession of the land and afterwards A sells it to C for Rs 6000 C makes no enquiry of *B* relating to his interest in the land. Can B enforce specific performance of the contract against C? Marks 20

Akola water supply has been under contemplation for long. But nothing has yet come out of it. Now Mr. Hare has become a Pucca Deputy Commissioner of this district and our Municipality will not be slow to push the matter into his hands. He, as a president, has been taking much interest in Municipal affairs and this affords as the best guarantee. It must be admitted that the question of expenditure is a serious consideration both to the Government and to the Municipality. Still it must be faced, because the health of the people is of more importance than economy, though it is desirable in other respects. In solving the water works problem its corollary viz good drainage must not be lost sight of. The new water supply will of course make an addition to the water which must be absorbed. There will be at least half the quantity of waste water to account for. The subsoil must not be allowed to be polluted further The case of Amraoti water works is before our eyes. The city enjoys the great blessing of profuce water but for want of proper drainage, it is not altogether an unmitigated one.

Mr. S. H. King, Treasury Officer at Quetta, is granted privilege leave, for three months, with effect from the 3rd September 1889, or the subsequent date on which he may avail himself of the leave.

वऱ्हाड

मि० आत्माराम भिकाजी बुलढाण्याचे ए० अ० क० यांनीं गेल्या आठवड्यांत पेनशन घेतलें व त्यांचे कामाचा चार्ज मि० हरबानजी यांनीं घेतला. यांचे जागीं कोण येतो तें पहावें.

मि० वासुदेवराव पिसोळकर ह्ला० आ० को० यांस ए० अ० क० नेमिलें व त्यांचे जागीं मि० इस्मायल अकोल्याचे ह्ला० आ० को० यांस नेमिलें. मि० इस्मायल यांचे जागीं मि० त्रिंबक गणेश एलिचपूरचे ह्ला० आ० को० हे नेमले जावे असा अजमास आहे.

मे० कर्नल स्प्यान्स्की साहेब कमिशनर यांची स्वारी आजरोजीं येथें येणार असें समजतें.

मे० डाक्टर लिट्ल साहेब स्यानिटरी कमिशनर यांची स्वारी गेल्या सोमवारीं येथें आली. त्यांनीं शहर सफाई पाहिली.

रा० रा० गोपाळराव बळवंत यांची ३ महिन्याकरितां अक्टिंग नेमणूक येथील तहशिलदार झाल्या प्रमाणें ते गेल्या आठवड्यांत ते आपले कामीं येऊन रुजूं झाले व पहिले तहशिलदार यांनीं रजा घेतली.

मि० प्रायडो, आफि० अ० सु० पोलिस यांस उमरावतीस नेमलें.

ले० आर. डी. सी. डेव्हिस, अ. क. यांस क्यापटन नेमलें.

मि० सुब्रापल नायडु मोर्शीचे तहशिलदार यांस पन्नास दिवसांची हक्काची रजा मिळाली व त्यांचे जागीं रा. रां. बाळकृष्ण बळवंत सुळे, क्लार्क ऑफ स्मालकाज कोर्ट उमरावती यांची नेमणूक झाली.

वर्तमानसार.

बंगाल्यांत एक लक्षाहून जास्त लोक कॉल यानें व दहा लक्ष ज्वरानें मेले.

सन १८८९ त इंग्लंडास ९६२९८६० रुपयांचे गहूं गेले.

मध्यएशियांत बगदाद नजीक रशियन अधिकाऱ्यांनीं आपलें लष्करी ठाणें कायम केलें व बराकी बांधण्याची सुरुवात झाली.

हायकोर्टांतील ज्यडज्यांनीं आपण कामास केव्हां लागलों व पुरें केव्हां केलें याची नित्य नोंद ठेवावी, असा सरकारनें हुकुम सोडला ह्मणतात. एका अंगानें ही रीत बरी आहे.

लंडन सोडण्यापूर्वी इराणच्या शहानें जर प्रसंग आलातर आपल्या राज्यांतून इंग्लिशास वाटेंदेण्याचा करार केला आहे.

येत्या आक्टोबर पासून जिल्हा व तालुका बुकडेपो बंद करण्याबद्दल क्युरेटर साहेबां कडून हुकूम सुटलें आहेत.

दरवेशी लोकांचा दंगा बराच उसळला आहे व व्यापाराचे रस्ते बद पडले आहेत असें केरो येथील तारेवरून समजतें.

या महिन्याच्या २२ तारखेस सिमला सोडून व्हाईसराय साहेब पेशावर कडून केहाट कडे जातील.

देशी हुन्नर—कोणी पटेल नांवाच्या गुहस्थानें बुटास लावण्याचे आणि पारशी लोकांच्या पगड्यात लावण्याचे पालिश तयार केलें आहे.

भयंकरखून— हिंदु मट्रियट वरून पुढील बातमी कळते:— कोणी एक दासी आपल्या यजमानाच्या दीड वर्षीच्या मुलास घेऊन बाजारांत गेली होती तेथें एका खाटकाचे दुकानीं त्या मुलास बसवून ती आपल्या कांही कामाला तेथून निघून गेली या बालकाचे अगांवर दागिने होते. त्या खाटकास लोभ सुटला. त्यानें अत्यंत निर्दय पणानें त्या मुलास उचलून नेलें आणि बकऱ्याच्या पोरा प्रमाणें त्या अनाथ बालकास चराचरा कापून टाकलें इतकें करून तो मांगदृदय खाटिक राहिला नाहीं. त्यानें त्या बालाचें मांस गिऱ्हाइकांस विकलें देखिलें!!! पुढें ती दासी परत येऊन मुलगा कोठें आहे म्हणून त्या खाटकास विचारूं लागली त्यानें न घाबरतां सांगितलें कीं, मुलाचा बाप त्यास घेऊन गेला. दासीस त्याचा संशय आला. तिनें पोलिसास खबर दिली. पोलिसानें त्या खाटकास आणि त्याच्या साथ्यांस पकडलें आहे काय भयंकर हृदयाचा इसम हा! मानव राक्षसच हा. दुसरें काय!

कागदाचीं गलबतें— जर्मनीच्या आरमाराच्या कामदारांनी कील येथें केलेल्या कागदाच्या टार्पेडोनामक आगबोटीची प्रचीती पाहण्यांत आली. या आगबोटींस गती विद्युत्शक्तीनें देण्याची योजना केली आहे. या आगबोटी फारच उत्तम आहेत असें अनुभवास आलें.

चमत्कारिक राघू— जबलपुराहून एक मित्र पुढें लिहिलेली एका राघूची चमत्कारिक हकीकत कळवितो:—या शहरांत रा. रा. नरहर महादेव केमकर या नांवाचे एक गृहस्थ येथील डिस्ट्रिक्ट इंजिनिअरचें आफिसांत क्लार्क आहेत. त्यांचे घरीं एक राघू (मादी) आहे. हा राघू त्यांचे जवळ सुमारें १८ वर्षा पासून आहे. या शिवाय, ज्यावेळीं एका जवळून त्यांणीं हा पक्षी विकत घेतला त्यावेळीं त्याचे वय सुमारे २।३ वर्षाचे असावे. म्हणजे सध्या हा राघू (मादी) २०।२२ वर्षांची तरी असावी. हें या पक्षाच्या वयोमाना विषयीं झालें. आतां जी चमत्कारिक हकीकत कळवायची आहे ती ही होय. मादी प्रति एक किंवा दोन नाहीं तर ३ वर्षानीं, कोणत्या ही इतर पक्ष्याच्या संगावांचून अंडी देते! हे कसें होतें याचें कारण काहींच समजत नाहीं हा राघू पिंजऱ्यांत सदोदित बंद असतो. त्याला बाहेर कधींच काढीत नाहीं ही मादी पिंजऱ्यांतच अंडी विते व तीं अंडी राघूच्या अंड्या ऐवढीच असतात. तिनें अंडीं घातलीं म्हणजे रा. केमकर हे त्या पिंजऱ्यांत कापूस वगैरे नरम वस्तु तीं अंडीं उबविण्या साठीं ठेवितात. ती मादी कधीं २।३ दिवस पर्यंत त्या अंड्यावर बसते व नंतर ती आपणच स्वतः तीं अंडीं फोडून टाकते व कधीं कधीं ती अंडीं आपोआप पिंजऱ्याच्या गजांतून खालीं पडतात हा असला प्रकार या मादीच्या आजपर्यंत आयुष्यांत ७।८ वेळां झाला. पण इतक्या वेळांतून एकदां देखील त्या अंड्यांतून पिलूं निघालें नाहीं! तेव्हां असें कसें व कां होतें? या बद्दल कोणी प्राणी शास्त्रवेत्ता खुलासा करील तर पाहिजे. न्या० सिं०

कोहिनूरचा इतिहास—न्याशनल म्यागझाईनच्या गेल्या मे महिन्याच्या अंकांत "जी" हे टोपण नांव घेऊन एकानें आमच्या बादशाहिणीच्या मुगुटांत झळकणाऱ्या तेजोनिधी कोहिनूर हिऱ्याबद्दल संक्षिप्त इतिहास दिला आहे तो असा. गोवळकोंडच्या कृष्णानदीच्या नजीकच्या एका खाणींत मुर्खी हा हिरा सांपडला. त्यावेळी त्याचें वजन ७९३ ½ क्यारेट होतें ह्याचा आकार अंडाकृति असून झाडून साफ केल्यावर त्याचें वजन २८० क्यारेट भरलें इ० स० १५२६ मध्यें तो बाबरच्या हातीं पडला. फ्रेंचप्रवासी ट्याव्हर्नार यानें तो औरंगजेबा जवळ पाहिला होता. शहाजहानच्या कारकीर्दीत तो रत्न खचित मयुरासनावर जडलेला होता इ० स० १७३९ मध्यें नादीरशाहानें हिंदुस्थानांतून जी अपार संपत्ती नेली तींत तो नेला होता. अफगाणचा राजा शहासुजा याची बायको वाफू बेगम हिनें तो रणजितसिंगास काश्मीर सर करून दिल्याबद्दल बक्षीस म्हणून दिला रणजित सिंगाच्या राणी कडून तो धुलिपसिंगाच्या हातीं आला, आणि धुलिपसिंगापासून इंग्रज कामगारांच्या द्वारानें तोच हिरा माहाराणी साहेबाच्या शिरोभूषणांत जाऊन बसला असा कालमहिमा आहे.

इतकें भयकां वाटतें!— ला नार्मंडी नामक एका जहाजांतून २० अरब न्युयार्क शहरीं गेलें आहेत त्यांस त्याच्या इष्ट ठिकाणीं जाऊं द्यावें कीं नाहीं याचा विचार करण्यासाठीं त्यांस क्यासलगार्डन येथें अडकवून ठेविलें आहेत. जर त्यांस निमुटपणें जाऊं दिलें तर ७०००० अरब अमेरिकेंत जाण्याची वाट पहात टपून बसले आहेत, असें भय कोणी उठविल्या मुळें अमेरिकन लोक गलबलले आहेत असें म्हणतात.

जहाजें नेणारी आगगाडी— अमेरिकेंत फंडीचा उपसागर आणि सेंटलारेन्सचें अखात यांच्या मध्यें लांबच लांब एक भूशलाका आहे तिच्या मुळें जहाजांस ९०० मैलांचा फिरकांडा पडतो तो न पडावा म्हणून १००० टन व त्याच्या आंतील वजनाचीं जहाजें वाहून नेण्यासाठीं एक आगगाडी करावी असा कानडा देशांतील लोकांचा बेत चालला आहे. हा करण्यासाठीं १०००००० भांडवल जमविण्याचा ठराव ही झाला आहे. व्यापारास हिच्या मुळें मोठा फायदा होणार असल्या मुळें ती होण्याचा पुष्कळ संभव आहे. रुळ घालून त्यावर लोखंडी पाळणे घालून त्यावर यंत्रानें जहाजें चढवावीं आणि मोठमोठीं इंजिनें लावून ओढून न्यावीं असा बेत केला आहे.

४ दिवस पाण्यांत— परवां अलाहाबादेस मस्ती आलेल्या एका हत्तीस पुला जवळ डांबून टाकलें होतें. पुढें अकस्मात नदीस पूर आल्यामुळें चार दिवस हत्ती पाण्यांत बुडलेला होता त्याची सोंड मात्र पाण्यावर होती.

जलमय—नेहमीं पाणी वाढण्याच्या मर्यादेपेक्षां भागीरथीचें पाणी ३० फूट वाढल्यामुळें लालटकुरी बांद जागोजाग फुटून मुर्शिदाबाद शहर व भोंवतालचा प्रदेश गेल्या शनवारीं जलमय झाला. आणखीं चार जिल्हे असेच जलमय होण्याची भीति पडली आहे. पुरामुळें निराश्रित झालेल्या लोकांकरितां तेथल्या नबाबांनी वर्गणी सुरू केल्यामुळें ३००० रुपये वर्गणी जमली आहे.

मक्केचे यात्रे करू—तारीख २९ जुलई पर्यंत जेडडाहून ४३००० यात्रे करू मक्केस जाण्याकरितां निघाले शू० सू०

मुलतानास स्त्रिया विक्रयाचा व्यापार जारीनें चालत आहे.

२१ बिघे ५ काठ्या जमीन सरकारानें गंगेस बांध घालण्या करितां मुरशिदाबाद येथें घेतली.

एका गोऱ्यानें रावळपिंडी येथें एका मुलास चाबकानें मारल्यामुळें त्यावर खटला झाला होता. गोऱ्यास ५० रु. दंड व मुलास १० रु. दंड पडला. गोऱ्यास दंड झाला तो वाजवी. मुलांस कां तर त्यानें राग येण्यासारखें वर्तन केलें म्हणून.

केसरी.

नवें तेल—जखमा, खोंकी वगैरे भरून येण्यास रशियन लोक कोंबडीच्या अंड्यापासून तयार केलेल्या तेलाचा उपयोग करितात असें प्रसिद्ध झाले आहे या तेलाची कृति फार सुलभ आहे. प्रथम कोंबडीचीं अंडीं खूब शिजवावीं आणि त्यांतील पिवळट मगज काढून तो ठेचून विस्तवावर आग लागेपर्यंत धरावा म्हणजे त्यांतून तेल येऊं लागतें. या कृतीनें एका अंड्याचें वाहावे दोन चमचेभर तेल निघतें. दी० बं०

इंग्लिश लोकांनी ज्या बेटांत घोटाळा उडवून दिला आहे त्या क्रीट नावाच्या बेटात टर्कीनें आणखी ४०,००० सैन्य नेऊन ठेवलें आहे असें म्हणतात.

कलकत्याच्या एका डेलीं न्यूज नांवाच्या पत्रांत विमानाबरोबर घोडा बांधून त्यासह उडून जाणारास अमुक बक्षिस देण्यांत येईल अशी जाहिरात देण्यांत आली आहे. या जाहिराती संबंधानें तेथील गुराचे हाल अपेष्टा दुर करणाऱ्या मंडळीकडून त्या जाहिरात देणारास तंबी देण्यांत आली आहे.

आगगाडीच्या ज्या पात्रांत बाफ तयार करण्यांत येतें तें पात्र आंतून स्वच्छ व्हावें म्हणून एक झाडपाला शोधून काढला आहे. या युक्तीचा अनुभव हल्लीं लखनौ येथें घेण्यांत येत आहे.

आपसांतील ऐकमेकांचें वैर व तंटे मनांत आणून भांडत बसण्यापेक्षां म्युनि. मेंबरांनीं आपलें सार्वजनिक काम जास्त मन लावून करावें हें त्यांस भूषण आहे असें मान्यपत्राचें उत्तर देतांना मद्रासचे गव्हरनर लार्ड कानेमारा हे त्रिचनपल्ली येथें म्हणाले. हे उद्गार बहुतकरून मद्रास म्युनि. प्रेसिडेंट व मि. नारटन यांच्यांत जो अबुनुकसानी बद्दल खटला चालला आहे. या संबंधानें लाक्षणीक रीतीनें असतील असें वाटतें या उद्गारांचा आमच्या सर्व नेटीव मेंबरांनीं विचार करण्यासारखा आहे.

टेनन्सी व लांडरेव्हेन्यू बिलासंबंधानें कांहीं सूचना करण्यासाठीं नागपुरास गेल्या ८ व्या तारखेस एक सभा भरली होती. या सभेस बहुतेक जमीनदारच आले होते.

हिंदुस्थानांतील लष्कराचें व त्यांतील टापटिपीचें उत्तम ज्ञान व्हावें म्हणून ब्रम्हदेशांतील कित्येक ब्रम्ही लष्करी अमलदार इतक्यांत हिंदुस्थानांत येणार आहेत.

नेपाळचे दिवाण जिरसमशेर यास चीनच्या वकिलाकडून चीनमार्फत यिन लिन यिन या कोकांग व्यांग श्यांग नावाचा एक किताब देण्यांत आला. यावेळीं समारंभ मोठा थाटाचा झाला. चीननें नेपाळाकडे कां बरें लक्ष दिलें!

पुनः प्रसुति— कोल्हापूरच्या मंगळवार पेठेंतील बाळा जिन सुभाना सेरेकर याची बायको उमर वर्षे १७।१८ ही पहिल्यानेंच पूर्णमास होऊन गेल्या वैशाख वद्यांत बाळांत झाली व मुलगा झाला; पण तो लागलाच मेला. पुढें थोडेच दिवसांनीं तिचें पोट पुनः गरभार असल्यासारखें दिसूं लागलें. म्हणून तिच्या पोटांत कांहीं रोग झाला असेल असें समजून तिच्या नवऱ्यानें उपचार चालविले. पण हा उदरवृद्धीचा विकार या उपायांनीं कमी झाला नाहीं. अखेरीस सदरील बाई गेल्या मंगळवारीं मागें झालेल्या प्रसुती नंतर अदमासें साडेतीन महिन्यांनीं पुनः बाळंत झाली. मुलगी झाली. सर्व सुखरूप आहेत याविषयीं डाक्टरांचें असें म्हणणें आहे कीं प्रथम गर्भधारण झाल्यानंतर संभोगानें पुनः गर्भधारण झालें. अशाला अर्वाचीन वैद्यशास्त्रांत 'सुपर फिटेशन' असें म्हणतात.

एखाद्याची जागा म्युनिसिपालिटीनें घेतल्यास त्या जाग्याची किंमत जितकी महाग बाजारांत होईल त्यांहून शेंकडा १५ टके जास्त किंमत म्युनिसिपालिटीनें द्यावी असें नुकतेच हायकोर्टानें ठरविलें आहे.

मि. ए. च्या परीक्षेची मुदत वाढवावी, पहिल्या दुसऱ्या व चवथ्या वर्षी परीक्षा घेण्यांत यावी व कॉलेजच्या अभ्यासांत कांहीं फेरफार करावा असें मि. तेलंग यांनीं सिंडिकेटची सभा भरली असतां गेल्या गुरुवारीं बोलून दाखविलें. अजून निकाल लागला नाहीं. याला पण्यास कित्येक उलटही आहेत.

मुंबईच्या बोरीबंदर स्टेशनावर विजेचे दिवे लावण्याचें ठरलें. विजेचें यंत्र वगैरे आणून तें चालूं करण्यास एकंदर २००० रुपये खर्च लागेल असा अजमास आहे. बोरीबंदर स्टेशन असें एक अपूर्व झालें आहे तसेंच तें विद्युद्दीपांनीं शुशोभित होणेंही इष्ट होतें. व त्याप्रमाणें तेथें लवकरच विद्युद्दीपांचा झगझगीत प्रकाश पडेल.

कलकत्यास एक लढाऊ गलबत आलें असून त्यांत डायनेमिट नांवाची मोठ मोठ्या इमारती उडवून देणारी दारू पुष्कळ भाली आहे असें म्हणतात. ठा० अ०

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

केरकोळ अंकास.....८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८।०६
दुसरे खेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 2Rs.
per line over10... 4 as.
Repetition pe line 3as.

VOL XXIII | AKOLA MONDAY 30 SEPTEMBER 1889 | NO. 38

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ३० माहे सप्टेंबर सन १८८९ इ० | अंक ३८

AKOLA MEDICAL & SUCICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

अकोला मेडिकल आणि लर्सिकज हॉल.

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल.एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक. दंतशाण. हीं औषध मिळतील.

गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व स्त्री स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते. परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

जाहिरात

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, ज्या लोकांची भंगीपट्टीचें लायसेंन्स घेण्याची मुदत सप्टेंबर अखेर संपत आली असेल, त्यांनीं ता० ३०।९।८९ चें आंत पुढील मुदतीचें लायसेंन्स घेऊन जावें. न घेतल्यास त्यांचे पायखाने साफ करण्याचें बंद केलें जाईल. व त्यांनीं पुढें लायसेंन्स घेतल्या वांचून पायखाना सुरूं ठेविल्यास त्याजवर मैला केल्याबद्दल कोर्ट मारफत मुकदमे करण्याची तजवीज केली जाईल. करितां ज्यांच्या लायसेंन्साच्या मुदती संपल्या असतील त्यांनीं मुदत संपण्याचे आंत लायसेंन्सें घ्यावींत. नाहींपेक्षां यापुढें कमेटी पायखाना साफ करण्याचें संबंधानें जबाबदार राहणार नाहीं. लायसेंन्सें कमेटीचे आफिसांत (टाऊन हालांत) ११ वाजेपासून ३ वाजे पावेतों मिळतील. कळावें ता० १५।९।८९

Shankar Govind
Conservancy
Superintendent
A. M. C.

नोटीस.

रा० शेषराव बाळाजी पाटील मुकरदम मौजे सिंगनापूर यांसी खालीं सही करणार इजकडून देण्यांत येतें कीं:—

तुह्मी जनाबाई जवजे बळीराम पाटील हिचें पालन करण्याचें कायदेशीर रीतीनें सरटिफिकीट घेतलेलें नाहीं. यामुळें तिचे तर्फे दिलेली नोटीस व त्याजवर तुह्मी केलेली सही गैरकायदशीर असलेमुळें त्याज बद्दल उत्तर देणें मजला जरूर वाटत नाहीं. माझें नोटिशीचा खर्च लौकर पाठवून देणें तारीख २४।९।८९ इ०

(सही.)
अहिल्याबाई जवजे नारायण
राव नि० खु० हातची.

नोटीस.

रामचंद्र वलद बळवंत कुणबी राहणार बुईखेड तालुके चांदूर जिल्हा उमरावती यांस नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही आमचे सहीची ह्मणून एक पावती रजिष्टर करून घेतली सदरहू पावती आह्मी तुह्माला करून दिली नसून त्यावर आह्मी सही अगर निशाणीही केली नाहीं व पावतीतील मजकूर ही आह्मास खरा नसल्यामुळें मुळींच मान्य नाहीं. व या पावतीबद्दल आह्मी इनकार करीत असतांही तुह्मी ही पावती रजिष्टर करून घेतली आहे याबल आह्मी अगर आमचे वारस कोणते ही प्रकारानें जबाबदार नाहींत. यामुळें होणारी सर्व नुकसानी तुमचे पासून भरून घेतली जाईल तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८८९ इ०

(सही.)
विठोबा वलद कृष्णाजी ठाकरे राहणार सावंग प्रगणें तळेगांव तालुके चांदूर याचे हातची खुद निशाणी असे.

नोटीस.

सेगांव ता०२३।९।८९

राजमान्य राजश्री आकोला, खामगांव, सेगांव, उमरावती आणि तेल्हारा वगैरे सर्व ठिकाणच्या व्यापारी सराफ लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, मौजे उकळी तालुके जळगांव जिल्हे आकोलें येथील राहणार श्रीराम मोहोनलाल मारवाडी याजकडेस आमचे सव्याचे घेणें रुपये २००७ कांहीं आणें निघाले. ते रुपये त्याणें देण्याची तकरार केल्यामुळें त्याजवर आह्मी खामगांव कोर्टांत आजमासें ता० १-९-८९ इसवी रोजीं फिर्याद दाखल केली आहे. करितां या तारखे पासून त्याची ह्मणजे श्रीराम मोहोनलाल उकळकिर याची आमचा रुपयाचा निकाल होई पावेतों स्थावर किंवा जंगम जिनगी खरिदी किंवा गहाण करून घेऊं नये. जर करितां कोणी खरीदी किंवा गहाण करून घेईल तर तो दस्तऐवज निवळ छपावणी करितां केला आहे असें समजून रद्द समजला जाईल. ही नोटीस लिहून दिली सही.

(सही)
बंकटलाल भवानीदास
दस्तुर खद्द.

पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

चिखलदरा तारीख २४ ९-८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस.—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० पुढील चार ओळी पादस रोजीं सादर केल्या आहेत तर त्यांस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळण्याची कृपा व्हावी.

स्वप्नावस्था.

मी एके दिवशीं नित्याप्रमाणें भोजन करून वामकुक्षी करीत असतां त्या अवस्थेत माझे मनाची स्थिति कांहींशी चमत्कारिक होऊन मजला एक स्वप्न पडलें तें येणेंप्रमाणें:—

मी एके दिवशीं सडकेनें फिरत फिरत एका मोठ्या इमारतीजवळ गेलों. तेथें गेल्यावर आंत जाऊन पहातों तों दोन सभ्य गृहस्थ व एक नेटिव्ह डाक्टर असे तिघेजण बसले होते. त्यांचा संवाद ऐकून मला फारच नवल वाटलें. तो येणेंप्रमाणें.:—

एक सभ्य गृहस्थ ह्मणतात डाक्टर साहेब, माझें नेहमीं पोट दुखतें व अन्न पचत नाहीं तर मला चेंज ऑफ एअरचे सर्टिफिकिट द्यावें.

डा. सा. ह्मणतात आह्मांस कायदेशीर रीतीनें देतां येत नाहीं.

दुसरे स. गृह. ह्म. डाक्टर साहेब मजला घरीं जाणें जरूर आहे करितां मजला सर्टिफिकिट द्यावें.

डाक्टर साहेब ह्म. तुह्मी माझे परम मित्र व फार दिवसांचे स्नेही आहां तेव्हां तुह्मास एक तर काय पण शेंकडों सर्टिफिकिटें देईन. पहिल्यानें प्रिव्हिलेज लीव्ह मागावी न मिळाल्यास आमचे दवाखान्यांत थोडे दिवस मांदे होऊन पडावें ह्मणजे सर्टिफिकिटें सहज देतां येईल. परंतु मित्रा तुह्मी माझे अगोदर जाऊं नये कारण तुमचा वियोग मला सहन होणार नाहीं. मी रजेविषयीं अर्ज केला आहे. तो मंजूर होऊन येई पर्यंत थांबावें. आपण बरोबरच जाऊं. इतक्यांत एक गृहस्थ सरकारी पाकिट घेऊन डाक्टर साहेबांकडे आला. पाकिट वाचून पाहिलें तों रजा मंजूर झाली.

दुसरे स. गृह. ह्म. डाक्टर साहेब आतां कसें? द्या सर्टिफिकिट लवकर.

डाक्टरसाहे. ह्मण. मांदे होऊन पडा ह्मणजे झालें. लागलींच दुसरे सभ्य गृहस्थ डोकें वगैरे बांधून अती मांदे झाले. येणेंप्रमाणें स्वप्न दिसतां दिसतां एकाएकीं जाग येऊन दचकून उठलों व पहातों तों कोठेंच कांहीं नाहीं. पत्रकर्तेराव असें जर कोठें घडलेंच असेल तर केवढा अन्याय आहे? सरकारचा डाक्टरचे सर्टिफिकिटावर पूर्ण भरंवसा असतो. असो.पत्रविस्तार फार झाला ह्मणून पुरे करितों. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला एक
" भटकणारा. "

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्विन शुद्ध ६ शके १८११

सर्व हिंदुस्थानवर इंग्लंडशा सरकारचा अम्मल आहे त्याच प्रमाणें आमच्या ह्या वऱ्हाडावर ही आहे परंतु फरक म्हणून इतकाच कीं आमचा हा मुलुख नॉन रेग्युलेटेड प्राव्हिन्स म्हणविला जातो केवळ नांवांनेच हा प्रांत नॉन रेग्युलेटेड आहे असें नाहीं तर कामा काजाची, व कायदे कानूची व्यवस्था व अमलबारी हीं त्याच्या नांवाला दूषण आणणारी नाहींत.

इतर सर्व ठिकाणीं लोकल बोर्डाचा काय-

द्दा सुरु होऊन त्या प्रमाणें काम ही आज सहा सात वर्षें चालूं आहे. परंतु आमचे इकडे त्यांची अमलवारी होण्यास अद्याप किती दिवस लागतील हें कळत नाहीं. इतके दिवस ओरडा ओरड करतां करतां अखेरीस कोठें कायदा लागूं केला व त्या प्रमाणें ९ जिल्ह्यांत त्या कायद्यान्वयें तालुका बोर्डांची निवड झाली. परंतु जिल्हा बोर्डाची व जिल्हा बोर्डाच्या चेअरमनाची, व्हा. चेअर मनची व सेक्रेटरीची अद्याप निवड झाली नाहीं. अद्याप निवडणूकच जर घोटाळत आहे तर काम सुरु झालें असेल कीं काय याची कांहीं शंकाच घ्यायाला नको. ही निवडणूक करण्यांत इतका उशीर कां याचा मे. डेप्युटी कमिशनर साहेब कांहीं विचार करतील कांय? डेप्युटी कमिशनर साहेबांना इतर पुष्कळ कामें आहेत व त्यांत पुष्कळ या पेक्षां अधीक महत्वाची असतील यांत कांहीं शंका नाहीं तरी ह्या कामाकडे जर विशेष लक्ष दिलें नाहीं तर हें काम असेंच भिजत पडेल व या वर्षीची वृथा निवडणूक झाली असें होईल. कायदा लागू केला आहे त्या प्रमाणें तालुका बोर्डांतील सभा सदांची निवडही झाली आहे. परंतु त्यांच्या हातीं अद्याप काम नाहीं. ही केवढी बरें आश्चर्याची गोष्ट आहे. खरोखर मोठ्या भानगडीचें काम म्हणजे लोकांकडून निवडणूक करणें तें तर झालें परंतु आतां थोड्याशा व्यवस्थे बद्दल सर्व कायद्याची अमलवारी तहकूब राहून लार्ड रिपन सारख्या दात्यांनीं हिंदुस्थानवासी जनांला उदार बुद्धीनें दिलेल्या हक्काचा उपभोगघेण्याला व्यत्यय येणें हें फार वाईट आहे. तर ह्या कामाकडे दुर्लक्ष न करितां लवकर व्यस्था करून काम अझूनही सुरू होईल तर लोकांवर सरकारची मोठीच मेहेरबानगी होईल. अनीबात काम न करण्या पेक्षां वर्षांतून कांहीं थोडे महिने जरी काम केलें तरी बरें! नाहीं तर या वर्षी निवडलेल्या लोकांनीं कायद्यांतील अधिकारांपासून निवडणूकीबद्दल भोगलेल्या त्रासाशिवाय दुसरा कांहीं फायदा मिळविला असें होणार नाहीं.

अकोल्यास पाण्याची उणीव असल्यामुळें आज बरेच दिवस लोक तकलीफ भोगित आहेत व आणखी अशी तकलीफ भोगण्याचें अकोलेकरांच्या नशीबीं किती दिवस आहे कोणजाणें? पाण्याची अडचण केवळ अकोलेकरांनाच भोगावी लागते असें नाहीं तर ज्यांना ज्यांना ह्मणून या गांवीं कामा निमित्य वेळोवेळीं येणें भाग पडते त्यांनाही या अडचणीचा बराच भाग सोसावा लागतो असें ह्मटलें असतां चालेल. बरसातींत जेव्हां नदीला वारंवार पूर येत असतो तेव्हां तर अगदीं शहरांतील कांहीं दहा पांच श्रीमान खेरीज करून बाकीच्यांना गढूळ पाणी व कित्येक वेळां तर अगदीं रेंद्याचें पाणी पिऊन निर्वाह करावा लागतो. हें असें अस्वच्छ पाणी व या शहरीं जो दरवर्षी महामारीचा रोग उत्पन्न होतो त्याचें एक मुख्य कारण आहे असें ह्मणण्यास बाध येणार नाहीं.

ही पाण्याची उणीव दूर करण्याबद्दलचा विचार बरेच दिवस चालत आहे परंतु पैशाच्या अडचणीमुळें व दुसऱ्या इतर कारणामुळें ती तशीच राहिली आहे. परंतु आमच्या अकोलेकरांच्या नशीबामुळें आह्मांस चांगले डेप्युटी कमिशनर मिळाल्यामुळें ती लवकरच दूर होईल असें वाटतें. खामगांवासही पाण्याचा अकोल्यासारखाच त्रास होता परंतु तो मे. हअरसाहेब आमचे हल्लींचे डे. क. यांच्या खटपटीनें दूर झाला. मे. हेअर साहेब येथें आल्यावर त्यांनीं म्यु. क. च्या कामा संबंधानें देववेल तितकी मदत देण्याचें वचन दिलें आहे व त्याप्रमाणें त्यांची खटपटही चालूं आहे.

अकोल्याच्या आसपास दहापांच कोस जमिनीची परीक्षा करून मे. एक्झीक्युटिव्ह इंजिनियर मि. हिचिन्सनी दोन मार्ग सुचविले आहेत ते असे कीं एक तर मोर्णा नदीचें पाणी यंत्रानें स्वच्छ करून नळांनीं गांवांत आणावें. दुसरा एवतें येथें उमरावती, खामगांवा प्रमाणें मोठा तलाव बांधून तेथून नळ आणावे. या शिवाय तिसरा मार्ग शक्य नाहीं असें मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनरचें मत आहे.

या दोन मार्गां पैकीं कोणता सुलभ पडेल याचा विचार करण्या करितां ता० २३ मी नहू रोजी म्यु. कमेटीची सभा भरली होती सभेस मे. डे. क. मि. हेअर साहेब व डा० डिटल सॅनेटर क. हजर होते. त्यां सर्वांच्या मतें यवत्याहून पाणी आणावें असें ठरलें. आता हल्लीं प्रकर्ण काय ते मे सुप्रिटेंडेंट एंजिनियर साहेबांच्या सल्लेवर तहकूब राहिलें आहे. ते लवकरच वऱ्हाडांत तपासणी करितां येणार आहेत तर त्यांनीं येवत्या तलावांतील अकोल्या शहरांस पुरेसें पाणी नेहमीं राहील असें सांगितलें म्हणजे कामाच्या व्यवस्थेस सुरवांत होईल.

हे जे वर दोन मार्ग सांगितले त्या दोन्हीला ही खर्च बराच लागणार आहे परंतु मोर्णा स्कीमला प्रथम खर्च कमी लागेल. यवता स्कीमला सरूत दर्शनी पावणेचार लक्ष खर्च पाहिजे व मोर्णीस्कीमला अडीच लक्ष खर्च पाहिजे परंतु. मोर्णा स्कीमला प्रथम जरी खर्च कमी लागतो तरी काय याचा ५००० रु खर्च अधिक लागतो एकदरींत खर्चाची कांहीं वर्षांची बेरीज केली असतां सारखाच येणार आहे. तर मग नदीचें घाणेरडे पाणी पिण्यापेक्षां तलावाचे स्वच्छ पाणी पिणें हें बरें शिवाय दरवर्षी जास्त खर्च ठेवण्या पेक्षां एकदम केलेला बरा व या वरून म्यु क. केलेला ठराव कांहीं वाईट नाहीं असें आम्हीं समजतों.

सदर्हु वरील खर्चा करितां सरकारनें जरी पुष्कळ मदत केली असें जरी आज अनुमान केलें तरी लोकांनां कर देण्या करितां आपल्या कराच्या यादींत दरसाल बरीच बढती करावी लागेल तो कांहीं प्रत्यक्ष रीतीनें द्यावा लागेल व कांहीं अप्रत्यक्ष रितीनें द्यावा लागेल. परंतु द्यावा लागेल ही गोष्ट खास आहे. म्हणजे हल्लीं म्यु. चें जे उत्पन्न आहे तें १९००० हजारांनीं जास्त वाढलें पाहिजे तर म्यु. क. नें प्रत्यक्ष कर बसविण्या पेक्षां अप्रक्ष रीतीनें कर बसवून जर बरीच रकम वसूल केली तर बरें पडेल कारण प्रत्यक्ष रीतीनें फार कर देणें हें आमच्या नजरेस तेव्हांच भरतें व तसा कर देण्या इतकें आमचे लोक अद्याप समजूतदार हीं झाले नाहींत.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 30 1889.

THE RESPONSIBILITIES OF LOCAL SELF-GOVERNMENT.

Since the inanguration of the policy of local self government by Lord Ripon, Berar is one of these provinces in India on which that boon has been conferred. The Local Municipalities in Berar and the District and taluka boards are parts of the great scheme in Berar. These bodies are invested with certain local powers and they have serious responsibilities also hanging over their heads. One feature makes the machinery of District and taluk boards in one sense more important than Municipalities; and that is the large areas which these bodies are placed in charge of and the largeness of the interests which they have to superintend and control. Part of the authority exercised by the Deputy Commissioner hitherto, will be wielded by the District boards. But although these boards are important in this sense, the local municipalities are more important in another sense. It is only in places where municipalities are now located than public spirited persons, persons of independent means and with ideas that aspire always to a goal higher than the mere winning of bread, are to be found. The District Boards can, as the rules are at present framed, hardly secure such men. For the success of the local government scheme in this province therefore, we must look to the Municipalities for guidance.

Serious responsibilities are at this moment hanging over their heads and it is to be seen how far they are able to discharge the severe and manifold duties they have to perform. The people have now a voice in the selection of the candidates and it remains now to be seen if the choice made by the electors is deserved. The Municipalities if they are to be responsible for the efficient discharge of their duties must also be left free to act and unfettered in the exercise of their powers consistently with public good. Much of the success, must in a large measure depend upon the sympathy of the local officers in charge of districts to these bodies. If the Deputy Commissioners lend the weight of their authority to the Committees much good may be effected. We have been infoımed that in some districts the officers presiding think and express the local self government as utterly unsuited to the genius of the people of the country— an exotic in fact that will never thrive and must perish. Of course there is nothing whatever to prevent any body to entertain such opinions as he likes about the local government scheme; but district officers holding such opinions must naturally be unsympathetic as regards these bodies. They are apt to forget that the scheme was introduced by very wise statesmen and being the work of much abler heads they are bound to see that they do their best to support the scheme, quite irrespective of their personal views on the matter.

The responsibilities that the municipalities are now under are two fold— from without and from within. The hands of these bodies are in a sense tied down to act in conformity with the wishes of the supreme Government on certain matters. The expenses of primary education within municipal limits are borne by the municipalities and we understand that Government is contemplating about the share to be borne by Municipalities of expenses of keeping up hospitals and have asked the Municipalities to say what definite share of such expenses will be borne by them. Now we do not think it advisable at this stage of their existence to saddle these bodies with charges like these. Education may yet be said to be a very ligitimate duty of Government and the funds for it ought to a very great extent, be a charge on the imperial funds. The state does not in India give a fair share of its revenues to education and it is unjust that Government should think of saddling the municipalities with charges which for many years to come the state ought to bear. Charitable hospitals are also very good things in themselves; and municipalities ought to pay for them if they can afford to do so. But when there are other very necessary things to be done by those bodies it would be unfair to get them to subscribe to things like charity hospitals. Almost all the municipal towns want a good deal yet to be spent on sanitation and conservancy on pure water and drainage on good metalled roads and lights in streets. Many of these must remain undone if the funds of those bodies are to be diverted to other channels than these. And knowing all this as Government do, they yet press the municipalities in bearing the expenses of education and charity hospitals. The charge on the resources of the state will be less by so much, no doubt, if these local bodies are made to contribute a portion, but in that case those bodies cannot very well be charged with neglecting some of their most urgent duties.

Among the responsibilities from within is the chief one of collecting funds for municipal purposes. Taxation in any shape people are averse to, and yet it is clear that without ample funds these bodies can hardly effect even the most salutary improvements. New as the municipalities are they have to rack their brains for finding out ways and means for getting up funds. They run the risk of being without the means for attaining the objects for which they are created or of becoming unpopular. The Akola Municipality and the Amraoti Municipality have naturally to take the lead and we are anxiously waiting to see what ways and means these bodies find out to get up funds. Akola badly wants a pure water supply and Amraoti a good drainage system, and it is now to be seen how the two local bodies meet the new responsibilities thrown on them.

The resolution of the India Government on school discipline lays stress on the necessity of games and exercise as a means to improve the physique of the student. No doubt institutions such as play—grounds and gymnasia are of two fold use. They engage the attention of boys out of school hours. They have a direct bearing on the formation of a manly type of character. In this province gymnastics in high and middle class schools, and native field games such as Atya Patya and Khokho in most schools, have been introduced. At the end of each year as a way of stimulant prizes are awarded to those who show proficiency in these games. However these do not form a part of the school curriculum. The training college course is an exception. Following the example set by the New English school in Poona school drill is practised of late in the Local High school. Still it is a matter of regret to note that it is done by the boys simply as a play of joke. Wherever gymnastics and Native field games have been introduced, the result is, that the boys show great likeness for these only in the very beginning which gradually vanishes. Thus the aim to improve the health of boys fails. Now want of exercise alone is not the cause that tells upon the health of boys. The pressure of studies according to the revised standards combined with irregular method of doing lessons stiff examinations and several other things crushes him down.

PLEADERS EXAMINATION 1889 THE LAW OF EVIDENCE REGISTRATION STAMPS.

Time allowed 3 hours.

I In what cases are statements of relevant facts by persons who are not called as witnesses themselves relevant facts. Marks5

II What is an *admission* and what is a *confession*. What admissions are relevant and may be proved and what confessions are inrelevant and may not be proved— What is an estoppel. Quote the three sections of the Indian Evidence act which relate to estoppel.

III When are the opinions of third persons relevent. When is evidence of character. relevant.

IV What facts need not be proved. In what cases may secondary evidence be given. In what cases can a witness refuse to answer questions and in what cases is he prohibited from answering questions put to him during his examination as a witness— Marks 10

V What documents must be registered and of what documents is the registration optional. What advantage have registered documents over unregistered documents. Marks 5

VI Enumerate the provisions of the stamp Act and the Court Fees Act which are specially intended directly or indirectly to prevent the evasion of payment of the proper duty. Marks 10

VII Give your opinion with reason as to the relevancy and admissibility of the evidence offered in the following cases.

(1) A witness is called to prove that the prisoner who is charged with murder confessed to the Police in the presence of a Magistrate. He says the Magistrate did not record the evidence in the manner prescribed in the Criminal Procedure Code as he had no writing materials and that none could be procured till next day when the prisoner was too ill to make a statement. Should the witness be allowed to state what the prisoner said.

(2) A patel suspecting accused of having committed theft says to him "you have lived in my village a long while and I do not like to see you in trouble. You had better confess if you are guilty and I will do what I can to help you though I am afraid it will not be much. The accused then confessed Is the confession admissible.

(3) A Police constable tortured the accused and the accused under the influence of the torture and in consequence of it confessed that he had killed the deceased and buried his body in a particular place. The next morning the Police constable caused the villagers to be assembled and asked the accused whether he had killed the deceased. Accused said yes and offered to point out the place. He did so. Is the evidence of witnesses who speak to the accused having confessed and pointed out the place, admissible and can these facts be proved

(4) An accused person told the Patel of his village that he had committed a theft and that he had concealed the property under the cooking place in his house. The accused told the Patel this while under the influence of torture. The Patel told the Police that they had better search the house as the accused had sold him the property was under the cooking place in the house. The house was searched and the property recovered.— Can the fact that the property was recovered in that place be proved, all the facts having been brought! to the notice of the court before the evidence was tendered.

(5) A man is accused of murder; a witness says he saw the accused kill the deceased. The accused proposes to call another man to prove.

(1) That the witness is a liar and well known to be a lier.

(2) That the witness told a lie in a case in which he (the person to be called) was interested and that the Judge remarked the same in open court.

[6] A man is accused of theft. In order to prove the theft the prosecution offers evidence to show that the accused had been fifteen times before convicted of theft. The evidence is offered in a trial by jury before that part of the charge which relates to persons conviction has been read to the jury. Is the evidence admissible. Quote authority on the point. Marks 15

VIII Is the evidence which it is proposed to give in the following cases admissible.

(1) A party proposes to put in a copy of a decree which is not stamped. The decree is for Rs 5000. The party offers to affix a four anna court fee stamp and having affixed it again presents it to the court. Should it be admitted?

[2] A party proposes to put in an unstamped receipt for Rs 50. The court objecting to it, he affixes a receipt stamp cancels it and again presents it. Should it be received?

(3) A party proposes to put in evidence the following letter

Sir

I hear that you have filed a suit against my brother. Please withdraw it and I will pay you the 200 due by him at the end of one month.

Yours faithfully
A

It is produced by the addressee in a suit against A for the recovery of the 200.

The party producing it is willing to pay any stamp duty or penalty that may be required.

If it is admitted what stamp duty and penalty if any should be recovered. If not admitted on what ground would it be rejected.

(4) A sues to recover possession of a field from B. B says that he is holding it under an unexpired lease from A. A witness is called to prove that in his presence A and B had a talk during which A asked B to take a lease of the field and B agreed to take it. In cross examination he says that the next day A and B went to the sub-registrar's office and in his presence A executed a lease of the field to B. When further questioned he said the lease was for three years and that the rent reserved was 5 a year. B to pay also the revenue assessment 2 annually. Is the evidence of the witness admissible, or is the whole or any part of it inadmissible? Quote the law with reference to your answer. It was admitted by B that a lease had been executed and that it had not been registered as A refused to pay the cost of registration as he had agreed.

(5) A sued to recover possession of a field from B. B said the field had been sold to him for Rs 200 by A and that a deed of sale had been executed. A said he had not sold the field to B but he was willing to allow the sale as 200 was much more than the value of the field. B said he had paid the 200 A said that it had not been paid. Issue was framed whether the 200 had been paid. B proposed to put in evidence the deed of sale with the object of showing that A had in the deed admitted receipt of the consideration. A objected that the deed was not registered. Was the evidence admissible or not? Quote the law in support of your arguments.

(6) Would it have made any differences in the last case if the deed had been presented for registration but registration had been refused because A denied the execution. Marks 15

IX Quote the sections of the evidence Act which distinctly apply to the following cases.

(1) A party to a civil suit gives evidence in support of his own case. It is proposed to ask him whether he was 10 years before convicted of theft. His pleader objects to the question being put. Should the question be put?

(2) A pleader is examined as a witness in a case. He is asked whether he considers the plaintiff who is his own client, has a good case. He objects to answer. Should he be compelled to answer?

(3) A woman is asked whether her husband did not the day before her marriage tell her that he had committed the murder for which he is under trial. She says she does not like to give the evidence as if she denies it she will not be believed, and if she admits it she will be in her own estimate a party to his condemnation. Should she be compelled to answer?

(4) A party is asked whether he did not tell his pleader that his case was false but that he wished to win it as he had been worsted by the other party in a case which the other party had falsely brought against him. He refuses to answer. Should he be compelled to answer?

(5) A witness is called to prove the good character of the accused. The prosecution call a witness to prove that witness is not worthy of credit. The accused proposes to call a witness to prove that the last witness is not worthy of credit. Should the witness be called.

(6) A witness in a case was asked whether he had been convicted of theft He replied in the negative. It is proposed to call a witness to prove that he was convicted. Can the evidence be received Marks 10

X Discuss with special reference to reported decisions of the High Courts the following questions.

(1) Can a man be convicted on the uncorroborated evidence of a single witness?

(2) Can a man be convicted on the uncorroborated evidence of a single informer?

(3) Can a man be convicted on a confession made by himself before a Magistrate during a Police investigation unsupported by any other evidence?

(4) To what extent can the evidence of one informer be said to corroborate the evidence of another informer, and to what extent can a confession by one prisoner be said to corroborate the confession by another prisoner.

(5) Can a man be convicted on the confession of another person tried along with him unsupported by other corroborative evidence. Marks 15

Locusts have caused much damage to the crop in certain talukas of the Hyderabad and Thar and Parker Districts.

Sir Asman Jah, the Prime Minister to the Nizam, will soon resign owing to the strained relations between him and his master.

वऱ्हाड

हवामान:-- हवेंत उष्णता ज्यास्त भासूं लागली आहे पावसाची जरूर आहे. तापाचा आजार पुष्कळ ठिकाणीं आहे.

मि० शेक इस्मायल येथील डे० क० चे क्लार्क आफ कोर्ट यांचो कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं नेमणूक झाल्या प्रमाणें ते गेल्या शुक्रवारीं येथून उमरावतीस गेले.

मे० कर्नल स्पान्स्की सा० कमिशनर यांची स्वारी गेल्या शुक्रवारीं उमरावतीस गेली.

कळविण्यास दुःख वाटतें कीं, येथील म्युनि०टीचे मेंबर व शहरांतील एक प्रसिद्ध व्यापारी मि. नामदेव राजन्ना यांस गेल्या मंगळवारीं पक्षवाताच्या आजारानें देवाज्ञा झाली.

लवकरच जी. आय. पी. रेलवेच्या पासेंजर गाड्यांचे वेळांत फरक होणार आहेत. वऱ्हाडांतून दुपारीं जाणाऱ्या येणाऱ्यां गाड्यांच्या वेळां कायम राहणार आहेत. फक्त नागपुराकडून रात्रीं जी गाडी येते ती मात्र दोन तासांनीं उशिरानें येणार; ह्मणजे अकोल्यास चार बाजतां येईल असें समजतें.

चुकीचें दुरुस्ती:—पंजाब नादारी मु० नंबर २९ व २९ या दोन नोटिशींत नादारी कोर्टाचे क्लार्क असें लिहिलें आहे तेथें नादारी कोर्टाचे जज्ज असें समजावें.

पिंपळगांवराजा एक्स आपलें पत्रांत असें ह्मणतात कीं:—

"लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं आमचेकडे टोळ नांवाचीं पांखरें या आठवड्यांत आलीं होतीं त्यांनीं इकडे फार नुकसान केलें त्यांचा मुक्काम रविवारीं बोरजवळपास रात्रीं झाला. त्या मुक्कामांत त्यांनीं आजमास पंचविस शेतें पराठीचीं अगदीं दुनियांतून घालविलीं. तूर व पराठी यांच्या नुसत्या काड्या ठेविल्या. बाभळी व हिवर या जातीच्या झाडावर बसले तर त्याचे ओझ्यामुळें झाडांच्या डांगा मोडल्या व त्या झाडांनां पाल्याचें नांव ठेविलें नाहीं. त्या पाखराची रुंदी अजमासें पांच कोस होती व लांबीची गणती अजमास दाहा कोस होती.

येथें वरणगावकर गोविंदबोवा आले त्यांचा मुक्काम येथें अजमासें आठ दिवस होता सदरहू साधूंची किर्तन करण्याची फार ख्याती आहे. त्यांना येथें अजमास २५ रु० उत्पन्न झालें.

पिंपळगांव राजा हा गांव मोठा आहे परंतु या गांवांत ब्राह्मण लोकांची वस्ती फार कमी आहे यामुळें साधुसंत लोकांना जसें उत्पन्न व्हावें तसें होत नाहीं. जे लोक आहेत ते आपल्या शक्तिप्रमाणें उत्पन्न करून देतात. परंतु येथील श्रीमंत रा० रा० नारायण पांडुरंग देशपांडे हे गृहस्थ फार कीर्तीचे आहेत. त्यांचें लक्ष धर्मसंबंधीं कामांत इतकें आहे कीं त्यांची जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे. न येथें साधुसंत येतात त्यांचा सन्मान हे फार उत्तम प्रकारें ठेवितात"

वर्तमानसार.

१८७१ त फ्रान्स व जर्मनी यांच्यांत जें एक जंगी युद्ध झालें व ज्यांत फ्रान्साचा बीमोड झाला त्या लढाईबद्दल फ्रान्सानें देऊं केलेले २,००,००,००,००० रुपये नुकतेंच जर्मनीस देण्यांत आले. खर्च वजा जातां बाकी राहिलेले ११,०९,१५० रुपये लहान लहान संस्थानांत वाटले जाणार आहेत.

सौदानी प्रांतांत छापा घालण्याचें काम सध्यां बंद ठेवावें तुमच्या ताब्यांतील प्रजेला प्रथम निःशस्त्र करा असें विलायतेहून इंजिप्तांतील इंग्रज कामदारांस लिहून गेलें आहे.

१८९० सालांतील वकिलीची परीक्षा ता० १० मार्च रोजीं होईल असें प्रसिद्ध झालें विशेष माहिती ता० १९ मोनहू रोजीं सरकारी ग्याझेटांत पहा.

चीन देशांत ३००० वर्षां पूर्वीचा एक इतिहास सांपडला आहे, हा इतिहास त्या त्या वेळच्या राजांनीं स्वतः लिहिलेला आहे.

हिंदुस्थानचे कारभारी इंग्रज कामदार हो, तुह्मां पैकीं ज्यांस लाचलुचपतीनें पैसा मिळविण्याची ह्मणून इच्छा असेल तीं त्यांनीं दुकानें आतां सुरू करावीं. आपापल्या दुकाना करितां वेगळाले एजन्ट व दलाल नेमा आणि पाहिजे तर आपापल्या दुकानावर मोठाल्या अक्षरांच्या तशा पाट्याही लावा. दारू, अफू वगैरेचे जसे मक्ते होतात तसे तुम्ही पाहिजे तर मक्ते द्या अथवा जंगलांतून लांकडें, फळें, पुष्पें वगैरे काढून नेण्याची जशीं लिलावें होतात त्या प्रमाणें तुमच्या ताब्यांतून व्हावयाच्या नेमणुका, बदल्या, वतनें, वर्षासनें वगैरेचीं पाहिजे तर लिलावें करा. तुमचे वरिष्ठ जे हिंदुस्थान सरकार व स्टेट-सेक्रेटरी कौन्सल त्यांनीं, तुह्मास तसें करण्याचें मार्गे सांगितल्या प्रमाणें आतां अगदीं सनद करून दिली आहे! आतां तुमच्या त्या धंद्यास आडकाठी ह्मणून कांहींच राहिली नसून तुमचें तें कृत्य बाहेर आणण्याचा कोणासच अधिकार राहिला नाहीं. लाचलुचपतीनें पैसा मिळविणें पाप आहे असें ह्मणणारे जे कित्येक मूर्ख तुमच्या मंडळींत असतील त्यांस एकीकडे काढून अगर जाती बाहेर टाकून, हा आनंदाचा दिवस आल्या बद्दल तुह्मी सर्वांनीं एक बडा खाना करून त्यांत हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांच्या नांवानें ग्लासें झोडा. पण या सर्व प्रकारचा आद्यस्तंभ क्राफर्ड आहे हें ध्यानांत ठेवून प्रथम त्याचा जयजयकार करा हो. तसेंच क्राफर्डास लांच दिल्याचें कबूल करणारे आठ मामलेदार, डबीर, परांजपे, तांबें, कुमठेकर, खासगवीस, द्रविड, बापट व विंझे यास बडतर्फ करून हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांनी त्यांची खोडकी मोडली याबद्दल आनंदाच्या टाळ्या पिटा हो. नाहीं तर विसराल. आतां तुह्मास धास्ती ह्मणून कांहीं राहिली नाहीं. मात्र तुह्मी ज्या रकमा घेतल्या त्या जुलमानें घेतल्या असें ह्मणण्यास जागा राहील असें करून ठेवा, क्राफर्डची जरी चाकरी गेली तरी त्याचें तें करणें एका अर्थानें त्याच्या स्वतांस भूषण असून तुम्हा सर्वांस ही सनद करून देण्यास कारणी भूत झाले आहे ह्मणून तो मोठा देशाभिमानी व परोपकारी आहे असें ठरतें, आतां तुम्ही या सनदे प्रमाणें खुशाल व्यापार चालवा, तुमचा तो व्यापार बाहेर आणण्याची कोणा नेटिवास छातीच होणार नाहीं, शिकलेल्या तरुण नेटिवां बद्दल आजपर्यंत तुम्हास जी भीति होती ती आतां सर्वांशीं नाहींशी झाली, तुमचा तो व्यापार बाहेर आणणारा नेटिवांत आतां एक ही मायेचा पूत निघणार नाहीं, कारण त्यांच्या डोक्यावर बडतर्फीचा बडगा तयार आहेच, लांच देणारा व घेणारा हे दोघेही गुन्हेगार आहेतच असा जरी आजपर्यंत कायदा होता तरी त्यांतील पाहिजे त्या पक्षास माफी देण्याचा सरकारास अधिकार होता व त्यामुळें दोघांसही वचक होती पण तें माफीचें कलम आतां अरद्द झालें, आतां जर कोणी सरकार माफी देण्यास तयार झाले तर ती माफी गैरकायदा आहे असें आह्मी ठरवूं. असें हिंदुस्थानसरकार व स्टेट सेक्रेटरी यांनीं आतां बजावून सांगिलें आहे, या करतां आतां धास्ती ह्मणून कांहींच राहिली नाहीं, लांच खाणें पाप आहे ह्मणूनच जर तुह्मी स्वस्थ राहाल तर तुमची ती अगदीं चूक होईल, कनक आणि कांता ही जरी कितीही मोहक असलीं तरी त्यांच्या पाशांत सांपडणें फार वाईट आहे असें तुमचें ह्मणणें असल्यास तें अगदीं चुकीचें आहे. तुह्मी जे आपलें वरदार व चांगली हवा टाकून इतके लांब येतां ते जर पैशाकरितांच येत आहां तर तुमचें तें ह्मणणें काय उपयोगाचें, तुह्मी जर चाकरीनें मिळणाऱ्या पैशांत संतुष्ट असाल तर पंचवीस किंवा वीस वर्षें चाकरी करून मिळावयाचे वीस किंवा पंचवीस लाख रुपये ते दाहा किंवा पंधरा वर्षांतच मिळवा आणि परत जा ह्मणजे झालें, तसें केल्यानें चाकराची दगदग व हिंदुस्थानच्या वाईट हवेंत राहण्याची मुदत कमी होऊन त्या मानानें तुमचीं शरीर संपत्तीही चांगली होईल आणि तुमच्या इतर भाऊबंदांस जागा रिकाम्या करून दिल्याचें श्रेयही मिळेल, हे इतके फायदे असतां तुह्मी ही दुकानें उघडण्यास तयार होणार नाहीं काय? होणार नाहींतर आह्मी तुमचें कमनशीब समजूं, आह्मी आपल्या हृद्याचें काम लाचलुचपत घेतल्या वांचून प्रामाणिकपणानें करूं ही तुमची प्रतिज्ञा तुह्मास कदाचित् खात असेल व तशी खाणें रास्तही आहे पण विचार अंतीं त्यांतही कांहीं अर्थ दिसत नाहीं. ठा०

दांताचें औषध गंधकाचें फूल रोज रात्रीं दांतास व हिरड्यांस लावावें आणि एका कुंचलीनें साफ करावें म्हणजे दांत दुखत नाहींत व फार बळकट होतात असें एका इंग्रज वैद्यानें शोधून काढलें आहे.

तारुण्य देणारें पाणी नव्हेडोंनायड(- यट स्टस्) मध्यें पाण्याचा एक झरा सांपडला आहे त्याचे पाणी एक बुढ्ढा सिद्धी एक महिना भर पीत होता महिन्यानंतर त्याचे पांढरे केस काळे झाले दृष्टी तरतरीत झाली, अंगांत कुवत आली आणि सर्व प्रकार तो तरुण झाला असें सायंटिफिक अमेरिकन वरून कळतें. नव्या जगाचें सर्वच अपूर्व.

हायकोर्टाचा उपयुक्त ठराव– सुरत जिल्ह्यांतील जलालपूर तालुक्यांत अब्रामा या गांवीं एक मनुष्य खासगत मोरी काढीत असतां त्यानें सार्वजनिक रस्त्याची खराबी केली तशी खराबी करूं नको अशी पोलीस पाटलानें जातीनें ताकीद दिली असतां ती त्यानें जुमानली नाहीं. मुंबईचा १८६७ चा अक्ट ८ कलम १५ प्रमाणें पाटलास जो अधिकार आहे त्याचा उपयोग करून सरकारी नोकराचा हुकूम अमान्य केल्याचा आरोप सदर मनुष्यावर ठेऊन त्याची शाबिती झाल्यामुळें पाटलानें त्यास २ रुपये दंड किंवा ३६ तास चावडींत कैद भोगावी अशी शिक्षा दिली ही शिक्षा रद्द करावी अशाबद्दल सुरतचे डि० मा० मिस्तर उंचेस्टर यांनीं हायकोर्टास लिहिलें. हायकोर्टाचा हुकूम कीं, कज्यांत असलेल्या एका रपोर्टावरून सार्वजनिक रस्त्याची नासधूस करणें ही बाबत होती असें दिसतें, सन १८६७ चा मुंबईचा अक्ट ८ कलम १५ प्रमाणें पाटलास अधिकार आहे म्हणून त्या शिक्षेच्या कामांत हात घालण्यास आम्हास कांहीं कारण दिसत नाहीं. गु० सू०

एल्. एल् बीची परीक्षा आजपर्यंत युनिव्हर्सिटींत एकच असे. गेल्या गुरुवारीं सिनेटची सभा भरली होती त्या वेळीं असें ठरलें कीं या पुढें दोन परीक्षा व्हाव्या. आजपर्यंत लॉ क्लासांतील शिक्षकवर्गाकडून जी ज्युरिसप्रुडन्स नांवाची परीक्षा घेण्यांत येत असें व जिच्यांत बहुधा कोणी उतरला नाहीं असें घडतच नसे, तो यापुढ बंद करण्यांत येऊन तिच्या ऐवजीं रोमन लॉ व जनरल ज्युरिसप्रुडन्स या दोन विषयांत युनिव्हर्सिटीकडून परीक्षा घेण्यांत येणार. व दुसऱ्या परीक्षेंतील हा विषय गाळला जाऊन यापुढें त्या परीक्षेंत परीक्षेच्या ६ विषयांच्या ठिकाणीं ५ च राहणार. पहिल्या परीक्षेसाठीं दोन टर्म वर्गांत हाजरी असली पाहिजे. ती पी. ई. ची परीक्षा झाल्यानंतर पाहिजे तेव्हां भरावी. पुढच्या परीक्षेच्या टर्मी चार (वर्षें दान) ची हजरी मात्र बी. ए. किंवा बी एस. सी. ची परीक्षा झाल्यानंतरची पाहिजे. आजपर्यंत मुंबईच्या विद्यार्थ्यांना इकडच्या कालेजांतला अभ्यास चालू असतांना लॉक्लासांतील हजिरी भरतां येत होती तसें आतां सांधणार नाहीं. लॉक्लासांत चांगले व भरपूर शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली तरच या नवीन व्यवस्थेपासून कांहीं हित होईल.

हिंदुस्थानांत आतां रॉकआईल रशियांतून येतें, त्यामुळें अमेरिकेचें मोठें नुकसान झालें आहे.

पंखा ओढून २८,००० मजूर कलकत्यास व कलकत्याच्या आसपास पोट भरीत आहेत. १४० हजार रुपये गोऱ्या शिपायांकरितां पंखे ओढण्यांत सरकारचे खर्च होतात.

कासव १३० वर्षें वाचतें असें प्रोफेसर फौलर यांनीं सप्रमाण ठरविलें आहे.

मादागास्कर येथें गेल्या वर्षापर्यंत जातें माहित नव्हतें. तें नुकतेंच अमेरिकेहून गेलें जिवंत आहे.

६८ वेतें दिलेली मांजरी हल्लीं अमेरिकेंत आहे,

ग्यालिअम या नांवाची धातू फारच दुर्मीळ आहे. २॥ तोळ्यास ७ हजार रुपये पडतात.

निजामचे दिवाण सर अस्मानजाहा हे आपल्या कामाचा राजीनामा देणार कारण त्याचें व प्रजमानाचें पटत नाहीं.

अमेरिकेंत कोलोरेडो या नदीच्या आसपास मिठाचा पर्वत आहे. हें मीठ इतकें शुद्ध असतें कीं ८ इंच जाडीच्या मिठाचा खडा वर ठेवून वर्तमानपत्र वाचतां येतें. के०

रशियन लोक दारानवळ आपले कावेबाजीचे खेळ खेळावयास लागले असून ते आपल्या वर्तमान पत्रांत इंग्लंडचा पडता काळ जवळ आला काय असें प्रश्न विचारून मजकूर लिहावयास लागले आहेत. तेही इंग्रज लोकांची नेत बिघडली हाच त्या प्रश्नास आधार घेत आहेत, हा सर्व प्रकार पाहून विनाश काळीं विपरीत बुद्धि होते अशा बेतावर इंग्लंडची स्थिति येत चालली कीं काय असें पाहून फार वाईट वाटतें. सु०

सांगली येथें–गुजराथेंतून एक तिकडील मनुष्य पाणक्या आला होता. हौद आणि दोन बैल व एक घागर इतक्यांच्या मदतीनें सर्व लोकांना पाणी देत असे. सर्व लोकांना पाणी विशेषतः मोठमोठे वेदविद्येमध्यें प्रवीण असलेली विप्र मंडळीसुद्धां यानें आपल्या वरद हस्तानें पावन केली. परवां त्याच्या गांवचा एक मनुष्य आला व त्याला पाहिल्या बरोबर या पाणक्याची हबेलंडी झाली. व आपला बैल आणि इतर Assistant मंडळी विकून जवानानें बाल्या हांकला. हा सरतेशेवटीं न्हावी ठरला. सर्व लोकांची बरीच बहादरानें उलटी सुलटी केली. असो. आतां सर्व मंडळी शुद्ध होणार. आपल्याकडे गोमूत्र असलें तर डब्यांत पाठवून द्यावें. आपलें श्रम वायां जाणार नाहींत. असें एकजण कळवितो.

उत्तर हिंदुस्थानांतून एक फकीर आला होता तो आंधळा होता. बरोबर एक कुत्रा होता. तो कुत्रा त्या फकीराचें पुत्रवत् पालन करीत असे. फक्त वाचा कमी. एखादा पैसा द्यावा व बेटा तंबाखू ह्मटल्याबरोबर तंबाकूच्या दुकानीं जाऊन तंबाकूकडे पाय दाखवून पैसा देऊन तंबाकू आणीत असे अशा प्रकारच्या सर्व गोष्टी करी. एके दिवशीं हा फकीर कोठे जेवण्यास गेला असतां कुत्रा बरोबर नव्हता. एवढ्या अवकाशांत त्यास कोणी विष घातलें म्हणतात! कारण हा कुत्रा मुंबईस ३०० व सांगलीस १०० रु० पयांस विकत मागितला होता; पण फकीरानें दिला नाहीं. कुत्रा मेल्याबरोबर तो फकीर गुरासारखा रडत होता. व तेथून चालता झाला. पु.

जाहिरखबर.

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचीं इंग्रजी व मराठी, संस्कृत शालोपयोगी पुस्तकें कादंबऱ्या, नाटकें, कायद्याची वैद्यकी संबंधी तसेंच सर्व प्रकारचे प्राकृत व संस्कृत ग्रंथ पैसे पाठविलें असतां किंवा व्हॅ. पे. पो. मार्फत मागविली असतां विकत मिळतील.

विशेष सूचना – घाऊक घेणारांस योग्य कमिशन मिळेल.

वि. एम वाळवेकर आणि क०
बुकसेलर व पब्लिशर्स रामवाडी मुंबई

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके, यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.